
सं. नं. 230



# मध्यरात्रीचें सूर्यदर्शन

## (फिन्लंडचा प्रवास)

REFBK-0010205

लालजी पेंडसे

REFBK-0010205

REFBK-0010205

...महालय ठाणे
१०२०५
स्था. क्र.
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 23028 दि: ...
क्रमांक 230 नों: दि: 26/3/58

# मध्यरात्रीचें सूर्यदर्शन

## [ माझा फिन्लंडचा प्रवास ]

लेखक : लालजी पेंडसे

प्रकाशक :

**लालजी पेंडसे**

१९६ चर्निरोड, गिरगांव,
मुंबई नं. ४

◆

**एकमेव विक्रेते :**

रामकृष्ण बुक एजन्सी
प्रार्थना समाज, गिरगांव,
मुंबई ४.

◆

[ या पुस्तकासंबंधींचे सर्व प्रकारचे
हक्क लेखकाकडे आहेत. ]

◆

**मूल्य दोन रुपये**

◆

मुद्रक :

**ह. म. गद्रे**

जनवाणी प्रिंटिंग प्रेस
४५ बुधवार पेठ, पुणे २.

# खुलाशाचे चार शब्द

नों: दि:
क्रमांक

सन १९५५ च्या मध्याला मी पूर्व युरोपच्या प्रवासाला गेलो होतो. फिन्लंड, रशिया व झेकोस्लोव्हेकिया हे देश फिरून मी ऑगस्टमधे परत आलो.

प्रवासात जिथे जायचे तिथली माहिती बरोबर असलेल्या दुभाषाकडून विचारून घेऊन तिथेच त्रोटक टांचणे करून ठेवायची. नंतर रात्री सुसंबंद्ध विस्तार लिहून काढायचा. कितीहि रात्र झाली तरी हे काम उरकल्याशिवाय झोपायचे नाहीं हा माझा नित्यक्रम असे. यामुळे अपुरेपणा व अर्धवटपणा कुठे राहिला, जे ऐकले व टांचण करून ठेवले ते साधार आहे कीं नाहीं ? तसेंच त्यासाठीं पुरावा काय गोळा केला पाहिजे याची कल्पना येई.

ही माहिती दुभाषाकडून गोळा करून घ्यायची; त्या संबंधींचीं प्रकाशनें मिळवायची; सरकारी स्वरूपाचे प्रश्न असल्यास संबंधित खात्याकडून टांचणे मिळवायचीं व खुलाशासाठी त्या त्या खात्याच्या प्रमुखाची किंवा तज्ञाची भेट घ्यायची. या सर्व गोष्टी दुभाषा घडवून आणी. अशा रीतीने जमविलेले ओझें सर्वत्र बरोबर फिरवायला नको म्हणून तें मी त्या त्या ठिकाणाहून पोस्टाने मुंबईस घरीं पाठवून देत असे.

पण स्वदेशी परत आल्यावर एक महिन्याने हीं पार्सलें येऊन पोंचलीं. वांचून टांचणे तयार केलीं तो ऑक्टोबर महिना उजाडला. भाषावार राज्यरचनेसंबंधींचा उच्चाधिकार समितीचा अहवाल प्रसिद्ध होण्याचा तो काळ होता. यामुळे सं. महाराष्ट्राच्या चळवळीने अशी उसळी घेतली की पुस्तक लिहिण्यास क्षणाचीहि उसंत मिळेना. पुढे १६ जानेवारी १९५६ ला मी पकडला जाऊन नाशिक तुरुंगांत स्थानबद्धतेंत राहिलो. तेव्हा हें लिखाण पुरे करून ‘ केसरी ’ कडे पाठविलें. त्यांतले काहीं भाग लेखरूपाने प्रसिद्ध करण्याचे केसरीने जरी तत्परतेने ठरविलें तरी जागेच्या अभावी त्या मजकुराचे सहा लेख प्रसिद्ध होईतो १९५७ चा फेब्रुवारी महिना उलटलाच. तथापि केसरींतील प्रसिद्धीमुळे जाणत्या वाचकांचें

त्याकडे लक्ष वेधलें गेलें हा लाभ तर झालाच. त्यानंतर पुन्हा विधिमंडळें, लोकसभा व मुंबई कॉर्पोरेशनच्या निवडणुका संपेपर्यंत आणखी दोन महिने गेले. नंतर आजाराने ग्रासलें ते सप्टेंबर अखेरपर्यंत !

यामुळे पुस्तक छापावे की नाहीं हा प्रश्न पडला. ते खपणें कठीण असाहि सल्ला मिळाला. तरीहि स्वतःच ते प्रसिद्ध करायचे ठरवून आज ते हातावेगळे करीत आहे. उशीर झाला तरी यांत शिळे होण्यासारखे काहीं नाहीं. हा प्रयोग कितपत यशस्वी होतो त्यावर पुढच्या दोन देशासंबंधीचे प्रकाशन अवलंबून असणार.

फिन्लंडला जाण्याचा योग आला तेव्हा मनाला विशेष ओढ उत्तरध्रुव प्रदेश पाहण्याची होती. लो. टिळकांच्या ‘ आर्टिक होम इन् दि वेदाज ’ पुस्तकाने मला एक स्थूल दृष्टि दिली. या लेखनांतहि त्या ग्रंथाचा उपयोग केलाच आहे. हा उपयोग माझ्या हातून कसा झाला याचे प्रत्यंतर या पुस्तकांत येईल.

फिन्लंडच्या माहितीचे आणखी एक महत्त्व आहे. संयुक्त महाराष्ट्र सहकारी अर्थव्यवस्थेवर उभारण्याचा आपला संकल्प आहे. अनेक पक्ष व जनता मिळून बनलेली सं. म. समिति हीच उद्या महाराष्ट्राची राज्यकर्ती बनणार, असाहि आपला विश्वास आहे. फिन्लंड भांडवली चौकटींत सहकारी अर्थव्यवस्था व संयुक्त आघाडीचें सरकार यांचा प्रयोग करीत असून काहीं प्रश्न त्याने सोडविले आहेत. यामुळे त्यासंबंधींची या पुस्तकांत दिलेली माहिती बोधक होईल, अशी मला आशा आहे.

१९६ चर्नी रोड, मुंबई नं. ४
मकरसंक्रांत दि. १४।१।१९५८

—लालजी पेंडसे

...ंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम 23028 वि: ...
क्रमांक ... 2328 ... नों: दि: ...
90205

# महन्मयाची रथयात्रा

रोज रोज मुंबईच्या अरबी समुद्रांत बुडी घेऊन अदृश्य होणाऱ्या महन्मय भास्कराला शेवटी त्याच्या शयनागारांत घुसून हुडकून काढल्याच्या विजयी मुद्रेने त्या दि. २६ जून १९५५ च्या रात्री ११ वाजता मी त्याच्यावर प्रथम दृष्टिसंपात केला तेव्हा तो वरमून गोरामोरा झाला होता ! क्षितिजापासून यावेळी तो वीत दीड वीत उंच होता. पण आम्हा भारतीयांशी नित्यशः चालविलेल्या लपंडावांत शेवटी आता हार खावी लागल्यामुळे हिरमुसला होऊन त्याने मान खाली घातली नि क्षितिजाआड तोंड लपवायला तो खाली खाली घरंगळूं लागला. बाराच्या सुमाराला तो क्षितिजाला लगटला; पण आणखी खाली सरकून तोंड लपवायला त्याला मुभा होतीच कुठे ! श्यामेला दिलेल्या वसंतवचनाने तो बांधला गेलेला होता. यामुळे तो क्षितिजाच्या 'लक्ष्मण रेषे'शी अडकून पडला !

रात्री बाराला तो आमच्या अगदी समोर होता, व किंचित् लंबगोल दिसत होता. त्याची मंद किरणें सर्वत्र पसरलेली होती. या किरणांपुढे पांढरे ढग विखुरलेले होते. त्यांच्यावर प्रकाश किरणें पडून ते चमकदार तांबूस वर्णाचे दिसत. त्या दिव्य मंगल रसरंगाची खुमारी वर्णनाला अशक्यच होती. डोळ्याच्या पेल्यांत ती भरून घ्यावी, नि अंतःकरणांत खोल खोल सांठवून ठेवावी ! सप्ताश्व रथाची कल्पना या दृश्यावरूनच सुचली असेल का ? देव लोकीची ती भगवान् सूर्य नारायणाची दिव्य मनोरम मिरवणूक रात्री दीड वाजेपर्यंत आमचे मुजरे घेत मंदगतीने क्षितिजालगत चालली होती. पण मग अरुणाचा चाबूक कडाडला नि घोडे भरधांव उधळले. रात्री तीन वाजता सूर्य इतका वर आला की भारतांत सकाळचा आठ–नवाचा सुमार वाटावा !

ध्यानी मनी नसता फिन्लंडला येण्याची कल्पना निघावी; चुटकी सरशी ती यशस्वी व्हावी; शुक्लेंदुवत् शुभ्र सौरभ अशा पावन पितृभूमीला आपले पाय लागावे; भर मध्यरात्री महन्मय भास्कराची देवदुर्लभ अशी क्षितिज यात्रा आपण पहावी; हे एक दिव्य अन् अतर्क्य असे स्वप्नच माझ्या आयुष्यांत उमटून गेलें ! पिढ्यान् पिढ्या चालत आलेल्या रक्ताचे पूर्वसंस्कार नकळत मनांत उसळून आले. त्यांनीं मला पुलकित केलें अन् धुंदहि केलें !

— पण मी तेथे कां गेलो ? कसा गेलो ? अन् काय पाहिलें ?

— पुढच्या पानांतून तेच आता सांगायचे आहे.

## फिनी जनतेस —

विश्वशांति परिषदेच्या निमित्ताने तुमचा परिचय घडण्याची संधि मला लाभली. उत्तर ध्रुवबंधांत जाऊन मध्य रात्रीच्या तळपत्या सूर्याचें दर्शन घडलें. तसेंच तुमच्या निर्मितिक्षमतेचा बहुविध प्रयोगहि पहायला मिळाला.

मागच्या जागतिक युद्धांत अपरिमित हानि झालेल्या स्यॉमींत फिरून जीवन फुलविण्याचे प्रयोग मी जवळून पाहिले. या महत्तम कार्यांत तुम्ही स्त्री, पुरुष व विद्यार्थी किती बेहोषपणाने झटत आहांत हें पाहून मी थक्क झालों.

भांडवली चौकटींत असूनहि सहकारी अर्थजीवनाचा तुम्ही एक नमुना तयार केलात; स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रादेशिक कारभारांतले बरेच हक्क तोडून देऊन केंद्र सत्तेंतहि विकेंद्रीकरण करतां येतें याचा प्रयोग सिद्ध केलात; प्रमाणबद्ध वाटप करून जमिनीचा प्रश्न सोडविलात. विद्यार्थ्यांचें मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण सक्तीचें व बहुधा मोफत केलेंत; इतकेंच नव्हे तर त्यांना लागणारीं शालेय पुस्तकें व वह्या, पेन्सिली, दुपारचें सकस जेवण आणि अति थंडींत ऊबदार कपडे शिक्षणखात्यामार्फत फुकट पुरविण्याची अभिनव योजना सिद्ध केलीत; तसेंच अन्यत्र क्वचितच दिसणारी सर्व पक्षांच्या संयुक्त आघाडीवर अधिष्ठित अशी राजसत्ता निर्माण करून ती बऱ्याच प्रमाणांत यशस्वी केलीत. यामुळे एक स्थिर शासनसंस्था निर्माण होऊं शकली.

तुमच्या या राष्ट्रीय गुणांवर लुब्ध होऊन "फिनी-इन्दी" मैत्री दृढ व्हावी या हेतूने, तुमच्या देशासंबंधींची माझी ही कृति मी नम्र भावाने तुम्हांला अर्पण करीत आहे.

— लेखक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रमांक 23028 वि: 
क्रमांक 1 : 230 नों: दि: 

उत्तर ध्रुवबंधालगत पसरलेल्या फिन्लंड देशाच्या हेल्सिंकी या राजधानीच्या शहरांत विश्वशांति परिषदेचें १९५५ सालचें पांचवें अधिवेशन त्या वर्षीच्या जून महिन्यांत भरणार होतें, नि भारतांतून पुष्कळ लोक त्या अधिवेशनाला जाणार होते हें मी बरेच दिवसांपासून ऐकलेलें होतें. अलीकडच्या कांहीं वर्षांत भारतांतून सरकारी नि बिनसरकारी शिष्टमंडळें कोणत्याना कोणत्या निमित्तानें देशोदेशीं जात असतात नि तिकडचीं इकडे येत असतात. अशांपैकी कांहीं पाहुण्या प्रतिनिधींच्या स्वागत समारंभांत मीं भागहि घेतलेला होता. एकमेकांचा परिचय होऊन सांस्कृतिक देवाण घेवाण व्हावी नि परस्परांत स्नेहभाव वाढावा यासाठीं अशा भेटी-परतभेटी होणें उचितच आहे. भारत आता स्वतंत्र झालेला आहे. जगाशीं त्याला सलोख्याचे संबंध जोडायचे आहेत नि राखायचे आहेत. या दृष्टीने अशीं शिष्टमंडळें यापुढे आणखीहि जातील. पण त्यांतल्या एखाद्यांत आपला समावेश होईल अशी कल्पना माझ्या मनालाहि कधीं शिवली नव्हती. यामुळे एके दिवशीं हेल्सिंकी परिषदेला जाण्याचें निमंत्रण माझ्या दाराशीं येऊन थडकलें तेव्हां मी तर सदच झालो! मी काय ऐकलें यावर विश्वासच बसेना इतकें तें अकल्पित नि अचानक होतें. दिवसभर विचार करून मी जाण्याचा बेत निश्चित केला व तयारीला लागलो. यांतला सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे पासपोर्ट मिळविणें; पण त्यासाठी किती यातायाती! हा फॉर्म भरा, तो फॉर्म भरा; हें सर्टिफिकेट घ्या तें ॲफिडेव्हिट करा; सरकारचें मी कसलेंहि देणें लागत नसून ऋणमुक्त आहे अशा अर्थाचें इन्कमटॅक्सचें प्रमाणपत्र नि जामीनदारीचा करारनामा; हें टोंचून घ्या नि तें टोंचून घ्या; हेहि सर्व विधि उरकून झाले. महिना लोटला. ७ जूनला आमचें विमान जायचें होतें. तरी पासपोर्ट हातीं येईना. तेव्हां मन खट्टू झालें. आतां कसलें जाणें होणार! पण

तशांत तार आली की विमान सात ऐवजीं चौदा तारखेला निघेल. पुन्हा आशेची धुगधुगी उत्पन्न झाली अन् तेवढ्यांत, बलीच्या झारींत अडकून बसलेल्या शुक्राचार्यांप्रमाणे इतके दिवस रेंगाळत राहिलेली अडचण दूर होऊन पासपोर्ट बाहेर पडला नि ९ जूनच्या संध्याकाळीं तो माझ्या हातीं आला. मग मात्र जाणें नक्की ठरलें. आमचें विमान दिल्लीहून निघणार असल्याने मला ताबडतोब तिकडे जायला पाहिजे होतें. एकच दिवस मधे होता. त्यांत जमवाजमव करून मी घराबाहेर पाऊल टाकायला सिद्ध झालो.

दि. ११ जून १९५५ ला रात्रीच्या गाडीने मी दिल्लीला जायला निघालो. स्टेशनवर चिक्कार मंडळी निरोप द्यायला जमली होती. त्यांनीं सबंध डबा फुलांच्या हारांनीं सजवून टाकला. वेळ झाली. शिटी वाजली अन् जमलेल्या प्रियजनांना माझें शुभचिंतन करायला मागे ठेवून गाडीने फलाट सोडून काळोखांत उडी घेतली. भुर्रर्र... तिचा वेग वाढत चालला.

डोक्यांत विचार सुरू झाले. घर तर सोडलेच. मुंबईहि सुटली. दोन दिवसांत देश सुटणार. ती माती, तो निसर्ग, तें वातावरण, ते प्रियजन, सर्व नजरेआड झाले. अंतराचा पडदा निळा, काळा, गडद् होत चालला. आजपर्यंत पत्नीला सोडून मी एकटा कधी कुठें जात नव्हतो. संदीपला त्याच्या जन्मापासून कधी दृष्टिआड केला नव्हता. आजहि त्यांना बरोबर न्यायचें होतें. पण... आतां मीं चाललो. एकटाच चाललो. कुठे अन् किती दिवसांकरितां ? विमानाने जायचें आहे. नुकत्याच लागोपाठ दोनतीन विमानांना झालेल्या अपघाताची स्मृति ताजी झाली. परत येता येईल ना ! मन थोडे विचल झालें. खरे म्हणजे किती वर्षांची मनोवाञ्छा आज पूर्ण होऊं घातली आहे. १९२९ सालापासून परदेशीं जाण्याचा ध्यास मला लागला होता. "ने मजसी ने परत मातृभूमीला सागरा प्राण तळमळला" या स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या कवनाला अनुलक्षून मी तेव्हां एक कविता लिहिली होती:—

एक तपापूर्वी कोणी
कथिलें तुजसी कळवळुनी
सागरा नेई परतूनि
मद्भूली प्राण तळमळला

त्या तुला आजि वंदूनी
प्रार्थितों हृदय उघडूनी
द्वीपांतरि मज लागूनी
ने सख्या; प्राण तळमळला

विमानांचा वापर तेव्हा आजच्याइतका रूढ नव्हता नि सागर हीच प्रवासी कविमनाची आराध्य देवता होती. पण पन्नास वर्षांनीं आज त्या देवतेला कःपदार्थ लेखून वीर हनुमंताच्या ऐटीने व वेगाने मी सागराच्या डोक्यावरून भरारत उड्डाण करणार होतो. मग आता ही विकलावस्था कां?

मागच्या एकेक गोष्टी मला आठवूं लागल्या. गेलीं तीस पसतीस वर्षें मी आपल्या मगदुराप्रमाणे जगाचा व्याप आपल्या डोक्यांत सामाविण्याचा अट्टाहास करीत होतो. सार्वजनिक जीवनांत पाऊल टाकल्यापासून मेंदूचा हा खटाटोप सतत चालू आहे. अफाट पसरलेल्या या जगाच्या नजीकच्या व दूरच्या कोनाकोपऱ्यांत घडणाऱ्या घटना नि त्यांतून उठणारे स्फोट यांच्या मादक व दाहक संवेदना मी आत्मसात करीत आलेलो आहे. जुन्याची मोडतोड व नव्याची रचना यांतून उठणारे आक्रोश, आव्हाने नि आदेश यांनीं माझें मन भारले गेले आहे. मनोमय संबंध इतका घनिष्ट व साक्षात् असूनसुद्धा प्रत्यक्षतः त्यांचे माझे नातें एखाद्या इतिहास-भूगोलाच्या विद्यार्थ्यासारखे दूरचे नि स्थूल स्वरूपाचे असावे याची खंत मनाला सारखी लागून राहिलेली होती. मन त्रिखंडांत भरारत होतें व देह त्याच्यामागून धाव घ्यायला आधासलेला होता. मध्यंतरी देशाबाहेर जाण्याचे दोन प्रयत्न मी केले होते नि ते फसले होते. मग मी तो नाद सोडून दिला. नंतर थोड्याच दिवसांनीं म्हणजे १९३० सालीं भारताच्या राष्ट्रीय परिस्थितीने पेट घेतला व मी महाराष्ट्रांत जंगल सत्याग्रहाच्या चळवळीच्या मागे लागलो. त्यांत शिक्षा झाली. ती भोगून संपतांच पुन्हा राजद्रोहाच्या दोन खटल्यांत अडकलो व शिक्षा भोगल्या. या सर्व प्रपंचांत तीन वर्षें उलटून गेलीं होतीं व कायदेभंगाची चळवळ संपुष्टांत आली होती. नव्हे प्रांतिक स्वायत्ततेचे अधिकार मिळण्याचे वेध लागले होते.

या नंतरच्या दोन तीन वर्षांतच इटली, जर्मनी, स्पेन, पोर्तुगाल या देशांत फॅसिझमचा ज्वालामुखी खदखदूं लागला. त्याचे उष्ण वारे युरोपच्या

आसमंतांत वाढूं लागले. आक्रमक शक्ति प्रत्यहीं शिरजोर होऊं लागल्या. स्पेनमध्ये क्रांति झाली व तिचा बीमोड होऊन हजारो स्वातंत्र्यवाद्यांची कत्तल झाली. चीनवर जपानचें आक्रमण झालें व त्याला निग्रही व सतत प्रतिरोध सुरू झाला. मानव संहाराला ना मिती ना क्षिती. भारतीय आत्मा कविवर रविंद्रांच्या कंठाने आक्रंदू लागला. तोंच म्यूनिच करार होऊन झेक राष्ट्र स्वाहाकार होऊं लागलें. युद्ध पेटलें. पूर्व युरोपांत भस्मासूराचें थैमान माजलें. कल्पांत सुरू झाला. दुसरें म्हणजे मागलें जागतिक युद्ध हा खरोखरच कल्पांत होता. म्हणजे एका कल्पाचा यांत अंत झाला व नवकल्पाचा प्रारंभ झाला—पूर्व युरोपांत तसाच पूर्व आशियांत !

या नवकल्पाचें व त्याने निर्मिलेल्या नवजीवनाचें जवळून दर्शन घ्यावें, त्या वातावरणाचा उबारा उरांत भरून घ्यावा, ही ओढ अलीकडे मनाला सतत लागलेली होती. या नवकल्पाचा साक्षात्कार भारतालाहि झाला होता. १५० वर्षांचें पारतंत्र्याचें जराजीर्ण जोखड झुगारून देऊन भारत आतां स्वतंत्र–पूर्णस्वतंत्र–सार्वभौम झाला होता. नवरचनेचा उल्हास त्याच्या हृदयांतून ओसंडत होता, विशाल जीवनाची नवरचना शेजारीं पूर्वेला व डोक्यालगत उत्तरेला घडत होती. हें नवविधान डोळ्यांनीं पाहावें, त्याच्या वातावरणांत वावरावें, त्या स्फूर्तीने हृदय भरून घ्यावें, यासाठीं जेवढें जग पाहतां येईल तेवढे पाहून घ्यावें. आता सत्ता आमच्याच लोकांच्या हातीं आलेली आहे, पासपोर्टला आता. काय अडचण पडणार आहे असे बेत करीत त्या खटपटीलाहि लागलो होतो. तोंच एके दिवशीं सकाळीं माझ्या दारांत ती शुभंकर संधि येऊन उभी राहिली. अक्षरश: ध्यानींमनीं नसतां ही संधि आली ती फिन्लंडला जाण्याचें निमंत्रण घेऊनच ! इतक्या खडतर सायासानंतर आज देशाबाहेर जाण्याची संधि आली असतांना घरांतून बाहेर पडतांना मनाला विकलावस्था का यावी ? पण ती क्षणिक होती तशी सत्य होती.

रात्रीचे बारा वाजले. महाराष्ट्रभूची हद्द केव्हांच ओलांडून गाडी गुजराथ प्रदेशांतून धांवत होती. डब्यांत गर्दी अतोनात असल्याने झोपण्याची तर शक्यताच नव्हती. पहाटेस बडोदा स्टेशन लागलें. तिथे दोन जोडपीं उतरलीं म्हणून हातपाय तरी हलवितां आले. चहा घेतला अन्

बरोबर न्याहारीला ‘ टाईम्स ’. पहिल्याच पानावर जाड टाईपांत मजकूर होता. ‘ Revolutions not for export. ’ आमचे पंतप्रधान नेहरू या वेळीं रशियाच्या दौऱ्यावर होते. त्यांच्या सन्मानार्थ दिलेल्या मेजवानीच्या प्रसंगीं तिथल्या कम्युनिस्ट पक्षाचे सर चिटणीस कॉ. क्रुश्चेव्ह यांनीं केलेल्या भाषणाचा तो अहवाल होता. “ नेहरू सरकार प्रागतिक असल्याने भारतांतील कम्युनिस्टांसुद्धा सर्व पुरोगामी लोकांनीं त्याला पाठिंबा द्यावा व पंचवार्षिक योजना यशस्वी करण्यांत मदत करावी” असा त्या भाषणांत निर्वाळा व उपदेश होता. पहाटेच्या रामप्रहरीं विचारांचें काहूर शमून डोकें नुकतेंच थोडें शांत झालें होतें. त्याला या अनाहूत आवाहनाने पुन्हां गति मिळाली. आतांपर्यंत नेहरूंचा व्यक्तिमहिमा जाणण्याचा प्रश्न होता. जगांतली युद्धें रोखून धरूं पहाणारी शक्ति; शांततामय सहजीवनाचा प्रभावी प्रचार करणारी व्यक्ति; सहनाववतु सहनौ भुनक्तु सहवीर्यं करवावहै या मंत्राचा नव्या जोमाने व नव्या अर्थाने उद्‌घोष करणारी व्यक्ति सर्वत्र आदरणीय मानली जावी, व तिच्या या उद्‌घोषाचा सर्वत्र पाठपुरावा केला जावा हें अत्यंत योग्य व समुचित आहे. पण गोव्याचा प्रश्न; भाषावार प्रांतरचनेचा म्हणजे विशेषत्वाने महाराष्ट्र व मुंबईचा प्रश्न; राष्ट्रीय भांडवलीकरणाचा प्रश्न; जमिनींचा व परकीय मक्तेदारीचा प्रश्न; यासंबंधीं अगतिकच नव्हे तर परागतिक धोरणाचा पाठपुरावा करणारें समष्टिरूप भारतीय सरकार पुरोगामी ठरावे म्हणजे कॉंग्रेसच पुरोगामी ठरते; मग अन्य पक्षांची आवश्यकताच रहात नाहीं हें निष्पन्न होतें. काहीं तरी फार मोठी गल्लत होते आहे. क्रुश्चेव्ह चुकताहेत किंवा आपण जन्मभर चुकत आलों आहोंत, किंवा निदान या भाषणाचा अर्थ तरी अपूर्ण आहे खास असे विचार चालू झाले नि किती तरी तास ते डोक्यांत रेंगाळत राहिले. हट्टी पिशाच्चाप्रमाणे आणखी किती वेळ ते मला पछाडत राहिले असते कोण जाणे; पण ‘ साहेब, जेवण आणूं का ? ’ या प्रश्नाने ती सांखळी तुटली व पोटापाण्याच्या निकडीच्या प्रश्नाकडे लक्ष वळलें. कारण आतां दुपारचा बारा वाजण्याचा सुमार झाला होता.

माझ्या डब्यांत चार लष्करी जवान होते त्यांचेंहि जेवण झालें. आम्हीं पांचजण समोरासमोर बसलो होतो. जेवता जेवता त्यांच्या नाईकाने बोलणें

सुरू केलें. पंडितजी सध्या रूसी दौऱ्यावर आहेत. त्यांचा तिकडे मानसन्मानहि पुष्कळ होतो आहे. पण काय फायदा आपल्याला रूसच्या मैत्रीचा? त्याच्या हातांत हिंदी पत्र होतें. त्यांतला नेहरूंच्या दौऱ्याच्या वर्णनाचा भाग माझ्यापुढे करीत तो प्रश्नार्थी उद्गारला. मी म्हटलें कां असे म्हणतां! त्या जवानानें खुलासा केला :

"सुना है की वो लोक धरम नहीं मानते."

"लेकीन उसे हमे क्या मतलब?"

"मतलब ये की उनकी दोस्तीमें यहाँ कम्युनिझम आया तो हमारे धर्म का और रामायण विगैरा ग्रंथोंका क्या होगा?

प्रश्न किती अप्रयोजक होता हें तर स्पष्टच आहे. पण त्यांतली खोंच लक्षांत घेऊन मी उत्तर दिलें :

"क्या होगा? ये पूछ लो की अभीतक क्या हुवा है। आप शायद जानते नहीं की लेनिनग्राडके एक शख्सने तुलसी रामायण का रूसीमें अनुवाद किया है।"

"ये आप क्या कह रहे हो?"

"हां, ठीक तो कह रहा हूं. और ये भी समझ लो की बहोत कुछ पुराने संस्कृत ग्रंथो का अनुवाद हो रहा है, अध्यात्म रामायन और महाभारत का भी."

गृहस्थाच्या मानीव कल्पनेला माझ्या या उत्तरानें जोराचा धक्का दिला खास. "तो क्या आप मानते हो की रूस सचमूच हमारी दोस्ती चाहता है?" त्यानें प्रश्न केला.

"हां. जितनी हम चाहते हैं." मी म्हणालो.

"ये भी ठीक है. लेकीन, वो चीनवाले आये थे न? चाऊ-एन-लाय साहब; बस, हमारे जवान उनसे बहोत खुष थे. और है भी तो अपने पडाँसी."

चाऊ-एन-लायवर हा गृहस्थ एकदम खूष दिसला.

दोहद स्टेशनाबरोबर आम्हीं गुजराथची भूमीहि मागे टाकली व हिंदी प्रदेशांत शिरलो. काहीं वेळ मध्यप्रदेशांतून प्रवास करून आम्ही राजस्थानांत प्रवेश केला. उष्मा तर अतिशय वाढला होता. हुश्श हुश्श करीत क्षणामागून क्षण मागें लोटत होतों. गर्दीहि सारखी वाढत होती. पुस्तक

घेऊन बसलो पण लक्षच लागेना. या जून महिन्यांत उकाडयाने जिथे मेंदूच वितळायचा तिथे तो पुस्तकांतले काय ग्रहण करणार ! अशा अवस्थेत केंव्हां विचारांत गढलो अन् केंव्हां हातांतले पुस्तक गळून पडले याचेंहि भान राहिलें नाहीं.

दौऱ्यासंबंधाने इतकेंच आज निश्चित ठरलें होतें की फिन्लंडहून रशियाला जायचें. पण हा दौरा संपवून मी पश्चिम युरोपचाहि प्रवास करायचें मनाशीं ठरविलें होतें नि त्या दृष्टीनें ३—४ महिने घराबाहेर राहण्याच्या तयारीने निघालो होतो. गाडी आपल्या ठरलेल्या वेगानें धावत होती. उद्यां सकाळीं दिल्ली. तिथून एक दोन दिवसांनीं पुढच्या वाटेवर अन् आणखी दोन दिवसांनीं खुद्द फिन्लंड देशांत. हा हिशेब अगदीं सरळ होता व माहीत होता. पण अवखळ मनाला तेवढी उसंत होती कुठे ! अज्ञाताचा अंदाज बांधीत तें पुढे पुढे धावत होतें. फिन्लंड देश कसा असेल ? तिथले लोक कसे असतील ? थंडी कितपत असेल ? मन कल्पनेने हें सर्व हेरत होतें. एक मनोनिर्मित सृष्टि माझ्यापुढे उभी राहिली व तिच्यांत मी अभावितपणे वावरायला लागलो. मनाला जे जे रुचलें तें तें तिने माझ्यापुढे रचून उभे केलें. उत्तर ध्रुवावर मला नेऊन आणलें. ती देवभूमि व तो देवाचा दिवस तिने मला दाखविला. क्षितिजावर मध्यरात्रीं तळपत असलेल्या सूर्याला मी अर्घ्यप्रदान केलें. ॐ तत्सवितुर्वरेण्यम् भर्गो ऽ देवस्य धीमही । धीयो योनः प्रचोदयात् ! सुशुप्तींतून किंवा तंद्रींतून घडलेल्या गायत्री मंत्राच्या प्रार्थनेने प्रसन्न होऊन त्या हिरण्मयाने धीला इतकी प्रचोदना दिली होती — म्हणजे स्वप्नाळू कल्पना इतकी तरल व मोकाट झाली होती, की मी बसल्या जागींच अंतराळासमीपच्या पितृभूमींत वावरूं लागलो.

खिडकींतून माझी नजर समोर गेली. प्रसन्न मुद्रेने नि मार्दव दृष्टीने भास्वन् माझे कौतुक करीत होता. अन् कां नाहीं करणार ? सुमारे दहा हजार वर्षे झालीं. त्याचे निःसीम उपासक देव भूमी सोडून त्याला पाठमोरे झाले होते. त्यांची सोबत करायला सूर्याला हजारो मैलाचा प्रवास करीत रोज रोज भारताकडे यावे लागत होतें. त्या पळपुट्यांचा कोणी एक परात्पर वंशज आपले निवासस्थान सोडून माझ्या दर्शनासाठी देवलोकीं धांव घेतो आहे याची धन्यता त्याला कां न वाटावी ? अन् हें दर्शन तरी कसें ? भर

वस्तीत बांधलेल्या देवळांतल्या शंकराचें दर्शन कोणीहि घेईल; पण खरा भक्त तो, की जो धो धो पडणाऱ्या पावसांत पुराने तुडूंब भरलेली नदी ओलांडून गांवाबाहेरच्या मसणवटींतल्या देवळांत जाऊन श्रावणी सोमवारीं तिन्हीसांजा त्या रुंडमालाधराचें दर्शन घेईल! लहानपणीं सदाशिवाचीं अक्षरशः अशीं दर्शनें मी घेतलीं आहेत. तसाच आतां भगवान् सूर्याला थेट त्याच्या अंतःपुराच्या उंबरठ्यावर गाठून तिथे त्याचे दर्शन घ्यायला मी निघालो होतो. माझा मनोमय आविर्भाव हा होता की वीस अक्षांशावर (मुंबईत) राहणाऱ्या आम्हा भारतीयांना कुट्ट काळोखांत बुडवून तूं रोज रोज निसटतोस तरी कुठे? तूं आम्हांला सोडून जाऊं नयेस, अहर्निश आमच्या प्रदेशावर तळपत रहावें म्हणून आम्ही तुला रोज अर्घ्य देतो, आमचीं मुलें रोज तुला बारा नमस्कार घालतात, आमच्या बायका सूर्यदेवाची कहाणी सांगतात, नाना प्रकाराने आम्ही तुला आळवतों. तरी तूं आम्हाला दाद देत नाहींस. तुकाराम महाराजांच्या फटकळ अवसानाने आज मी तुला बजावतो आहे, की देवा, ही तुझी बेमुर्वखोरी आता चालणार नाहीं. तूं असा रोज रोज लपंडाव चालवतोस तर आता तूं जिथे जाऊन दडतोस तिथे चालून येऊन मी तुला हुडकून काढणार. आता कळले आहे तुझे गुपीत आम्हाला. तूं ७० अक्षांशाच्या भिंताडाआड जाऊन दडतोस नाहीं का? ठीक आहे. आता मी तुझा पुरा पिच्छा पुरवणार. थेट तें भिंताड गाठणार. त्याच्यावर चढून तुझ्या शैयागारांत तुझें दर्शन घेणार. ही माझी भीष्म—नव्हे अस्मत्—प्रतिज्ञा करून मी या वेळीं घराबाहेर पडलो होतो. माझा हा निश्चय व धाडस कळल्यावर त्याला कौतुक वाटणार नाहीं असें कसें होईल? माझ्या अंगिकृत कार्यांत तो शुभंकर होणार नाहीं, मला बलवान् व धीमान् करणार नाहीं असें होणारच नाहीं.

"क्यौं साहब, भोजन कब करोगे? आठ बज चुके." कानांत हे शब्द घणघणले अन् मांडीला राकट हाताचा स्पर्श जाणवला. समोर बसलेल्या लष्करी जवानाचा सवाल होता तो. अरेरे! थेट केशवसुतांच्या ऐटीने प्रतिभेच्या पंखावर मी इतका वेळ भरारत होतों. पण लष्करी शिस्तीच्या या रांगड्या जवानाने माझा एकाएकी असा कडेलोट केला! तासभर धापा टाकून तहानलेली गाडी पाणी ढोसण्यासाठी थोड्या वेळांत थांबली नि आमचीं

जेवणाचीं ताटें आलीं. आम्हीं जेवण उरकलें. नंतर त्या जवानाने खिशांतून दोन खाखी विड्या बाहेर काढून एक माझ्यापुढे केली.

"माफ कीजिये, मै नहि पिता" मी उत्तर दिलें.

"क्या कहेते हो. कभी नहि पिते?" त्याला आश्चर्य वाटलें.

"सच कहता हूं. देखा आपने दिनभरमें?" मी विचारलें.

"बराबर है. देखा तो नहि. लेकीन अब तो लेनीहि पडेगी. आप बहोत दूरतक जा रहे हो; ये रामपालसिंगसे फीर कब मुलाकत होगी."

अन् त्याने ती विडी माझ्या हातात कोंबलीच. रांगडा पण निर्व्याज मनाचा रामपालसिंग खाखी विडीच्या रूपाने आपल्या निखालस मोहबतीचा वर्षाव करीत होता. माझा निरुपाय झाला. मी ती घेतली अन् आपल्या मामा वरेरकरांच्या बाबा शिगवणच्या ऐटीने शिलगावली. तासभर इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर बजरंगाच्या चापल्याने वरच्या फळकुटावर उड्या मारून ते जवान झोपण्याच्या तयारीला लागले, व मीहि आपला देह किंचित् कलंडता केला. झोपायला तर जागा नव्हतीच. कारण लोकशाहींतल्या दुसऱ्या वर्गाचा तो डबा होता. सर्व भूतमात्र जेव्हा झोपतात तेव्हा जागत राहणाऱ्या संयमीप्रमाणे सारी रात्र जागून काढून व पहाटेच्या गारव्यांतली एक डुलकी घेऊन चहा घेण्यासाठी मथुरा स्टेशनवर जागा झालो. तिथे बरेच लोक उतरल्याने पाय लांब करायला आता जागा झाली होती. सुमारे दोन तासांनीं दिल्लीला पोंचलो. मुंबई ते दिल्ली—घर व मी—साडेआठशे मैलांचें अंतर आमच्यामधे आडवें पडले होते.

दिल्लीला उतरलो तों तडक बृहन् महाराष्ट्र भवनांत गेलो. गेल्या वर्षी साहित्य संमेलनासाठी दिल्लीला आलों होतों तेव्हां अचानक पावसाने झोडपले गेलो असतां मुलाला पोटाशीं धरून याच भवनाच्या पायरीवर याचकाच्या लाचारीने आम्ही उभे होतो. भवनांत त्यावेळी मुळीच जागा नव्हती म्हणून आश्रय मिळाला नाहीं. पण हल्ली न्यायालयें व पार्लमेंट यांना सुटी असल्याने आज वाटेल तेवढी जागा मोकाट पडली होती. स्नानादि विधि उरकून चहा घेतला व शांतता समितीच्या कार्यालयाकडे गेलो. परदेशच्या प्रवासाचे व्हिसा आदि अवश्य असलेले सर्व विधि उरकून भवनांत परत आलो. उष्णतामान १०७-०८ असल्याने जिवाची तगमग होत होती. कसा तरी

दिवस काढला व संध्याकाळीं श्रीमती रामेश्वरी नेहरू यांच्या निवासस्थानीं शिष्ट मंडळाची बैठक होती तिथे गेलो. रामेश्वरी नेहरू या पुनर्वसाहत खात्याच्या सल्लागार असून पंत प्रधानांच्या काकी आहेत. माताजी हें दिल्लीचें फार मोठें प्रस्थ आहे. कर्तबगार पण तशाच आहेत. रात्रीं परत येऊन जेवलो व झोपण्याची खटपट करूं लागलों. अंगाची तगमग चालूच होती. खुर्च्या गरम, हंतरुण गरम, उशी गरम, डोक्यावर पंखा चालू होता पण त्याचा वाराहि गरमच. अर्धीअधिक रात्र उलटून गेल्यावर किंचित् थंड वाटले, व केव्हांतरी झोप लागली.

सकाळीं थोडा उशीराच उठलो. दिवसभर तसें कामहि नव्हतेच. आमचे विमान आज मध्यरात्रीं निघायचें होतें त्यासाठीं रात्रीं १० वाजेपर्यंत पालमच्या विमानतळावर पोचायचें होतें. मनाला दिवसभर एक प्रकारची रुखरुख लागली होती. आज आपण आपला प्रिय देश व प्रियजन सोडून जाणार. दूर दूर जाणार. या घटकेपर्यंतचें ठीक आहे. वाटेल त्या क्षणीं परतीचें तिकीट काढून घर गांठतां येईल. पण रात्रीं विमानाने एकदां ही जमीन सोडली कीं मग मात्र मनाला काहीं वाटो; आपल्यांतली मनमुखत्यारी संपली. ही जाणीव थोडी बेचैनी उत्पन्न करीत होती. तसें म्हटलें तर दूर काय आहे? दिल्लीला यायला जितका वेळ लागला त्याच्या फक्त दुप्पट वेळेचा पुढचा प्रवास होता. पण झाला हा प्रवास जमिनीला धरून, तिच्या आश्रयाने झाला. पुढचा प्रवास अधांतरीं तरंगण्याचा होता. रुखरुख लागण्याचे आणखी एक कारण होते. अजूनपर्यंत मी परदेशाचा कधीं प्रवास केला नव्हता. भारतांतल्या प्रवासाची गोष्ट निराळी. इथे आपल्याच मुखवट्याचे अन् हावभावाचे लोक आहेत. आता भिन्न संस्कृति, भिन्न अभिरुची, भिन्न चालीरीति व भिन्न राहाणी असलेल्या लोकांत जाऊन पडायचे होते. तिथे सृष्टीची अन् मानवाची प्रकृति भिन्न असणार होती. त्यांच्यांत जाऊन समरस होणे तर दूरच; पण निदान त्यांच्यासारखे अवसान राखून तरी वावरतां येईल का? खाण्यापिण्याचें कसें काय जमणार? असल्या शंकाहि मनाला अस्वस्थ करीत होत्या.

आणखीहि एक चोरटे पण प्रबळ कारण मानसिक अस्वस्थतेच्या बुडाशीं होतें. ज्या जागतिक शांतता परिषदेला आपण जात आहो तिथे खरोखर आपण काय दिवे लावणार? आपण कोण असे लागून गेलो

अनुक्रम ...२३०२४... दि: ...२२-५-७२
क्रमांक ...२३०... नों० दि: ...२२/५२



आहोंत, कोणत्या विषयाचे तज्ञ म्हणून आपली लायकी आहे, केवढाल्या जगद्विख्यात व्यक्ति, गाढे पंडित, चतुरस्त्र शास्त्रज्ञ तिथे जमणार. त्यांच्या-पुढे आपला काय पाड ? तिथल्या चर्चेंत आपल्याला काहीं सांगतां येईल का कीं चार भारतीय ठोकळे आणून बसविले होते त्यांतलाच मीहि एक अशी आपली संभावना होणार ? भारतांत परत आल्यावर लोक विचारतील त्यांना उत्तर देतां येण्यासारखे होईल का आपल्या हातून काहीं ? खरे म्हणजे याच गोष्टींचें फार मोठें दडपण माझ्या मनावर होतें. इथून निघतांना ते जसे होते तसेच हेल्सिंकीला पोंचल्यावरसुद्धा दोन तीन दिवस तें मला भेडसावीत राहिलें. पण जसे ते अनाहूत होते तसेच अभावितपणे ते झटकले गेले. त्या दिवशीं एका बडया धेंडाशीं एका अगांतुक कारणाने मी वाद-विवादांत ओढला गेलो. त्यांत माझी सरशी झाली. तेव्हांपासून न्यूनगंडा-सारखी लगडून राहिलेली ही रुखरुख नाहींशी झाली नि मी शेर बनलो.

एअर इंडिया कार्पोरेशनच्या स्काय मास्टर या विमानाने आमचा प्रवास व्हायचा होता. ठरल्यावेळी विमान तळावर जाऊन पोंचलो. पासपोर्ट, हेल्थ सर्टिफिकेट, कस्टम्स, करन्सी, वजन, माप, असे सतरा प्रकारचे विधि आटोपायला तब्बल दोन तास लागले व यमघंटा टळून गेल्यावर अर्ध्यातासाने म्हणजे बरोबर १२।। वाजतां उड्डाण करण्याच्या तयारीने विमानाची घरघर सुरू झाली. प्रथम सामानाला लेबलें लावून तें चढविण्यांत आलें, अन् सूचनेची शीळ झाली. आम्ही विमानाशीं गेलों. इतक्या जवळून मी विमान कधीं पाहिले नव्हते. घरघर तीव्र होऊं लागली. कर्कश शिट्या वाजूं लागल्या. जवळ जाऊन विमान आपादमस्तक पाहून घ्यायचें तर गलिव्हरसारखें अजस्त्र तें अन् त्यांच्या पोटालाहि न पुरणारा लिलिपूट मी ! आंत जाण्याची कॅप्टनने सूचना दिली. ती ऐकून शरीरांत झिणझिणी आल्यासारखे झाले. मन म्हणत होते, नीट विचार करून शिडीवर पाऊल टाक. एकदां पाऊल टाकलेस कीं मागे घेतां येणार नाहीं. मग विमान अन् तूं. जिकडे ते तिकडे तूं. जसें असेल तें तसा तूं असणार. नऊ पायऱ्या चढून गेलो. दहावी ओलांडली की अजस्त्र राक्षसाच्या पसरलेल्या जबड्यांत अलगद जाऊन पडणार. त्या पायरीशीं किंचित् थांबून आंत डोकावून पाहिलें व निग्रहाने लांब पाऊल टाकून

शिडीचा नि जमिनीचा आधार लाथाडून शंभर माणसांना सहज सामावून घेणाऱ्या त्या विमानाच्या पोटांत पाऊल टाकलें नि बैठक गाठली. बैठक कलंडत्या आरामखुर्चीसारखी. आपल्या बससारखीच आंत बसण्याची व्यवस्था असते. इकडे दोन व तिकडे तीन बैठकांच्या रांगा व मधून जाण्यायेण्याची अरुंद पाऊलवाट. खुर्चीच्या पाठीला असलेल्या पिशवींत एक पंखा, एक छत्री ( विमानांतून बाहेर उडी टाकायची वेळ आल्यास वापरण्याचें पॅरेशूट ) व मळमळ झाल्यास त्यासाठीं कागदाची एक पिशवी. बैठकीच्या बाजूला बाहेर पाहाण्यासाठी घट्ट तावदान बसविलेली गोल खिडकी. बाहेरची हवा आंत येण्यासाठी डोक्यावर एक बाटली. अर्थात् वर जाऊन उडूं लागल्यावरच या बाटलींतून हवा आंत येत असल्याने आत्ता मात्र अंगांतून शतधारा वहात होत्या. तशांत उडण्याची तयारी झाल्याने दार बंद झालें, व विजेचा बोर्ड उजळला. ‘ कमरपट्टे घट्ट बांधा, विडी ओढूं नका ’ कानठळ्या बसूं नयेत म्हणून कानांत बोळे घालण्यासाठीं होस्टेसने कापूस आणून दिला. कर्कश्श भोंगे नि सूचनेच्या शिट्या झाल्या. झोपाळ्यावर आपण बसलेले असावें अन् मागून कोणी हळूंच तो लोटावा तसें किंचित् हलल्यासारखें झालें. विमान थोडा वेळ मोटारीसारखे सरपटत राहिलें आणि मग आपण सरपटतहि आहोंत नि उचललेहि जात आहों असा भास होऊं लागला. थोड्याच वेळाने सदेह ‘ वर ’ जात असल्याच्या अंतर्बाह्य भावना जाणवूं आगल्या. आत्तापर्यंत समोर असलेले दिवे आपल्या खालीं खालीं सरकत आहेत हें कळूं लागलें. मानेचा काटा मोडेल इतकी ती उंचावून उंच उंच इमारतींचीं गगनस्पर्शी शिखरें पाहावी लागत त्या इमारती आतां बुद्धिबळाच्या पटावर मांडलेल्या प्याद्यांसारख्या खालीं खालीं दिसूं लागल्या, नि थोड्या वेळांत अंतर्धान पावल्या. विमानांतले दिवे तर केव्हांच मालवले गेले होते. वर गेल्यावर गारवा आला, इतका कीं अंगावर घ्यावेसें वाटूं लागलें. थोड्याच वेळाने बसल्याजागीं झोप लागली. एव्हांना भारताची हद्द ओलांडून आम्ही पाकिस्तानच्या हद्दींत शिरलो असूं. पण काळोखांत कळणार काय अन् कशाला ! विमान हवेवर तरंगत होतें अन् आम्हीं झोपेच्या हिंदोल्यावर झुलत होतों.

◆ ◆ ◆

: २ :

आज पंधरा तारीख. सकाळीं जागा झालों तेव्हां बरेंच उजाडलें होतें. पहिल्या कुतुहलाने खिडकीबाहेर पाहिलें तर खालीं धुकें पसरलें होतें. मधून मधून रेताड जमीन दिसत होती. आपण कुठे आहो तें चटकन् उमगेना. पण मग लक्षांत आलें कीं अरबस्तानाच्या रेताड वाळवंटावरून आपण उडत आहोत. झोपेंत कराची तर गेलीच पण अरबी समुद्रसुद्धा मागे पडला. मुंबईत जन्म घालविल्याने अरबी समुद्र तेवढा माझ्या नित्य परिचयाचा होता. पण त्याचें दर्शनच घडलें नाहीं. जागा झालो तो चूळ भरायलासुद्धा विमानांत पाणी नव्हतें. कराचीला विमान थांबलें नाहीं म्हणून पाणी भरून घेतां आलें नाहीं व सांठा संपला. मग चहाचीच चूळ भरली नि तात्पुरतें काम भागविलें. एव्हांना सूर्य बराच वर आल्याने धुकें कमी होऊन खालचें दिसूं लागलें होतें. सुमारे दहाला आम्ही बेहेरीनच्या विमानतळावर उतरलों.

विमानाबाहेर पाऊल टाकलें तों अंगाची लाही लाही होऊं लागली. जून महिन्याचे दिवस. दिल्लीपासूनच उष्मा लागला होता. आता तर काय प्रत्यक्ष वाळवंट—रसरशीत अरबी वाळवंट; थर्मामीटरसुद्धा फुटायचें इथे ! घामाच्या धारा ओघळत होत्या. खोळंबून राहिलेले सर्व प्रातर्विधि उरकले, चार सचित्र कार्डे घेऊन खरडून टाकलीं. कार्डाला आठ आणे नि तिकिटालाहि तेवढेच. इथे भारतीय नाणें सर्रास चालतेंसे दिसतें. नंतर जेवायला गेलो. पावाचा तुकडा घेऊन लोणी लावीत होतो तों गव्हाची खीर आली. ती फस्त केली तों दुसरी एक बशी आली. त्यांतले सोयाबीन तर मी ओळखले; पण दुसरा पदार्थ ओळखूं येईना. चांगले मोठेसे केळें सोलून ते तुपावर परतून घेतले तर जसे दिसेल तसे तें तांबूस केळ्यासारखे दिसे. माझ्या शेजारीं

मुंबईचे एक साहित्यिक मित्र त्याच पदार्थावर ताव मारीत होते. त्यांना विचारलें. ते म्हणाले, "अहो विचारता काय? खा; फार छान आहे,"

"ते तर दिसतेंच आहे; पण आहे काय ते तर सांगा" मी म्हटलें.

"अहो, ते सोयाबीन अन् ते डुकराचें मांस. फार छान लागतें."

मी त्या पदार्थाकडे पुन्हां एकदां निरखून पाहिलें व म्हटलें, "मला नको ते."

"अहो, मग खाणार काय तुम्ही? अशाने उपाशीं रहाल की!"

"खाईन कांहीं तरी दुसरें. हे परत करतो."

"नको नको, परत कशाला करता? तुम्हाला नको असेल तर आम्ही आहोत कीं."

मी ती बशी त्यांच्यापुढे सरकावली. तेवढ्यांत वेटर भात घेऊन आला. बेस जमलें आता, मी दूधभात खाल्ला नि वर चहा घेतला. चहा फारच छान होता. जेवण संपलें व थोडी विश्रांति घेतली. साडेबारा वाजतां विमानाने सायप्रसकडे झेप घेतली.

उकाड्याने जीव हैराण झाला होता. आगीच्या डोंबांत उभे आहोंत असें वाटे. असा उष्मा कल्पनेलाहि कधी आला नव्हता. पण विमान मग नऊ हजार फुटांवर गेलें तेव्हां चांगलाच गारठा वाटूं लागला. पहाण्यासारखे या प्रदेशांत असणार काय? वर आकाश अन् खाली तसेंच अफाट वाळवंट नि रखरख. रुक्ष हा शब्द या रखरखींतूनच निष्पन्न झाला असेल का! वेळ अगदीच कंटाळवाणा झाला होता. आमच्या घड्याळांत आता भारतीय कालगणना पद्धतीचे पांच ( संध्याकाळचे ) वाजले होते. पण इथे या वेळीं मध्यान्हकाल होता. विमानाच्या कप्तानाकडून सूचना आली कीं घड्याळें साडेपांच तास मागे करा; म्हणजे आमच्या घड्याळांत पांचाचे आता एकदम साडेबारा वाजले. हा जागतिक म्हणजे ग्रीनवीच टाईम होता. या वेळीं आम्ही दहा हजार फूट उंचीवरून उडत होतों व विमानाचा वेग ताशीं १८० मैलांचा होता. इथून आता दमास्कस अर्ध्या तासाच्या म्हणजे शंभर मैलांच्या अंतरावर होतें. त्यानंतर दीड तासाने सायप्रसच्या निकोसिया विमान तळावर आम्ही थांबणार होतो. विमानाच्या कॅप्टनकडून दिवसांतून

दोनदा माहिती पत्रकें निघत व त्यांत आम्ही त्या वेळी कुठे असूं, पुढचें विसाव्याचें ठिकाण कोणचें व किती दूर असेल, किती उंचीवरून व काय वेगाने आम्हीं जात असूं नि हवामान काय असेल ही माहिती देण्यांत येत असे. थोड्याच वेळांत दमास्कसवरून आम्हीं जाऊं लागलों. शहर स्वच्छ व रस्ते डांबरी दिसले. दुतर्फा ओळीने टुमदार घरें दिसलीं. इथली वस्ती ३-४ लाखांची आहे म्हणतात. सर्व भाग डोंगराळ आहे. डोंगरावरून नागमोडी वळणाने जाणारे रस्ते व घरें असलेली आणखी एक-दोन शहरें लागलीं. त्यानंतर नीटनेटक्या मांडणीचें शेखचें बिरूत लागलें. पुढे सरकलों तों तांबड्या समुद्रावरून—समुद्र कसला, कलकत्त्याचें गंगेचें पात्रच तें! भूमध्य समुद्रावर आलों. रुक्ष वाळवंट मागे पडून हिरव्या निळ्या पाण्यावरून उडत दुपारी अडीच वाजतां सायप्रसच्या निकोसिया विमानतळावर टेकलों. विमानाचें दार उघडून हेल्थ ऑफिसर आंत आला व दार लावून घेऊन डी. डी. टी.चे फवारे मारले. रोगवाही जंतूंचा अशा रीतीने बंदोबस्त केल्यावर पांच मिनिटांनीं दार उघडलें व आम्ही बाहेर पडलों. ग्रीनवीच टाईम अडीचचा असला तरी इथला टाईम चाराचा होता.

सायप्रस:—ग्रीसच्या उज्ज्वल भाग्यकालीं हें बेट त्याच्या ताब्यांत होतें. रोमन व ग्रीक इतिहासांतसुद्धा सायप्रसचा उल्लेख ग्रीसचें बेट म्हणूनच आहे. पण आज हें बेट ब्रिटिशांचें संरक्षित कुरण (Protectorate) बनलेलें आहे. युरोपांत जातांना व येतांना दोन्ही वेळां आम्ही तीथे थांबलों. जेवण घेतलें. येतांना तर मी आजारी असल्याने तेथल्या डॉक्टरांनीं मला औषध दिलें. आपल्या जागेंत नेऊन बसविलें. त्यांच्या पत्नीने येऊन माझी आस्थेने चौकशी केली. डॉक्टर ग्रीक होते. भोंवतालीं दिसणारें जग प्रसन्न व आनंदी होतें. सर्व कारभार सुरळीत व खेळीमेळीने चालला होता. आमच्या सारखेच काहीं युरोपियन प्रवासी आपापल्या विमानांची वाट पहात बसले होते. हसणे-खिदळणे, चालले होतें. वरून दिसणाऱ्या या प्रसन्न सहजतेच्या खालीं काहीं स्फोटकता खदखदत असेल असें कोणालाहि वाटलें नसतें. आम्हालाहि तसें काहीं दिसले नाहीं. पण प्रवास संपवून आम्ही परत भारतांत आल्यावर म्हणजे हा मजकूर लिहित असतांना, तीन महिन्यांपूर्वी पाहिलेली प्रसन्नता किती कृत्रिम व फसवी होती, अन् तिच्याखालीं कसली

खदखद सळसळत होती याचें पेटतें प्रत्यंतर आज येते आहे. आगी लागताहेत, दंगे होताहेत, रक्तपात, धरपकड, खलबतें, परिषदा नि बैठका चालू आहेत. प्रचंड मिरवणुका निघताहेत नि ग्रीक भूमिगत व ब्रिटिश सैनिक यांच्या चकमकी झडताहेत.

कशासाठीं ही वर्दळ नि रक्तपात चालू आहे? भूमध्य सागरांतलें हें चिमुकलें बेट आज इंग्रजांच्या ताब्यांत असलें तरी मूळचें तें त्यांचें नाहीं. हजारो वर्षें तें ग्रीकचें होते. तिथली बहुतेक वस्ती व संस्कृति, भाषा व जीवन हीं ग्रीक आहेत. इस्लामच्या प्रसरणकालीं तुर्कांनीं त्यावर कब्जा केला तरी ते सायप्रसचें इस्लामीकरण करूं शकले नाहींत. पण राजकीय प्रभुत्वामुळे तुर्कांची काहीं वस्ती तिथे वसली आहे. पुढे इंग्रजांनीं तें गिळंकृत केलें व तोफा-बंदुकांच्या जोरावर आजपर्यंत आपल्या हातांत ठेवलें आहे. इतकेंच नव्हे तर ' ब्रिटनच्या राणी सरकारला पूर्व भूमध्यभाग व पश्चिम आशिया खंड या विस्तारांतलीं आपलीं नैतिक कर्तव्यें नीट पार पाडता यावीं ' — म्हणजेच पश्चिम आशिया व उत्तर आफ्रिका यांवरील आपलें वासाहतिक वर्चस्व घट्ट ठेवता यावें म्हणून सायप्रसवरचा आपला ताबा सोडायला ब्रिटन तयार नाहीं. पण सायप्रसची जनता स्वातंत्र्य मागते आहे व आपल्या राष्ट्रीयत्वाच्या अनुबंधाने स्वयंनिर्णयानुसार ग्रीक राष्ट्रांत विलीन होऊं इच्छिते आहे. मागण्या, निवेदनें, निदर्शनें हे प्रकार बरेच दिवसांपासून चालू होते. पण त्यांतून काहींच निष्पन्न न झाल्याने जनता निकरावर आली. कट व दंगेधोपे, खून व जाळपोळ सुरू झाली. जनतेच्या निग्रही प्रतिकाराला व ब्रिटिश टॉमींच्या अत्याचारांना उधाण आलें. १९५६ पर्यंतचे सरासरी सात आठ महिने असे गेले की स्फोट व रक्तपाताशिवाय दिवस सुना जाईना. तेव्हा ब्रिटनने आता सायप्रसला स्थानिक स्वराज्याचे हक्क देऊं करून वाटाघाटींचा घोळ घातला आहे. पण जनतेला संपूर्ण स्वातंत्र्य व मायराष्ट्रांत विलिनीकरण याशिवाय दुसरा कसलाच पर्याय मान्य नाहीं. ब्रिटिश तर या मागणीला मान्यता देत नाहींतच पण सायप्रसमधील तुर्की प्रजाहि ग्रीक जनतेच्या मागणीला विरोध करीत आहे. तुर्की प्रजेचा हट्ट असा आहे की सायप्रसचा राजकीय दर्जा मुळींच बदलूं नये. पण जर तो बदलायचा झाला — म्हणजे त्याला स्वातंत्र्य द्यायचें झालें — तर मात्र सायप्रस

तुर्की सार्वभौमांत विलीन करावें. सायप्रसची ही समस्या किती निकटची नि परिचयाची वाटते ! मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या वदंळीसारखीच काहींशी ही समस्या नाहीं का ? मुंबई राज्याचें द्विभाषी स्वरूप बदलूं नये; पण तें बदलायचें झाल्यास मुंबई महाराष्ट्रांत विलीन न करतां वेगळी ठेवावी ही गुजराथची भूमिका व तिच्यामुळे पेटलेला वाद या सारखीच तुर्कांची सायप्रस संबंधीची भूमिका असल्याने तिथे साहजिकच ग्रीक तुर्की वैमनस्याने पेट घेतला; इतका की इस्तंबूलमधील ग्रीक वकिलात व इतर इमारती तुर्कांनीं जाळून टाकल्या तर दुसऱ्या भागांत ग्रीकांनीं या अपकृत्याचा बदला घेतला. ब्रिटिशांना असें घडावे हें पाहिजेच होतें. अशा रीतीने दोघांचीं हाडें नरम होतील व ते दोघे वठणीवर येतील असा त्यांचा कयास होता. ही धुमश्चक्री चालू असतांना मध्यंतरी एक अशीहि शक्कल हवेंत सोडून देण्यांत आली की ग्रीकांना जर ग्रीकराष्ट्रांत विलीन व्हायचें असेल तर सायप्रसचे दोन भाग करून एक तुर्कस्थानांत विलीन करावा. पण जशी ती एकदम उपटली तशीच ती विरली. यामुळे संयुक्त महाराष्ट्राप्रमाणेच सायप्रसचा लढा तिरंगी स्वरूपाचा बनला आहे. पण यावर ग्रीक-तुर्की लोकांनीं आपापसांत लढणें ही तोड नसून दोघांनीं आपापसांत समजी करून संयुक्तपणे ब्रिटनवर मात करणें ही आहे.

तथापि तुर्कांचा आजचा हट्ट कितपत बरोबर आहे ? सायप्रसच्या एकूण लोकवस्तींत तुर्की लोकांचें ( मुसलमानांचें ) प्रमाण फक्त शेकडा वीस इतकेच आहे. बाकी सर्व शेकडा ८० ग्रीक आहेत. पुढे सायप्रसची किंचित् माहिती दिली आहे. तिच्यावरून दिसून येईल की तिथल्या स्थानांचीं नांवें शुद्ध ग्रीक दिसतात. तिथलीं धर्मस्थाने, निरनिराळे उत्सव हे सर्व ग्रीक ( ख्रिश्चन ) आहेत. देवळें शेकडो वर्षांचीं जुनी आहेत. इथलें स्थापत्य व शिल्प, लोकांचे पोषाख व राहणी-करणी, त्यांची भाषा हीं सर्व ग्रीक-युरोपियन थाटाची आहे. असें असतांना तुर्की अल्पसंख्यांकांनीं हें बेट तुर्कस्तानला जोडावे नाहींतर त्याला स्वातंत्र्याचा व स्वयंनिर्णयाचा मूलभूत लोकशाही हक्कच देऊं नये असा हट्ट धरावा, हा निवळ आडदांडपणाच नव्हे का ? ग्रीक व तुर्कस्तान हे दोन्ही देश 'नाटो' संघटनेचे सभासद आहेत. पण या संघटनेला हा झगडा मिटवावा असें वाटत नाहीं !

सायप्रस हें समुद्रसपाटीपासून बऱ्याच उंचावरचे डोंगर पठारांचे बेट आहे. निकोशिया हें विमानतळाचे ठिकाण जवळजवळ त्याच्या मध्यभागीं आहे. घनदाट जंगलें, सर्वत्र हिरवळ, पाइन वृक्षाच्या लागवड केल्यासारख्या लांबलचक राई, यामुळे मध्य युरोपच्या गुलहौशी लोकांचें ते एक आवडतें क्रीडास्थान आहे. त्रुदोसचा ऑलीम्पस पर्वत ५५०० फूट उंचीचा असून तिथे पाईनची दाट वनराजी, मंद सुवासाच्या फुलांचे ताटवे व मधुर फळांचे बगीचे आहेत. कँप होतेल हें एक प्रशस्त निवासस्थान आहे. त्याशिवाय छोट्या बंगल्या, आणि उघड्यांत राहू इच्छिणाऱ्यांसाठी तंबू-राहुट्याहि आहेत. निकोशियापासून ५१ मैलांवर हे रम्य स्थळ आहे. दुसरें स्थळ प्लात्रे. तें निकोशियापासून ५८ मैल दूर व ३७०० फूट उंचीवर आहे. इथला उर्वशी उत्सव-प्लात्रे फेस्टिव्हल— हा नाच, गाणें व मजा मारणें यासाठी प्रसिद्ध आहे. याला मिस् फेस्टिव्हल—( कुमारी उत्सव ) असेंहि दुसरें नांव आहे. ग्रीष्म ऋतूंत थंड हवा खाण्याचे हे ठिकाण आहे. इथे टेनिसच्या मॅचीस होतात व त्यासाठी लांबलांबचे लोक येतात. तिसरें ठिकाण प्रोद्रोमस हे निकोशियापासून ५३ मैलांवर व प्लात्रेपासून पांच मैलांवर असून समुद्र-सपाटीपासून याची उंची ४६०० फूट आहे. दि. २९ ऑगस्टला इथे सेंट प्रोद्रोमसचा उरूस भरतो. पेधौलास हे चवथें ठिकाण वरच्या जागेपासून अवघे तीन मैलांच्या अंतरावर ३६०० फूट उंचीवर वसलेलें आहे. चेरींचीं इथे उपवने आहेत. जगाच्या त्रिसंतापापासून काहीं काळ निर्लेप राहून ज्यांना मानसिक शांतता मिळवायची असेल त्यांच्यासाठी हें एक उत्तम ठिकाण आहे. कालो पात्रायोतीस हें पाचवें स्थळ २३०० फूट उंचीवर असून निसर्गाच्या सौंदर्याचा मनमुराद आस्वाद घेणारे चोखंदळ लोक नेमके याच ठिकाणी येतील. इथे फळें विपुल आहेत. शिवाय औषधी क्षारांचे झरे आहेत. पण ते फार अवघड जागी असून दुर्लक्षिलेले आहेत. यामुळे झेकोस्लोव्हाकियाच्या जगविख्यात झऱ्यांप्रमाणे यांचा उपयोग लोकांना होत नाहीं. पंधराव्या शतकांत बांधलेल्या सेंट जॉन लॅम्ब्रोडिस्टीचें चर्च, त्यावरील कोरीव आकृतींसाठी फार प्रसिद्ध आहे. दि. ४ ऑक्टोबरला या साधूचा उत्सव दरवर्षी होतो. काकोपेत्रिया, पेरापेद्री, आग्रोस अशीं २५०० ते ३००० फूट उंचीवरचीं आणखी तीन प्रेक्षणीय स्थळें आहेत. पैकी पहिल्या ठिकाणी सेंट निकोलसचें देऊळ फार

प्रेक्षणीय असून दुसरें ठिकाण सुरुचीर सफरचंद व तिसरें घोंसदार द्राक्षें यांसाठी प्रसिद्ध आहे. शिवाय या शेवटच्या ठिकाणी म्हणजे आग्रोसला दि. ८ सप्टेंबर रोजीं ' अवर लेडी ऑफ कायको 'चा उत्सव होत असतो.

सायप्रस सोडून आम्ही आता युरोपांत आलो होतो. पुढचा मुक्काम रोमला व्हायचा होता. सायप्रस ते रोम १०५२ मैलांची मजल होती. विमान चकावे घेत उडालें तें भूमध्य समुद्रावर आलें. सकाळ व दुपार रखरखीत वाळवंटावरून उडण्यांत घालविली. आता संध्याकाळ व पूर्व रात्र या अफाट पसरलेल्या जलाशयावरून उडत घालवायची होती. या हिशेबाने अथेन्सपासून बेलजियमपर्यंतचा सारा प्रेक्षणीय युरोप कुट्ट काळोखांत पसार व्हायचा ! मन जरा खट्टूच झालें. आता आमच्या घड्याळांत साडेपांच झाले होते. म्हणजे मुंबईला रात्रीची अकराची वेळ. संदीप केव्हाच झोपला असेल. आम्ही मात्र टिटवीच्या गतीने समुद्रावरून तरंगत होतो. तरंगण्याचा सुद्धा शीण हा असतोच. यामुळे बसल्या जागीं केव्हा झोप आली तें कळलें नाहीं. रोम आलें म्हणून होस्टेसने जागें केलें तेव्हा उठलों. आता १२ वाजले होते. रोमचा विमान तळ भव्य अन् सुंदर आहे. रेल्वे त्याच्या शेजारूनच धावते आहे. या दोहोंचे निळे, हिरवे, पिवळे अन् लाल, शेंदरी, पांढरे दिवे विमानांतून जमिनी सरपट दिसत. आमच्या स्वागतासाठी रोषणाईच केली होती जणू ! रात्रीच्या वेळी विमान जमिनीला कसें टेकतें तें पाहण्याचें मला कुतुहल वाटत होतें. तें टेकतांना त्याचीं चाकें जमिनीला प्रथम लागतात तेव्हां जरा आचका बसतो. नंतर जमीन धरून नीट सरपटूं लागतें. विमानांतून बाहेर येऊन पाहिलें, केवढा तरी विस्तीर्ण विमान तळ; भोवतालीं रसरशीत फुलांचे ताटवे दिसले. वालुकाप्रदेशाची रुक्षता संपून आम्ही फुललेल्या जीवनात येऊन उतरलो होतों. सुविकसित, हंसरी प्रसन्न सृष्टि पाहून मन उल्हसित झालें. थंडी चांगलीच वाटत असल्याने आम्ही ओव्हरकोट चढविले.

विमानतळाच्यान आलेशान इमारतींत आम्ही प्रवेश केला. निराळ्या जगांत आल्याचें मला प्रथम या ठिकाणीं जाणवलें. केवढा भव्य लॉज अन् भव्य डाईनिंग हॉल. भिंतीवर १५–२० फुटी तैलचित्रें लटकत होतीं. इटलीची

जगप्रसिद्ध चित्रकला सकल भव्यतेने सजलेली होती. भिंतीतर, मांडणीवर, बैठकीवर—साऱ्या गोचर वस्तूंवर— वैभवाचे दाट ठसे उमटलेले पाहून मी विचारांत गुंगून गेलो. रोमचा इतिहास दृष्टीपुढे तरंगूं लागला. प्राचीन रोम; किती सम्राट इथे उदयाला आले अन् वैभव भोगून लयाला गेले ! कला व स्थापत्य, चित्र व शिल्प नि संगिताचे किती भव्य नि विविध प्रकार इथे उदयाला आले; किती साहसी वीरांनीं ही भूमि भूषविली, गाजवली अन् संत्रस्त केली. किती धाडसी पुंगवांनीं या भूमीवर थैमान घातलें नि अंतीं याच भूमीच्या मातींत मिसळून गेले. सीझरपासून मुसोलिनीपर्यंतची सर्व प्रभावळ प्रकाशली इथे ! रोमच्या इतिहासांत मरून पडलेलीं प्रेतें मनांत जागीं झालीं. दिल्लीची आठवण होऊन मन तिची रोमशीं तुलना करूं लागलें. सुंग, चव्हाण, घोरी, लोदी, पठाण, मोंगल, इंग्रज – किती आले अन् आपापल्या स्मृतींचे ठसे उमटवून गेले ! तसेच या रोमचें ! कला, वैभव व भव्यता यांचें माहेरघर म्हणजे हें रोम; पण ओंगळ, हीन, रुक्ष यांचेंहि तें चिरंतन आश्रयस्थान नाहीं का ? तुटक तुटक व स्वयंघटित नगरराज्याचा नमूनाहि जगाला या रोमने दिला; अन् राज्य भस्मीभूत होत असतांना आपल्याच कलेंत मस्त राहून त्या अग्नीला संगिताच्या तरल सुरांची साथ देणारा नीरोहि याच रोमने जगाला दाखविला ! रोम ही जगाच्या इतिहासांतली एक निखालस न्यारी चीज आहे !!

भपकेबाज किंमतीच्या अनेक मोहक वस्तूंचीं दुकानें थाटलेलीं होतीं. तरुण स्त्रिया विक्रेत्यांचें काम करीत होत्या. भारत सोडल्यानंतर कामाधामांत गुंतलेली स्त्री इथेच प्रथम पाह्यला सांपडली.

विमानतळावरच्या या प्रासादाबाहेर पडून त्या वासवनगरीच्या अंतरंगांत प्रवेश करणें वेळेच्या अभावीं शक्यच नव्हतें. तरी निरंकुश मन बसल्या जागीं या उठाठेवी करीत होतेंच ! समोरच्या विस्तीर्ण टेबलावर अनेक खाद्य पदार्थांच्या व फळांच्या बशा येऊन पडल्या होत्या. सहजनांचे हात ज्या तऱ्हेने त्यांच्यावर चालले होते त्या तऱ्हेवरून ते पदार्थ रुचकर असलेच पाहिजेत हे तर दिसतच होते. पण मध्यरात्र उलटून गेल्याने मी फक्त चहा बिस्किटांवर भागविलें. आमच्यांतले कांहीं रसज्ञ बारच्या उटंटळ तिकट्यावर बसून रसार्कपान करीत होते. चित्रार्चीं काहीं कांडें घेऊन तीं

घरीं धाडून दिलीं. इथलें नाणें म्हणजे लीर; आपल्या रुपयाचे १२० लीर मिळतात. चित्राच्या कार्डाला ४० व तिकिटाला ६० लीर मिळून १३ आ. ४ पै. पडले.

निघण्याची वेळ झाल्याने आम्ही बाहेर पडलो व विमानाकडे निघालों. घरापासून येथपर्यंतचा प्रवास सुमारे चार हजार मैलांचा झाला होता, व अजून सबंद दिवस उडत रहायचे होतें. विमान वर गेलें. थंडी आता चांगलीच कडाडली होती. ओव्हरकोट घातलेला असूनहि पांघरुण घेणें भाग पडलें होतें. लौकरच मग झोप लागली.

झोप लागली म्हणण्यापेक्षां डुलकी लागली म्हणणेंच अधिक यथार्थ होईल. खुर्चीवर बसल्या बसल्या झोपणार ते काय ! हातपाय ताणून देणें तर शक्यच नव्हतें. थोडावेळ झोप लागे अन् कुशीवर वळायला जावें तो जाग येई. पुन्हा डुलकी पुन्हा जाग. आज दोन अहोरात्री जखडल्यागत असे बसून होतों. आमचें हें खास विमान असल्यामुळे व सर्वजण एकाच ठिकाणीं जाणार असल्यामुळे एकदा विमान वर गेलें की ९-१० तास हवेंत भरारत राही. जेवायला खालीं यायचें की पुन्हा वर अंतराळांत गडप व्हायचें. प्रवासी विमानें दर ३-४ तासांनीं थांबतात. आमचें तसे नव्हतें. चारेक तास जागृति-सुषुप्तीचा खेळ चालू असतां पहाटे चाराच्या सुमाराला जागा होऊन जागेवरून उठलो तों समोरच्या खिडकीच्या तावदानावर एक नाजुक तांबूस तिरीप उमटलेली दिसली. पहाटेचा झुंजूमुंजू उजेड उजळत होता. उठून खिडकींतून पाह्यलें तर क्षितिजावरून कोंवळें तांबूस सूर्यबिंब किंचित् मान वर करून डोकावत होतें. सूर्याचा असला गोडवा तांबूस रंग मी जन्मांत कधी पाह्यला नव्हता. आपल्या मुंबईत बायका डाळिंबाचें फूल डोक्यांत घालतात त्या फुलांच्या रंगाला चकाकी दिली तर जसें दिसेल तसें हें सूर्यबिंब दिसत होतें. अरुणाचीं वर्णनें पुष्कळ वाचलीं आहेत नि प्रसंगोपात् केलींहि असतील; पण खरा अरुण मात्र मी प्रथम आज पाहिला.

इटली देशाला मागे टाकून आम्ही फ्रान्सच्या लायन्सवरून Lyons उडत होतों तेव्हा चांगलेंच उजाडले होतें. आता दिवस मोठे अन् रात्री लहान होत चालल्या. पुष्कळ काम करणाऱ्या लोकांचा प्रदेश आहे ना तो ! कामाला

वेळ पुरतोय कुठे त्यांना; मग दिवस नको का मोठा व्हायला! उष्णतामान ४२°-४४° होतें. मुंबईला तें ९५° तरी असेल अन् दिल्लीला ११०° पर्यंत! या थंडाव्यामुळे जवळची बॅग उघडून काहीं काढावें तर रेफ्रीजेटरमधून वस्तु काढल्यासारखे थंडगार लागे. फाउन्टन पेनहि चालत नाहीं. लिहिण्यासाठी टोपण उघडलें तर भळकन् शाई बाहेर येते इतका हवेचा दाब विमानांत कमी असतो. कारण आम्ही यावेळी साडे दहा हजार फूट उंचीवरून उडत होतों. प्रवास तरी पहा कसा चमत्कारिक चालला आहे तो! आम्हाला जायचें आहे भारताच्या डोक्यावर किंचित् पश्चिमेला. पण त्यासाठी सारा पश्चिम आशिया-खंड ओलांडून युरोपच्याहि पश्चिम कडेला फ्रान्सवर येऊन पोचलों. इथून बेलजम् व नेदरलँड करून उजवीकडे वळसा घेणार. घोड्याच्या नाली-सारख्या वांकणाने आम्ही जात आहों. रोमहून सरळ वर उत्तर पूर्वेकडे—इशान्येला जाणे शक्य होतें. पण वाटेंत १५ हजार फूट उंचीचा आल्प्स् पर्वत आडवा येत होता व त्याला ओलांडून जायचें तर यावेळी त्याने कोपायमान शंकराचा अवतार धारण केला होता. त्याचा राग शांत करण्यासाठी पवन झंझावाती वेगाने त्याच्या मस्तकावर विंझणवारा घालीत होता. म्हणजे आल्प्स्वर यावेळी हवेचें तुफान माजलें असल्याने त्याला ओलांडून जाण्याचें धाडस पत्करायला आमचे वैमानिक तयार नव्हते. म्हणून आल्प्स् पर्वताला आमची ही वाम प्रदक्षिणा चालू होती. या क्रमणांत दिल्लीहून निघाल्यानंतर अरबी समुद्र ओलांडून बेहेरीनला आलो; तिथून तांबडा व भूमध्य समुद्र ओलांडून सायप्रस गाठलें; तिथून पुन्हा भूमध्य समुद्रावरून उडत रोमला टेकलो; रोमहून फ्रान्स, बेल्ज्यम, डेन्मार्क व स्वीडनवरून फिन्लंड असा आमचा प्रवास चालला होता. यांत मनाला सारखी रुखरुखहि लागली होती की इतके देश ओलांडत होतों पण एकाचेंहि जवळून दर्शन नाहीं! दहा हजार फुटांवरून खिडकीच्या तावदानांतून जे काय दिसेल तेवढेंच; त्यावरच समाधान मानून भागवायचें! पण खिडकींतून दिसत होतें तें मात्र सर्व प्रसन्न होतें. जिकडे तिकडे हिरवे-गार! इंचभरमुद्धा कोरडवाहू व पडीक जमीन नाहीं. सर्वत्र पिकाची हिरवळ, बागबगीचे, त्यांतून झुळझुळणारे कालवे. थोड्या थोड्या अंतरावर मोकळ्या मोकळ्या बंगल्या, आंखीव रस्ते अन् मधेच दाट वस्तीचें शहर! लख्ख उन्हें पडलेलीं होतीं अन् रसरशीत, हिरवीगार, प्रसन्न नि फुललेली सृष्टि खालीं

पसरली होती. मघाच्या त्या रेताड कोरडवाहू जमिनी अन् या पालवत्या —डुलत्या जमिनी ! केवढा हा फरक !

दहाच्या सुमाराला ॲम्स्टरडॅम आलें नि आम्ही न्याहारीसाठी उतरलों. हा विमानतळहि रोमसारखाच किंवा त्यापेक्षाहि मोठा आहे. ७-८ विमानें प्रवाशांची वाट पहात उभीं होतीं. सर्व प्रातर्विधी उरकून आम्ही भोजनाकडे वळलों. आज सकाळची न्याहारीपण हीच अन् दुपारचें जेवणपण हेंच होतें. कारण इथून निघाल्यावर वाटेंत कुठेंहि न थांबतां थेट हेल्सिंकी गाठण्याचा आमच्या वैमानिकांचा बेत होता. प्रवासाचा शेवटचा टप्पा ओलांडण्यासाठी ११।। वाजतां आम्ही गरुड-पंखावर आरूढ झालों. चार साडेचारला हेल्सिंकी गाठूंच असा वैमानिकांनीं हिय्या केला होता.

सूर्य प्रकाश उत्तम होता. उष्णताहि नव्हती. खालीं पहाण्यासारखे काहींच नव्हतें. अरबी समुद्राकाठचीं आम्ही पांखरें बाल्टिक समुद्रावर आता भिरभिरत होतों. तिकडचीं काहीं पावसाळीं पाखरें आषाढ-श्रावणांत इकडे येतात. तशी इकडचीं ९० वासंतिक पांखरें यंदा तिकडे जात होतीं. थोडा वेळ पाणी, पुन्हा जमीन, मधे सुस्तपणाने तरंगणारे तुरळक ढग, क्वचित् एखादा डोंगरवट किनारा; पुन्हा पाणी, पुन्हा जमीन, पुन्हा ढग असा क्रम दुपारीं ३।। वाजेपर्यंत चालला होता. कोपनहेगन आमच्याखालून सरकून गेलें. स्टोकहोमला आम्ही थांबणारच नव्हतों. तेव्हा आणखी तासाभराचें उड्डाण झालें की प्रवास संपायचा होता. ज्यांना विमानांचीं यंत्रें पहायचीं असतील त्यांना आत जाण्याची मुभा कप्तानाने दिली होती. दोन दोनाच्या तुकडीने आंत जाऊन आम्हीं तीं पाहून येत होतों. एका तासाच्या अंतरावर आलो आहोंत या जाणिवेने मनावरचें दडपण उचलले गेले होतें. साडेसहा सात हजार मैल संपले तिथे आतां दोन अडीचशे मैलांची ती काय बिशाद !

काय बिशाद् ? भवदीय काळाला असे डिवचतां ! बघाच तर मग आता ! एंजिनरूम बघण्याच्या नादांत आम्हीं होतो तों कापूस पिंजल्यासारखे खालचे बारीक नि तुरळक ढग नाहींसे झाले व आक्राळ विक्राळ आकारांचे प्रचंड ढग चोहोंबाजूला दिसूं लागले. पाहातां पाहातां ते आमच्या रोखाने येऊं लागलेले दिसले. एक ढग समोरून यावा, विमानाने

त्याच्यावर स्वार व्हावें, तों डाव्या उजव्या बगलेकडून हल्ले चढवीत दुसऱ्या ढगांनीं अंगावर यावें; त्यांना चुकवीत केव्हा खालीं तर केव्हां वर अशारीतीने स्वतःला बचावण्याचा शिकस्तीचा प्रयत्न चालू असतां विमानाच्या खालच्या बाजूने हवेचें तुफान माजलें. खाली जाण्याचा मार्गहि आता रोखला गेला. चोहोबाजूने डोंगराएवढाल्या ढगांचा वेढा पडला. एकाकी अभिमन्यू चक्रव्यूहांत सांपडावा तशी विमानाची अवस्था झाली. अंगावर मुसंडी मारून येणाऱ्या ढगांचा मारा चुकाविण्यासाठी विमान वर जाई तों दुसरा ढग तेवढया उंचीवर चित्त्यासारखी झेप घेऊन येई. पुन्हा वर जावें व मारा चुकवावा. शिकस्त करून थोडे खालीं यावें तों खालच्या तुफानाचा सुरुंग लागल्यागत होऊन पुन्हा वर फेकले जावें. आम्ही या लढाईत वरवर चाललों. विमान डळमळूं लागलें. हेलकावे खाऊं लागलें. सारखें खालीं वर होत राहिल्यानें पोटांत ढवळूं लागलें. दहा हजार फुटांवरून बारा, चौदा, सोळा, अठरा हजार फुटांवर जाऊन पोचलों. श्वास जड होऊं लागला. वर...वर...आणखी किती वर जायचें ? वाटलें, आता कायमचे वर जाणार ! आमच्या महाराष्ट्राच्या तुकाराम महाराजांना भेटायला ! पण तुकोबा गेले होते मायापाश आवळून स्वच्छेनें; उलट आमचे मायापाश कायम होते. जगाच्या रंगढंगांत वावरण्याचा आम्हाला अजून विलक्षण मोह होता. प्रतिक्षणीं खालीं यायला आतुर झालेले होतो. एव्हांना आम्ही हेल्सिंकीच्या माथ्यावर येऊन थडकलो होतो पण खाली येतां येईना. भीतीने सर्वांचे चेहेरेमोहरे थिजले होते. हेलकावे व गिरक्या यांनीं बहुतेक सगळे मरगळलो होतों. खालीं विमान तळावर वाजलेले सीरन् मधून मधून ऐकूं येत नि त्यांना उत्तर म्हणून आमच्या विमानाने घातलेल्या शिळांच्या कर्कश्श आवाजाने कानठळ्या बसत. ढगांचा हा चौफेर उसळलेला हल्ला फोडायचा वैमानिकांनीं अखेरचा धाडसी प्रयत्न केला व तेवढ्यांत पाऊस पडूं लागला. आम्हांला अधिकच भीति वाटूं लागली. पण ती अनाठायी होती. जोराच्या पावसामुळे ढगांचें व खालच्या हवेचें तुफान दबलें नि घारीच्या झेपीने विमान खाली आलें. काहींना वाटलें विमान कोसळलें. ॲम्स्टरडॅमला पोटांत भरून घेतलेली काहींची नशा फेसाळून नाकातोंडावाटे बाहेर ओसंडूं लागली. पण एकदाचें विमान जमिनीला टेकलें व थांबलें. पण

हैराण झालेल्या जीवांचे होश ताळ्यावर येईपर्यंत, दार उघडलें तरी शिडी मात्र लागली नाहीं. सुमारे १५ मिनिटांनीं ती लागली व आमचे पायहि जमिनीला लागले. विमान तळावर जमलेल्या लोकांनीं हर्षोन्मादाने टाळ्यांचा गजर केला. आमच्या स्वागतासाठी शहरांतून पुष्कळच लोक आले होते. पण विमानाला खालीं यायला तासभर तरी उशीर लागल्याने त्यांतले बरेच परत निघून गेले होते. आमचे पासपोर्ट, हेल्थ सर्टिफिकेट, व्हीसा, तपासून झाले. कस्टमचे सर्व विधि उरकले. जवळच्या पैशा अडक्याची नोंधटिपणी झाली नि मग अधांतरीच्या संकटांतून वाचल्याच्या आनंदाने आम्ही बाहेर पडलों. वृत्तपत्रांनीं फोटो घेतले. बस तयारच होती. तिच्यांत बसून आम्ही विमानतळावरून बाहेर पडलों ते जगप्रसिद्ध ऑलेम्पिक स्टेडियमच्या इमारतीशी आलो. शांतता परिषदेच्या स्वागत समितीतर्फे इथे स्वागत व चहापान झालें, व मग तिथून निवासस्थानाकडे गेलों.

आमचें निवासस्थान शहरापासून सहा मैल दूर असलेल्या एका उपनगरांत होतें. या नगराचें नांव ओतानेमी. जिकडे तिकडे हिरवेगार नि प्रसन्न. रस्त्याच्या दुतर्फा पाईन व बर्चच्या दाट रांगा आम्हाला सलामी देत होत्या. मधून मधून टुमदार लाकडी बंगल्या नि त्यांच्या सभोवार छोट्या छोट्या बागा. सर्वत्र वृक्षराजी नि मधून मधून जलाशय व प्रवाह ! पुढे फिन्लंडची खाडी लागली. रस्ते स्वच्छ, माणसें फुटपाथवर. नागमोडी वळणें घेत आम्हीं या आल्हाददायक देखाव्यांतून चाललो होतों. वातावरण नि सृष्टि इतकी प्रसन्न होती की त्यांच्या गार नि गोडव्या स्पर्शाने आमचा हवाई थकवा केव्हा निघून गेला तेंहि कळलें नाहीं. मुक्कामावर आम्ही अगदीं उद्दीपित मनाने येऊन पोचलों. विमानतळावरून आमचें सामान तर आधीच येऊन पडले होतें. तें शोधून घेऊन आम्ही आपापल्या नियोजित खोलींत गेलों. जेवणाची तर केव्हांपासूनच तयारी होती. आजचें जेवण आमच्या सन्मानार्थ इथल्या विद्यार्थी संघातर्फे देण्यांत आले होतें. उद्यापासून आमचा खर्च सुरू व्हायचा होता.

जेवून परत आलों व कपडे उतरून शरीर तयार असलेल्या अंथरुणावर भिरकावून दिलें. आज दोन दिवस देह विमानाच्या खुर्चीत कोंबून घातला

होता. त्यामुळे सर्वांग आंखडल्या–आंबल्यासारखे झाले होतें. दिल्ली ते सायप्रस हा प्रवास असह्य उष्णतेंतून झाल्याने दीड दिवस फोंफाट्यांतून होरपळून निघाल्यासारखे झालें होतें. तर त्याच्या उलट हातापायाची जुडी करून पोटाशी घ्यावी अशा थंडींत आता येऊन पडलो होतों. संतुष्ट मनाने ताव मारून जेवलो होतों. यामुळें झोप यायला वेळ लागली नाहीं.

—प्रवासाचा एक खंड इथे संपला होता.

◆ ◆ ◆

: ३ :

फिन्लंडची दक्षिणोत्तर लांबी फक्त ७२४ मैल आहे. पूर्व–पश्चिम रुंदी खालच्या म्हणजे दक्षिणेच्या बाजूला जास्तीत जास्त ३३७ मैल आहे. उत्तरेकडे तो अधिकाधिक अरुंद होत जातो. उत्तर ध्रुवबंधांतला त्याचा उत्तरेचा प्रदेश २४० मैल लांबीचा व ६०–७० मैल रुंदीचा आहे. यावरून तो चंबू आकाराचा दिसेल हें वाचकांच्या लक्षांत येईल. त्याचें एकूण क्षेत्रफळ १,३०,०३५ चौ. मैलांचें आहे. हा विस्तार ग्रेटब्रिटन, स्कॉटलंड व आयर्लंड या तिघांच्या मिळून होणाऱ्या विस्तारापेक्षा मोठा आहे. पण वस्तीच्या बाबतींत हे मोठेपण टिकत नाहीं. सबंद स्योमी देशाची ( फिन्लंडची ) लोकवस्ती १९५० च्या शीरगणतीप्रमाणे फक्त ४० लाख ३२ हजार ७०० आहे. एकट्या लंडनची वस्ती याच्या दुप्पटीपेक्षा अधिक आहे. फिन्लंडची ही वस्ती मुंबई शहराच्या सवापट तर कलकत्त्याच्या पाऊणपट आहे. गेल्या पांच वर्षांत या वस्तींत थोडी वाढ झालेली असली तरी ती पुरी ४१ लक्ष भरणार नाहीं. क्षेत्रफळाशीं या वस्तीचें प्रमाण दर चौरस मैलाला फक्त ३४·२ माणसें असे पडतें. स्योमीचा उत्तरेचा भाग उत्तर ध्रुवबंधावरचा. तिथली एकूण वस्ती २५०० ची म्हणजे सुमारे दर सात मैलांत एक माणूस इतकी विरळ असल्याने त्या प्रदेशाला–लॅपलँडला–निर्जन प्रदेशच म्हटलें पाहिजे. ७० अक्षांश म्हणजे जिथे उत्तर ध्रुवबंध सुरू होतो त्या बंधावर रोवानेमी या नांवाचें ८-१० हजार वस्तीचें शेवटचें मोठें शहर आहे. ७० अक्षांशावरचें साऱ्या जगांतले ते एकुलते एक शहर आहे. इथून खालीं यावे तसतशी वस्ती वाढत जाते. तोर्नियो हें रोवानेमीच्या दक्षिणेकडचें २५ हजार वस्तीचें शहर आहे. देशाच्या लांबीरुंदीच्या दृष्टीने औलु हें मध्यावरचें शहर बेचाळीस हजार वस्तीचें आहे. इथून बरेच खाली आल्यावर ताम्पेरी हें फिन्लंडचें शंभर टक्के औद्योगिक शहर १ लाख १०

हजार वस्तीचें आहे. भूस्तर व प्रागेतिहासदृष्ट्याहि ते या भूभागांतलें अत्यंत महत्त्वाचें ठिकाण आहे. तुर्कू शहर ताम्पेरीएवढेंच आहे. त्यानंतर पोरी व लाहनी ४६ हजार; ज्यासक्याला ३२ हजार, कोटका २८ हजार, वास्ता ३७ हजार अशा वस्तीचीं शहरें आहेत. यांतलें तुर्कू हें जुनें इतिहासकालचें म्हणजे ५०० वर्षांपूर्वींचें राजधानीचें शहर असून तेथला किल्ला फार मजबूत व प्रेक्षणीय आहे. शेवटचें आखाताच्या किनाऱ्यावरचें सर्वांत मोठें शहर हेल्सिंकी हें असून तुर्कूनंतरचें गेल्या चारशे वर्षांपासूनचें राजधानीचें शहर आहे. याची वस्ती चार लाखाची आहे.

भारताशी त्याची तुलना होणारच कशी? क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारत फिन्लंडपेक्षा वीसपट आणि लोकवस्तीच्या दृष्टीने ९० पट मोठा आहे. खंडप्राय भारत दूरच राहो; क्षेत्रफळदृष्ट्या फिन्लंड संकल्पित संयुक्त महाराष्ट्राएवढा, तर वस्तीच्या दृष्टीने महाराष्ट्राचा सातवा भाग ठरेल. फिन्लंड देशांतच केवळ नव्हे तर रशियासुद्धा सबंध युरोपभर सार्वभौम भारताची प्रतिष्ठा फार मोठी आहे. या मोठेपणाला एक प्रकारचा दराराहि आहे. सुदैवाने हा दरारा भीतियुक्त नसून प्रेम व आदरयुक्त आहे. आम्ही भारताचे तिकडे गेलेले १० लोक किती सामान्य प्रतीचे होतो याची आम्हास पुरेपूर जाणीव होती. पण आम्ही भारतीय, जिकडे गेलों तिकडे अत्यंत अगत्य व आदरभावनेने लोकांनीं आमचें स्वागत केलें. आमच्याशी ते अदबीने व अव्याज प्रेमाने वागले. हजारोंच्या संख्येने जमून आमचें आतिथ्य व कौतुक केलें; याला जीं दोनतीन कारणें आहेत त्यांत भारताचा अवाढव्य विस्तार नि कोटीकोटीचें संख्याबल हें प्रमुख कारण आहे. भारताचे ३६ कोटी नि चीनचे सुमारे ६० कोटी मिळून जगाची निम्मी लोकसंख्या होते. ही प्रचंड लोकसंख्या अनेकांना बरोबर घेऊन समत्व भावाने शांततेचा तेजस्वी पुरस्कार करीत आहे. कोरियासारख्या लहान सहान देशांचीसुद्धा कड घेऊन ती महाप्रबल अशा आक्रमकांनाहि हटकते आहे. यामुळे युद्धांना यापुढे नक्कीच आळा बसणार अशी त्यांची भावना आहे. कोरिया व इंडोचीन येथील पेटती युद्धकुंडें त्यांनीं विझविलीं आहेत. फार्मोसा त्यांनीं पेटूंच दिलें नाहीं. जिनीवा करारासारखी जादू त्यांनीं घडवून आणली. सोवियत् यूनियनसारखा समर्थ देश शांतता व सहजीवनाची हमी घेऊन त्यांच्या शेजारीं उभा आहे. यामुळे

युरोपांतल्या सर्व आणि विशेषतः लहान देशांना आपल्या इच्छेनुरूप जगण्याची व जगाच्या प्रपंचांत समभावाने वावरण्याची शाश्वती वाटूं लागली आहे. आमचें आगत स्वागत इतके मनोभावाने होत होतें याचें कारण आमचें — भारताचें — धोरण, वागणूक व बल हेंच आहे. पं. नेहरू यांच्या सध्या ( मी गेलो तेव्हा ) चालू असलेल्या रशियाच्या दौऱ्यामुळे तर या भावनेंत अधिक भर पडली आहे.

एकूण क्षेत्रफळाच्या मानाने जंगल दौलतीच्या बाबतींत युरोपखंडांत फिन्लंडचा तिसरा नंबर लागतो. पहिला रशिया व दुसरा स्वीडन. फिन्लंडची ५ कोटी ३१ लक्ष एकर जमीन जंगलाखालीं आहे. इथलीं लक्षावधि झाडें औद्योगिक उत्पादनासाठी दर वर्षी कापलीं जातात. पण निदान तितकीं तरी नवी लावलीं जातात. १९४४ सालापासून काट छाट व लागवड यांची वजावट केली तर १९५४ सालांत लागवडींची वाढ १० टक्यांनीं झालेली दिसून येते. फर्निचर व इमारती, लोकर व सिल्यूलाइड, कागद व पुठ्ठे, आगकाड्या व पेट्या, आगबोटी, आणि सरपण, औषधी, इतक्या कामांसाठी ही जंगलची दौलत वापरली जाते. (भारतांत जंगलची दौलत याहिपेक्षा विपूल व विविध आहे. पण–) बहुतेक शेतकऱ्यांचें स्वतःचें जंगल असतें. हा त्यांचा जोडधंदा आहे. अगदी लहान शेतकरी स्वतःचें शेतीकाम संपल्यावर दुसऱ्याच्या जंगलांत लांकूड तोडणें, तुळया व फळ्या पाडणें हीं कामें मजुरी घेऊन करतो. एकूण जमिनीपैकीं शे. ७१ जमिनी दाट जंगलांनीं व्यापलेल्या आहेत. जंगलांत बर्च १९ टक्के; स्प्रुस (ओक) २८ टक्के व पाईन ५१ टक्के आहे. साहजिकच देशाच्या एकूण निर्गत व्यापारांत जंगलाचा हिस्सा ८५ टक्के इतका आहे. पाईन लाकूड वजनाला हलकें, चिवट व पॉलिशला उत्तम असतें. सबंद लाकूड, त्याच्या फळ्या व फर्निचर परदेशीं जातात. जळाऊ लाकूडहि जातें. लाकडाच्या विपुलतेमुळे घरेंहि पूर्वापार लाकडाचीं असतात. यांना आगीचें भय असते हें खरें; पण अति कमी खर्चाचें घर हेंच. यामुळे खेडोपाडीं त्यांचाच प्रघात फार. गेल्या महायुद्धांत शहरेंच्या शहरें बॉम्ब माऱ्यांत बेचिराख झालीं तिथे आता सिमेंट कॉंक्रीटच्या आधुनिक इमारती उठल्या आहेत. मुख्य उत्पन्नाचें साधन तेंच असल्यामुळे जंगलांची जोपासना इथे फार चांगली होते.

त्यासाठीं एक संशोधन व संवर्धन खातें आहे. जंगलें अफाट असलीं तरी तीं अतिशय साफसूफ ठेवलीं जातात. लागवड योजनाबद्ध तशीच कलात्मक आहे. जंगलांतून काढलेले रस्ते निसर्ग सौंदर्याला खुलावट देतील अशा तऱ्हेने आंखलेले आहेत. मधूनमधून सर्वत्र लागणाऱ्या सरोवरांवर मानवी श्रम व कल्पकता यांचे संस्कार घडवून कमालीची रान रमणीयता निर्माण केलेली आहे. मधेच एखादा स्टेडियम नाहींतर भव्य पुतळा, त्याच्या सभोंवार सुंदर बगीचा, जवळच्या सरोवरांतून पाण्याचे प्रवाह आणून बगीच्यांतून किंवा त्या इमारती भोवतालून खेळविलेले; यामुळे दाट राना-ऐवजीं सुंदरशा उपवनांतून आपण चाललेलो आहों असा भास सर्वत्र होत राहतो. दाट जंगलाच्या भयानकतेला निरुपम सौंदर्याची मोहकता मानवाची अमर्याद कल्पकता देऊं शकते. पण कल्पकतेला अवसर असेल तर— !

शेकडा ७१ जमिनी जंगलांनीं व्यापल्यानंतर उरलेल्या २९ टक्क्यांपैकी फक्त १३ टक्के जमिनीच काय त्या पिकाखालीं आहेत. बाकी १६ टक्क्यांपैकी ९ टक्के भाग जलाशयांनीं व्यापलेला असून ७ टक्के डोंगराखालीं, पडीक किंवा निरुपयोगी आहे. इवल्याशा फिन्लंडमधे साठ हजारांवर लहानमोठीं सरोवरें आहेत. यांतलीं १७ फारच मोठीं म्हणजे प्रत्येकीं १२५ चौ. मैलांपेक्षां अधिक विस्ताराचीं आहेत. यांतले सर्वांत मोठें सरोवर साईमा २७५० चौ. मैल घेराव्याचे आहे. या सरोवरांना कुठे निसर्गतः जवळून वहात जाणाऱ्या नद्यांच्या प्रवाहांनीं तर कुठें दोन सरोवरांत कालवे काढून त्यांनी, एकमेकांशीं जोडून टाकल्यामुळे जंगलचें लांकूड हेल्सिंकी बंदरावर बिनखर्चाने वाहून आणण्याचा दक्षिणोत्तर असा सलग पाणमार्ग तयार झाला आहे. काहीं सरोवरांत मधून मधून बेटें लागतात. यामुळे फिन्लंडमध्यें तुम्ही कुठेंहि पांच पंचवीस मैलांच्या घेराव्यांत फिरायला गेलांत तर तेवढ्यांत तुम्हांला किती तरी ढंग पहायला सांपडतील. तुम्ही स्वच्छ आंखीव रस्त्यावरून जाल नि होडींत बसून सरोवर ओलांडाल; सुंदरशा उपवनांत शिराल नि पुढे एखाद्या टुमदार नगरींतून जंगलाची वाट चालूं लागाल; वर मान केली तर आकाशांत तारकापुंज दिसतील अन् भूसपाट दृष्टि फिरवितील तर भोवतालच्या समुद्रांत द्वीप-पुंज दिसतील. भारताप्रमाणेच फिन्लंडच्या दक्षिणेला तीन बाजूने सागरी वेढा पडलेला आहे. भारताला जसा अरबी

समुद्र तसा फिन्लंडला बोथनियाचा उपसागर; भारताच्या दक्षिणेला जसा हिंदी महासागर व पूर्वेला बंगालचा उपसागर तसा याच्या दक्षिण व पश्चिम दिशांना फिन्लंडचा उपसागर असून त्यात ३० हजार ७० बेटें समूहाने वसलेलीं आहेत; पैकी दक्षिण किनाऱ्यानजिकचा आर्किपेलेगोचा द्वीपसमूह साऱ्या युरोपमधे सर्वांत मोठा मानला जातो. हेल्सिंकीपासून तो ४० मैलांवर आहे. तिथलें क्षितिजाला भिडलेलें दाट धूसर रान—विशेषत: आलंदद्वीपाचें रान राजधानींतून दिसतें.

फक्त १३ टक्के शेत जमिनीवर अर्धा फिन्लंड म्हणजे वस्तीचा ४२ टक्के भाग उपजीविका करून आहे. मानवाने श्रम, कल्पकता व रचना यांतून निर्मिलेला व निसर्गाने स्वयंसिद्ध थाटलेला असे या देशाचे दोन स्पष्ट भाग पडतात. वायव्येच्या तोर्नियोपासून आग्नेयेच्या लापींतारापर्यंत एक रेषा ओढली तर डाव्या हाताकडचा भाग शेती व बागायती, कारखाने व नगरें यांचा म्हणजे मानवनिर्मितीचा आहे. उजवीकडचा भाग सरोवरें व जंगलें यांनीं व्यापलेला स्वयंसिद्ध निसर्गनिर्मितीचा आहे. सत्तावीसशे मैलांचें सागरतुल्य साईमा सरोवर या भागाच्या मध्याला आहे. १८६० सालापासून या देशांत उद्योगधंदे सुरू झाले. पण एकूण देशाच्या मानाने त्याची वाढ अजूनहि अपूर्णच असल्याने औद्योगिक संस्कृतीचा ठसा कारखान्याभोवतालच्या भागापुरता म्हणजे स्थानिक स्वरुपाचाच आहे. शेती थोडी असल्याने जंगलचें काम जोडधंदा म्हणून करावेंच लागते. शेतीच्या उत्पन्नांत वरच्या वायव्य भागांत बटाटा व बार्ली, त्याखालच्या भागांत राई, ओट व उन्हाळी गहूं, त्याखालीं गळीताचीं धान्यें; त्याखालीं बीट–यापासून साखर तयार होते–व त्याखालीं शहाळू गहूं, हे पिकाचे परिमित प्रकार आहेत. काहीं कंद व फळभाज्या आणि फळें होतात. पण तांदूळ मात्र मुळींच नाहीं. ४२ टक्के म्हणजे १६ लक्ष ७४ हजार लोक शेतावर उपजीविका करणारे असले तरी त्यांत खातेदार २ ल. ६० हजारच आहेत. कुटुंब चार माणसांचें मोजलें तर खातेदार कुटुंबांची वस्ती साडेदहा लाखांची होते. बाकीची सहा लाखाची वस्ती शेतमजुरांची आहे. यांत क्वचित् कुळें असलीं तरी या देशांत कूळ ही संस्था जवळ जवळ नाहींच. २ ला. ६० हजार खातेदारांपैकी शे. $\frac{1}{10}$ म्हणजे फक्त २६० खातेदार प्रत्येकी २५० एकर जमिनीचे मालीक आहेत. शेकडा

अर्धा म्हणजे १,३०० खातेदार प्रत्येकी १२५ एकरवाले; शेकडा ३·८ म्हणजे ९,८८० खातेदार प्रत्येकी ६४ एकरवाले; शे. २३·९ म्हणजे ६२,४०० खातेदार ३० एकरवाले; शे. ३३·७ म्हणजे ८६,००० खातेदार १३ एकरवाले व शे. ३८ म्हणजे ९९,००० खातेदार प्रत्येकी ६ एकरवाले अशी वर्गवारी पडते. यांतल्या काहींचीं स्वत:च्या मालकीचीं जंगलें आहेत. पशुसंवर्धन व दूधदुभतें हे धंदेहि काहीं प्रमाणांत शेतकरी करीत असले तरी हा धंदा मुख्यतः सहकारी पद्धतीवरच चालतो. देशाच्या एकूण उत्पादनमूल्यांत शेती उत्पादनाचें मूल्यमान शे. १५ टक्के इतकेच आहे. एकंदरीने हें प्रमाण कनिष्ठ प्रतीचेंच ठरतें. थंड हवामान हेंहि याचें एक कारण असेल. निसर्गाच्या या वैशिष्ट्यांमुळेच इतर युरोपीय देशांसारखा सरंजामदारीचा प्रभाव इथे पडला नाहीं व सहकारी पद्धतीचा उदय इतरांच्या मानाने बराच आधीं झाला व वाढला. आजहि उद्योगधंद्यांत तिचाच प्रभाव आहे. यामुळेच या देशांत रॉकफेलर व फोर्ड किंवा टाटा व बिर्लासारखे नऊकोट नारायण उद्योगपती नाहींत; महाराजा दरभंगासारखे जमीनदार नाहींत आणि मानवी जीवनाला सर्वस्वी मोताद असलेले भूकेकंगालहि नाहींत. अपवादात्मक असा एखाद दुसराच भिक्षेकरी इथे आढळेल. व्यक्तिव्यक्तींच्या आर्थिक श्रेणींत उच्चनीचता असली तरी ती पराकोटीची नाहीं नि सामाजिक जीवनांत तर मुळीच नाहीं. यामुळेच फिन्लंडचे कित्येक अध्यक्ष व मंत्री अगदी खालच्या श्रेणींतून आलेले आहेत. आजचे (आता माजी) अध्यक्ष पासीकीव्ही व महामंत्रि केकोनन हे असेच अगदीं खालचे—सामान्यांतले आहेत.

फिन्लंडच्या आर्थिक व सामाजिक जीवनाची उभारणी वैयक्तिक मालकीवर झालेली असून व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजेच चढाओढ ही तिची स्फूर्ति आहे. रेल्वे व बंदरें, दारू व रसायनें यांवर अर्थातच सरकारची पूर्ण मालकी आहे. जंगलचें सर्वांत मोठें मालीक तेंच. एकूण फिन्लंडचे ३१ टक्के इमारती लाकूड सरकारी जंगलात आहे. सरकारी शेती जेमतेम २ टक्के आहे. राष्ट्राच्या एकूण उत्पन्नांत सरकारी उत्पन्नाचा भाग १५ टक्के आहे. म्हणजे आर्थिक जीवनाचा व उलाढालीचा ८५ टक्के भाग खाजगी मालकीच्या नियंत्रणाखाली आहे. अनेक छोट्यामोठ्या भांडवलदार व्यक्ति एकत्र येऊन सहकारी पद्धतीने तो चालवितात. याचें एक उदाहरण देतो. हेल्सिंकींत ‘ प्रेस हाऊस ’ नांवाची

अनुक्रम 23048 वि: ...२-३३
क्रमांक 230 नों: दि: 29/3/14

एक पांच मजली टोलेजंग इमारत आहे. निमंत्रणावरून मी तेथें गेलो होतो. तळमजला व पहिला मजला यांवर छापखान्याचा सर्व यंत्र विभाग होता. जर्मन बनावटीची अद्यावत् यंत्र सामुग्री, फाऊन्ड्री, बाईंडिंग, ब्लॉकमेकिंग हे सर्व प्रकार या दोन मजल्यांवर आहेत. हेल्सिंकींत प्रसिद्ध होणाऱ्या एकूण वृत्तपत्रांचीं कार्यालयें तिसऱ्या मजल्यावर आहेत. फिन्लंडच्या प्रत्येक राजकीय पक्षाचीं दैनिकें व नियतकालिकें आहेत. शिवाय स्वतंत्र अशीहि काहीं खेळ, फॅशन्स, करमणूक या विषयाला वाहिलेलीं नियतकालिकें आहेत. स्त्रिया व मुलें यांचींहि साप्ताहिकें आहेत. यांतली काहीं व्यक्तींचीं, काहीं व्यक्तिगटांचीं तर काहीं पक्षांचीं आहेत. चौथ्या मजल्यावर प्रेस हाऊसचें कार्यालय व कॅंटीन आहे. ही इमारत, छापखाना व कॅंटीन आणि काहीं नियतकालिकें, हा सर्व परिवार अनेक लोकांनीं मिळून उभारलेल्या सहकारी ( भांडवलाच्या ) संस्थेचा आहे. राजकीय पक्षांचीं प्रकाशनें पैसे घेऊन छापलीं जातात. पत्रांचा विक्री बटवडा हीच संस्था करते. पक्षीय पत्रांच्या कार्यालयासाठीं दोन किंवा तीन सुसज्ज खोल्या भाड्याने दिलेल्या असतात. त्यांतलें फर्निचर संस्थेच्या मालकीचें असते. अर्थात हीं सर्व पक्षीय व अपक्षीय प्रकाशनें कार्यालयें एका ठिकाणी नांदतात, आपापल्या धोरणाप्रमाणे प्रसंगीं एकमेकांवर मत-प्रहारहि करतात. तसेच संपादक हास्यविनोद करीत कॅंटीनमधे एका टेबलावर जेवतात, सवडीप्रमाणे खेळतात, खिदळतात, मजा करतात. यामुळे आपापली पक्षनिष्ठा तीव्र असूनहि त्यांच्यांत सहिष्णुता व एकमेकांबद्दलचा आदरभाव दिसून येतो. आम्हा संकुचित व कुजट पक्षांध भारतीयांना यापासून जरूर बोध घेण्यासारखा आहे. व्यवसाय दृष्ट्या याचा असाहि फायदा आहे की प्रत्येक पत्राचें कार्यालय सुसज्ज, सुस्थित, आकर्षक व भारदस्त दिसतें. आमच्यासारखी फळकटीं ओंगळ टेबलें, केरकचरा, रुक्षता याचा तिथे मागमूसहि नाहीं. पक्षनिष्ठेनुरूप या वृत्तपत्राचा दैनिक खप ३० हजार ते अडीच लाखांपर्यंतचा आहे. सोशल देमोक्रेती ( आपला प्रजा-समाजवादी ) अकरार ( शेतकरी ) कॉंझरवेटिव्ह, लिबरल, स्वतंत्र व कम्युनिस्ट असे इथे सहा पक्ष आहेत. ‘ वापाससा ’ व ‘ सोसीआल देमोक्रिति ’ हीं सो. डेमोक्रेट पक्षाचीं ’, ‘ त्यो कोमसाना ’, ‘ सोनोमात ’ व ‘ कॉम्युनिस्ती ’ हीं कम्युनिस्ट पक्षाचीं; ‘ हेल्सिंकी न्यूझ ’ हें लिबरल पक्षाचें; ‘ यू सी स्यॉमी ’ हें कॉंझरवेटिव्ह पक्षाचें आणि ‘ आकरारी ’ हें शेतकरी पक्षाचें अशीं दैनिकें

व साप्ताहिकें आहेत. पैकी हेल्सिंकी न्यूजचा खप सर्वांत जास्त म्हणजे अडीच लाखांचा आहे. मात्र या खपावरून त्या पक्षाच्या सामर्थ्याचा अंदाज करणें सपशेल चूक ठरेल. 'हुफ वुडस्टाड्स ब्लातेत' हें स्वीडिश दैनिक असून त्याचा खप ६० हजाराचा आहे. इथल्या स्वीडिश भाषी वस्तीचें प्रमाण मात्र ८·२ टक्के म्हणजे वस्ती सुमारे पांच लाखांचीच आहे. बाकीच्या पत्रांच्या ३० हजार ते लाखपर्यंत प्रती खपतात. साक्षरतेचें प्रमाण ९८ टक्के असून वाचकांत फुकटेगिरी तर नाहींच पण अन्नवस्त्राप्रमाणे वृत्तपत्र ही जीवनाची अवश्य बाब इथे मानतात. प्रत्येक माणूस कमावणारा आहे. बेकार कोणी नाहीं. पत्रांच्या खपाचीं हीं कारणें सांगतां येतील.

प्रेस हाऊसचें आणखी एक वैशिष्ट्य म्हणचे बौद्धिक ( पत्र-लेखक ) आणि श्रमिक या दोन्ही कामगारांची ट्रेड युनियन एकच आहे. या ट्रेड युनियनतर्फे होणाऱ्या समारंभांत संस्थेचे भांडवलदार-चालकसुद्धा भाग घेतात. प्रेस कामगारांचे सर्वसामान्य मासिक उत्पन्न ४० ते ५० हजार व पत्रकारांचें ५० ते ६० हजार मार्का ( फिनी नाणें ) असतें. या नाण्याचे आपल्या रुपयाशी ७० ला १ हें प्रमाण असल्याने कामगारांचें वेतन सहाशे व लेखकाचें सात-साडेसातशे रुपये होतात. भारतीय उत्पन्नाशी तें ताडून पाहण्यासारखें आहे. छापखान्याप्रमाणे सर्वच धंद्यांत युनियन्स असून त्या सर्व सरकारमान्य आहेत. प्रेस हाऊसप्रमाणेच रहाण्याचीं घरें, स्टोअर्स, बँका, रेस्तोरां हीं सर्व सहकारी संस्थानिविष्ट आहेत. लहान प्रमाणावर नि वैयक्तिक मालकीचे असेहि काहीं धंदे आहेत. पण संघटित सहकारी संस्थापुढे त्यांचा निभाव जेमतेमच लागतो.

उद्योगधंद्यांच्या बाबतींत युरोपखंडांत हा देश फार उशीरा जागा झाला. मुंबईत पहिली गिरण जेव्हा घातली गेली त्या सुमाराला ( सन १८६० ) या देशांत उद्योगधंदे सुरू झाले. तथापि भारताप्रमाणेच पराधीनतेमुळे त्यांचीहि फारशी वाढ स्वातंत्र्यप्राप्ती कालापर्यंत होऊं शकली नाहीं. त्यावर्षीं म्हणजे १९१७ सालीं रशियांत क्रांति होऊन तिथे सोवियत् सत्ता स्थापन झाली. झारने पूर्वी पादाक्रांत केलेल्या सर्व देशांना या नवोदित जनसत्तेने संपूर्ण स्वातंत्र्य देऊन टाकलें तेव्हा फिन्लंड स्वतंत्र झाला. हजार वर्षेपर्यंत चाललेला त्यांचा स्वातंत्र्याचा अविरत संग्राम तेव्हा संपला. त्या

नंतरच्या बावीस वर्षांत १९३९ पर्यंत फिन्लंडने पुष्कळच प्रगति केली. पण त्या वर्षाच्या हिंवाळ्यांत त्याचें दुर्दैव ओढवलें व रशियाशी विंटर वॉर नांवाने प्रसिद्ध झालेली लढाई जुंपली. ती त्याला अनेक परीने भोवली.

फिन्लंड मोठा खडतर नशिबाचा तर खराच; हजार वर्षें त्याला या नशिबाशी अहोरात्र झगडावे लागलें आहे आजच्या फिनांचें दोन हजार वर्षांपूर्वींपासून या देशांत वास्तव्य आहे. शांततेनें जीवन जगून ते राहूं लागले. पण पुढे ११ व्या शतकांत त्यांना ख्रिश्चन धर्माच्या झंझावातापुढे वांकावे लागलें. इ. स. १०५० मधे त्यांनीं तो धर्म स्वीकारला. त्या घटकेपासून त्यांना दुर्दैवाने ग्रासलें. रोमन धर्मपीठाच्या प्रेरणेने त्या वर्षीं स्वीडनने त्यांच्यावर प्रथम आक्रमण केलें व १२९० सालापर्यंत तो देश पूर्णपणे ग्रासून टाकला. स्वीडन त्याच्या पश्चिम सरहद्दीला लगटलेला आहे, तसा रशिया त्याच्या पूर्व सरहद्दीला भिडलेला आहे. सर्व फिन्लंड जिंकून व त्याचा पूर्वेचा केरेलीया प्रांत गिळंकृत करून स्वीडन रशियाशी जाऊन भिडला तेव्हा रशियाने त्याच्याविरुद्ध शस्त्र उगारलें. मग, स्वीडन व रशिया यांच्या एकमेकाशी लढाया होवोत, की त्यांपैकी कुणाचेहि फिन्लंडशी खुसपट निघो; पण या सर्व लढाया फिन्लंडच्या भूमीवरच झाल्याने तिचा मात्र सतत विध्वंस होत राहिला. सहाशे वर्षें या लढाया चालल्या. सन १७१३ ते २१ च्या लढाईंत रशियाने स्वीडनचा संपूर्ण पराभव करून फिन्लंड ताब्यांत घेतला. तरी पुढे शंभर वर्षेंपर्यंत शस्त्रास्त्रें खणखणत असत व रक्तपात होत असे. पुढे मात्र १८१२ सालीं रशियाने नेपोलियनची टोळधाड पिटाळून लावल्यावर स्वीडन शरण आलें व त्याने फिन्लंडवर रशियाची अधिसत्ता मान्य केली. पुढे दुसरा अलेक्झांडर या झारने त्याला अंतर्गत स्वायत्ततेचे अधिकार दिले. पण तेहि अधिकार १८९९ मधे काढून घेतले गेले. रशियाप्रमाणे इथेहि १९०५ सालीं झारविरुद्ध उठाव झाला. तो मोडून काढला गेला. नंतर १९१७ च्या क्रांतिनंतर मात्र त्याला संपूर्ण स्वतंत्रता प्राप्त झाली नि तेव्हापासून १९३९पर्यंत त्याची पुष्कळ प्रगति झाली.

पण या सालीं त्याने गेल्या हजार वर्षांच्या इतिहासाची शिकवण लाथाडून नष्टचर्य ओढवून घेतलें. हिटलरने म्यूनिच करारानंतर झेक राष्ट्र गिळंकृत करून बाल्टिक समुद्रापर्यंत धडक मारली तेव्हां फिन्लंडचें

आखात ओलांडून तो लेनिनग्राडवर चाल करणार हे स्पष्ट झालें. या आक्रमणाविरुद्ध संरक्षक फळी उभारण्यासाठी सोवियत् यूनियनने त्याच्या रशिया लगतच्या केरेलीया प्रांताची ३० मैल भूमि मागितली. पण फिन्लंडचे तेव्हाचे अध्यक्ष मार्शाल मॅनरहॅम यांनीं दोस्ताच्या आंतल्या चिथावणीवरून ही मागणी नाकारली. वास्तविक मॅनरहॅमचें सर्व आयुष्य रशियांत गेलेलें; तिथल्या सैन्यातला तो एक बडा अधिकारी. १९१७ च्या क्रांतीचा तो विरोधक होता; पण त्याच क्रांतींतून जन्मलेल्या सत्तेने त्याच्या मायभूमीला स्वातंत्र्य दिले होतें. तरी तो आज रशियाच्याविरुद्ध गेला. दोघांच्या हिताची ठरणारी मागणी त्याने नाकारली तेव्हा रशियाने १९३९ च्या हिवाळ्यांत स्वारी करून केरेलियाचा तो भाग घेतला. पुढे वर्षभरांतच हिटलरच्या हालचालींचे अंदाज खरे ठरले. त्याने फिन्लंडच्या उत्तर भागांत —ध्रुवबंधांत दोन लाख सैन्य उतरविलें व तिथून लेनिनग्राडवर धडक मारली. रशिया-फिन्लंडच्या तहान्वयें जर्मनांना फिन्लंडमधून हांकून लावण्यांत फिनी सरकारनें या लढाईत रशियाला मदत करायची होती. ती त्याच्या हातून न झाल्याने रशियाने एकाकी लढाई दिली व तिचा खर्च फिन्लंडकडून भरून मागितला. १९४४-४५ सालीं हिटलरचा बीमोड होऊन फिन्लंड मोकळा झाला. नंतर १९४८ मधे रूसो-फिनिश मैत्रीचा करार सध्याचे फिनी अध्यक्ष पासीकिवी यांनीं घडवून आणला. पण या करारापायीं फिन्लंडला आपला केरेलिया प्रांत, तसेच कौसामो व पेतसामोचें धरण नि पावरहाऊस असलेला भाग हे मिळून १७,७०४ चौरस मैलांचा प्रदेश म्हणजे देशाचा दहावा हिस्सा सोवियत् यूनियनला तोडून द्यावा लागला. शिवाय ३० कोटी डॉलर्सचा युद्धदंड त्याच्या माथी बसला. हा दंड त्याने इलेक्ट्रिक केबल्स, लाकूड सामान, कागद, यंत्रें, कारखाने आणि नव्याजुन्या बोटी अशा प्रकारच्या वस्तुरूपाने आठ वर्षांत भरपाई करायचा होता. हा दंड अति डोईजड होता यांत शंका नाहीं.

युद्धाच्या गरमागरमींत जरी हीं कलमें ठरविलीं गेलीं होतीं तरी १९४८ मधे या दोन देशांत मैत्रीचा करार झाला तेव्हा दंडाची भरपाई त्या सालापर्यंत होऊन जे देणें शिल्लक उरले होतें त्यांतील निम्मी रक्कम रशियाने सूट दिली. शिवाय दंडापोटी ज्या वस्तू द्यायच्या होत्या त्या वस्तूंचे कराराच्या

वेळी ठरविलेले भावहि १० ते १५ टक्के वाढवून दिले. याचा अर्थ असा की वाढत्या किंमतीने हिशोब मोजला गेल्यामुळे फिन्लंडला एका परीने १५ टक्के सूटच मिळाली. अशा रितीने काहीं अंशीं हलका झालेला बोजा फिन्लंडने नियोजित काळांत फेडून टाकला. तथापि या भुर्दंडापलीकडेहि त्याचे अतोनात नुकसान झालेच होतें. प्रथम रशियाशी व नंतर जर्मनीशी झालेल्या लढ्यांत त्याचीं लाखभर माणसें कामाला आलीं. जाळपोळीमुळे खेडीं व कारखाने उध्वस्त झाले. उत्पादन अतिशय घटलें. हजारो–लाखो लोकांचें स्थलांतर होऊन हाल हाल झाले. तरीहि फिन्लंड या अग्निदिव्यांतून कणखर नि आशावादी मनाने बाहेर पडला व सांवरला.

या युद्धाने फिन्लंडचें परराष्ट्रीय धोरण, त्याचे उद्योगधंदे, त्याचें सामाजिक जीवन या सर्वांवर दाट ठसे उमटविले आहेत. यांतल्या दोन गोष्टी मला अभूतपूर्व अशा दिसल्या. राष्ट्र उभारणीच्या भावनेने समाजांतले सारेच थर उत्स्फूर्त झालेले आहेत. पिसाटल्यासारखे ते सतत उद्योगांत गढलेले आहेत. यंत्राचीं चाकें जशी विजेच्या वेगाने घरघरताहेत तसेच माणसांचे हातपाय ! चोहोबाजूने निर्मिति व रचना चालू आहे. पण त्यांत स्त्रिया व विद्यार्थी यांची कामगिरी काहीं विलक्षणच ! औद्योगिक प्रगतीच्या साऱ्याच देशांत स्त्रिया आपला वाटा उचलताहेत. रशियादि सोशालिस्ट देशांतल्या स्त्रियांची कामगिरी मी पाहिली आहे. तरीहि फिनी स्त्रीचें मला विशेष कौतुक वाटले हे खरे आहे. युद्धकालीं पुरुषांचा संहार होत होता तेंव्हा तिने देश आपल्या खांद्यावर पेलून धरला. पडतील तीं सर्व कामें तिने वास्तव कर्तव्य म्हणून उपसलीं. पोस्ट, रेल्वे आदि वाहतूक, कारखाने, दुकानें, शाळा, कचेऱ्या, ही तर सर्वथा तिनेच संभाळलीं; वैद्यकीय पेशा, केमिस्ट या व अशा पेषांत ती आघाडीवर राहिली; खांद्यावर बंदुक घेऊन ज्या इर्षेने ती देश रक्षणाचें जीवामोलाचें काम करीत होती त्याच एकतानतेने ती हातांत वस्तरा घेऊन आज स्मश्रुगृहांत येणाऱ्या जाणाऱ्यांची दाढी सफाईने गुळगुळीत करीत आहे. तिच्या या पेषामुळे फिन्लंडमधें अशी एक म्हण पडली आहे की अमक्याचें लग्न दाढी करता करता जमलें. औषध विक्रेत्यांत ८५ टक्के, दंतवैद्यांत ७७ टक्के, वैद्यकीय उच्च पदवीधरांत २१ टक्के, कारखाने व कचेऱ्यांत ५२ टक्के, शिक्षणांत ६० अधिक टक्के

असे तिचे प्रमाण सांपडतें. स्त्रियांचें वेतनमानहि पुरुषांपेक्षा सरस आहे. स्त्रीचें २६८ तर पुरुषाचें २४८; लोकवस्ती व आयुमर्यादेंतहि तें जास्तच आहे. युद्धांत स्त्रियांच्या खड्या पलटणी होत्या. आता त्यांना मनाई आहे. सकाळीं उठून फिनी स्त्री घर शृंगारील; आपल्या घराच्या खिडक्यांत व गॅलरींत ताज्या टवटवींत फुलांची आकर्षक रचना करून ठेवील; दिवसभर कामावर जाईल; संध्याकाळीं बाजारहाट उरकून घरीं येईल व वल्ही खाकोटीला मारून रोव्हींगला जाईल. नंतर सावनांत जाऊन स्नान करील. फिनी लोक स्नानावाचून सहसा रहायचे नाहींत. स्नानानंतर स्वयंपाक करून किंवा कँटीनमधे जाऊन जेवील व मग रात्रीं ११ वाजेपर्यंत एकटी वा पति असल्यास त्याच्याबरोबर किंवा मैत्रिणींना घेऊन फिरत राहील. कधी नाटक-सिनेमाला किंवा स्टेडियमवर खेळायला जाईल. तिचा बांधा सम-प्रमाण व सडसडीत असून सशक्त पण नाजूक आहे. चित्रासारखी ती रेखीव व देखणी आहे. गाल ओठ व नखे ती रंगविते. पोषाख नीटस पण पश्चिमेकडील स्त्रीसारखा चवचाल नाहीं. कितीहि काम पडलें तरी तिच्या चेहऱ्यावरचें स्मित अन् प्रसन्नता ढळायची नाहींत. ओतानेमीच्या कँटीनमधे आम्ही सहाशे लोक दिवसांतून तीनदा जेवत होतों. तिकडच्या पद्धतींत बशादि उपकरणांचा पसारा फार; पण साऱ्या आठ बायका वाढणें, बशा धुणें, हिशेब संभाळणें, ही कामें दिवसांतून तीनतीनदा उरकत होत्या. पण त्यांना कधी कातावलेल्या की दुर्मुखलेल्या आम्हीं पाहिल्या नाहींत. सर्व सामान्य रशियन स्त्रीपेक्षाहि फिनी स्त्री मला अधिक तरतरीत, उरक असलेली, कार्यक्षम व मोहक दिसली.

फिनी स्त्रीप्रमाणेच आजचा तरुण विद्यार्थि हीहि फिन्लंडची अभिनव शक्ति आहे. त्याच्या रचनाकौशल्याचीं अनेकविध दर्शनें आम्हां घेतलीं आहेत. श्रमदानाला त्यांनीं उत्तुंग नि महत्तम स्वरूप दिले आहे. युद्धाचा एक परिणाम म्हणजे ग्रामीण वस्तीचें उच्चाटन व शहरांकडे तिचें स्थलांतर; हेल्सिंकीच्या परिसरांत लाहती नांवाचें ४५ हजार वस्तीचें उपनगर युद्धोत्तर कालांतच उभारले गेलें; अन् रोवानेमीसुद्धा. आम्हीं ज्या ओतानेमींत रहात होतों तें असेच आधुनिक वस्तीचें उपनगर आहे. सतरा दिवस आम्ही तिथे राहिलों. रशियन, चिनी, जपानी, इंडोचिनी, कॅनडी व भारतीय, इतकी

प्रतिनिधि-मंडळें या नगरींत शेजारशेजारच्या पांच इमारतींत रहात होतीं. या सर्व इमारती विद्यार्थ्यांनीं स्वतःच्या श्रमाने बांधलेल्या आहेत. हेल्‌सिंकीची वस्ती वाढत चालली तशी विद्यार्थ्यांचीहि. त्यांना शिक्षणसंस्था व वसतीगृहें निकडीने पाहिजे होतीं. युद्धकुंडांतून होरपळून निघालेलें सरकार तिजोरीचा तळ दिसत असल्याने अगतिक झाले होतें. पण सर्वांनाच राष्ट्र उभारणीचें वेड लागलेले होतें. अशा वेळीं विद्यार्थी-संघाने कमर बांधली. त्यांच्या देहांत ताजें रक्त सळसळत होतें. मनांत महत्त्वाकांक्षा होती. डोक्यांत कल्पकता होती व हातापायांत जोम होता. वसतीगृहें व शाळा यांचा प्रश्न त्यांनीं हातीं घेतला. सरकारने जागा व जंगलांतलीं इमारती लाकडें देऊं केलीं. पुढचें काम विद्यार्थ्यांनीं शिरावर घेतलें. त्यांनीं जमिनी साफ केल्या, लाकडें तोडून आणलीं. सुतार बनून दारें-खिडक्या नि जिने केले. गवंडी बनून बांधकाम केलें. मजूर बनून पाट्या वाहिल्या. तंत्रस्वरूपाची अडेल तेवढ्या कामापुरतीच बाहेरची मदत घ्यायची. वसतीगृहाशेजारी त्यांनीं कँटीन उभारलें आहे. विद्यार्थ्यांशिवाय गांवांतले लोकहि तिथे जेवतात. या इमारतीसाठी विद्यार्थी-संघाने कर्ज उभारलें. त्याची फेड वसतीगृहाचें भाडें व कँटीनचें उत्पन्न यांतून होते. कर्जफेडीनंतर या इमारती संघाच्या निर्वेध मालकीच्या बनतील. जवळच एक भव्य स्टेडियम बांधला जात होता तो पहाण्यासाठी आम्ही गेलों होतों. तीन हजार बैठका राहतील एवढा या स्टेडियमचा मुख्य हॉल आहे. त्यालगत हिंवाळ्यांत आंतल्या आंत खेळण्यासाठी टेनिसकोर्ट, व्यायामशाळा व बैठे खेळ यांचीं दालनें आहेत. मुख्य हॉलमध्यें नाच-गाणी, नाटकें-खेळ आदि कार्यक्रम नि चढाओढीचे सामने होतील. पलीकडे एक फील्म स्टुडियो आहे. यावरून ही इमारत केवढी मोठी असेल याची कल्पना येईल. आम्ही गेलों तेव्हा बांधकाम चालू होतें. सर्वत्र सामान अस्ताव्यस्त पडले होतें. वेताच्या भेंडोळ्यांतला एक मी उचलला. संस्थेचे डायरेक्टर तिथेच कामाचे कपडे चढवून लाकडें तासत होते. त्यांचें माझ्याकडे लक्ष गेलें व हंसत हंसत मला म्हणाले, भारताचा वास आला वाटतें तुम्हांला ! आम्हाला लागणारा वेत आम्हीं तुमच्या देशांतूनच मागवतों. गंगा प्रदेशाचा आहे तो ! त्यांच्या त्या विनोदाने मी हंसलों पण मनांतल्या मनांत मात्र खजील झालों ! आमच्या देशांतून काय जातें अन् काय येतें याचा पत्ता आहे कुठे आम्हाला ! अशीच

विद्यार्थि भवनें, वसतिगृहें, स्टेडियम्स् ठिकाठिकाणीं आढळतील. फिनी विद्यार्थ्यांच्या श्रमदानाचा हा महिमा अनन्यसाधारण आहे. आमच्या विद्यार्थ्यांनी त्याचा कानोसा घेण्यासारखा आहे. इथे निर्देशिलेली सहकारी चळवळ विद्यार्थ्यांपुरती मर्यादित नाहीं. एकूण जीवनाचा बराच भाग तिने व्यापलेला आहे. भारताला सहकारी पद्धतीवर जीवन उभवायचें असल्याने त्याने फिन्लंडच्या सहकारी अर्थजीवनाचा जवळून परिचय करून घ्यायला पाहिजे.

क्षेत्रफळाच्या मानाने फिन्लंडची वस्ती पुष्कळच कमी आहे हें मागे सांगितलेंच आहे. इथले जननमान बरेंच कमी म्हणजे दर हजारी २१ आहे. तर मृत्युमान सुमारे १० असल्याने संख्यावाढ दर हजारी ११ या मानाने होते. या वाढींतून घटसुद्धा मोठ्या प्रमाणांत होत राहिली आहे. गेल्या महायुद्धांत सुमारे ८२ हजार लोक मारले गेले. हें युद्धकारण सोडलें तरी सन १८७० पासून १९५० पर्यंतच्या सत्तर वर्षांत इथल्या हजारो–लाखो लोकांनीं देशत्याग करून अमेरिका व कॅनडा या देशांचा आश्रय केला. १८८० पूर्वीं किती गेले याची मोजदाद ठेवलेली नाहीं. पण तिथून पुढच्या दहाच वर्षांत १ लाख ५९ हजार लोक देश सोडून गेले. १९२१ ते ३० या काळांत ६० हजार गेले. ही संख्या अधिक वाढली नाहीं याचें कारण त्याच सुमाराला अमेरिका व कॅनडा देशांनीं बाहेरून येणाऱ्यांवर कडक निर्बंध घातल्याने तो प्रवाह रोखला गेला. तथापि मागच्या युद्धकालांत या प्रवृत्तीने पुन्हां उसळी मारली व १९४५ ते ५२ या आठ वर्षांत ७७ हजार फिनांनीं हालापापांना कंटाळून मातृभूमीचा त्याग केला. या ७७ हजारांतले ५६ हजार स्वीडनला गेले ते बहुतांश स्वीडीश भाषाभाषी लोक असावेत. सुमारे लाख माणसें मारलीं गेलीं. जननक्षम अशी एवढी मोठी प्रजा उठली याचा तात्कालिक तसाच दूरगामी परिणाम देशाच्या संख्याबलावर झाल्या-शिवाय कसा राहिल? फिनी प्रौढांत तरी मला अमेरिकन धार्जिणेपणा बराच दिसला. याचें एक कारण म्हणजे तो देश त्यांना निर्धास्त असें आश्रय-स्थान वाटतो हें आहे. सतत एक हजार वर्षेपर्यंत त्यांच्यावर पूर्व व पश्चिम सरहद्दीच्या बाजूने कठोर प्रहार होत आले. त्यांत मागल्या युद्धांत बाल्टिक समुद्राकडून येणाऱ्या (जर्मन) प्रहाराची भर पडली. रशियाहि त्याच्याशी

फार कडकपणाने वागला. या दुर्दैवाला खंडच नाहीं. ही वैफल्याची दारुणताच त्यांच्या देशत्यागाला कारणभूत झालेली आहे. पण आता विशेषत: तरुण पिढीने तरी हें वैफल्य झाडून टाकण्याचा निश्चय केलेला दिसतो. आपल्या विशिष्ट भौगोलिक व नैसर्गिक अवस्थेंतसुद्धां राष्ट्रसंवर्धनाची नवोर्मि त्याच्या अंत:करणांत उफाळून राहिलेली आहे. शेजाऱ्याकडे पाहाण्याचा त्यांचा दृष्टिकोन बदलत आहे. रशियाची वृत्तीहि आतां स्नेहशील बनलेली आहे. या सर्वांमुळे पूर्वींची संकुचित व अलगपणाची वृत्ति सोडून आज तो जगाशी संपर्क जोडूं लागला आहे. रशियाच्या मैत्रीची महती आता त्याला जशी समजलेली आहे तसा शांततामय सहजीवनाचा आदेश त्याला नवचेतना देऊन राहिला आहे. फिन्लंडच्या ओसामी विभागाचे गव्हर्नर व एक मंत्री या दोघांनीं विश्वशांति परिषदेंत इतक्या तन्मयतेने भाग घेतला याचें इंगित हेंच आहे.

युद्धोतर कालांत फिन्लंडची औद्योगिक प्रगती चांगली झाली आहे. १९३९ ते ४५ दरम्यानच्या युद्धकालांत त्याचें चोहोबाजूने नुकसान झालें. १९४५ सालचें उत्पादन मान १०० धरले तर आजचें मान १५५ आहे. म्हणजे त्याने दीडपट प्रगति केली आहे. १९३८ च्या मानानेहि ही वाढ सवापट ठरेल. पण याच दहा वर्षांत त्याला युद्धदंडाचा केवढा तरी भार सहन करावा लागला. हा भूदंड नसता तर दिडीचें हें प्रगतिमान आणखीहि वाढलेलें दिसले असतें. १९५४ साली फिन्लंडच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नांत धातुधंद्याचें प्रमाण २५·७; खाद्यपदार्थ, दारू व तंबाकूच १७·८; लाकूड धंद्याचे १३·३; कागदाचे १५·८; गिरण्या व कापडाचे ११·४ या मुख्य बाबी आहेत.

फिन्लंडचा जुन्या काळचा निर्यातीचा व्यापार म्हणजे लाकूड व लाकडापासून तयार होणारा कागद. एकूण निर्यातींत यांचें प्रमाण शे. ८० ते ९० असे. पण मागल्या जागतिक युद्धांत, युद्धकार्याची गरज म्हणून धातुवस्तूंचें उत्पादन वाढीला लागलें आणि पुढे युद्ध दंडाची भरपाई या वस्तूंच्या रूपानें करायची ठरविल्यामुळे तर त्या धंद्याची चांगलीच वाढ होत गेली. दंड भरपाई झाल्यानंतर आता धातूच्या एकूण उत्पादनाचा पांचवा हिस्सा परदेशी निर्यात केला जातो. १९५४ च्या एकूण निर्यातींत तिचें प्रमाण शे. १५ होतें. फिन्लंडमधे कोळसा नाहीं, यामुळे आगगाडीच्या

इंजिनांत लाकूडच वापरतात. इतर कामांतली कोळशाची उणीव विजेने बऱ्याच प्रमाणांत भरून काढली आहे. हजारो जलाशयांमुळे या देशांत ठिकठिकाणी पाण्याचा संचय विपुल आहे. १९१८ सालीं इथे २० कोटी किलोव्हॅट वीज निर्माण होत असे. आज ती ५५० कोटी किलोव्हॅट इतकी निर्माण होते. प्लायवूड, बॉबीन्स, आगपेट्या, सेल्यूलाइड, कागद, यांशिवाय कारखान्याचीं व शेतीचीं छोटींमोठीं यंत्रें, विजेचीं व वाफेचीं इंजिनें, होड्या व बोटी, आगगाड्यांचे डबे, तसेंच कागद व कापड यांच्या गिरण्या, कातडें, कातड्याच्या व रबराच्या वस्तू, दगड, चिनी माती व कांच यांच्या सुबक वस्तू या देशांत पैदा होतात. मोटारी व टायर्स मात्र अजून बाहेरून आणावी लागतात. दळणवळणाच्या दृष्टीने फिन्लंडची स्थिति बेटासारखी आहे. पूर्वेला लेनिनग्राडशी त्याची रेल्वे जोडलेली असून परदेशाशी दळणवळणाचा तोच एक लोहमार्ग आहे. बाकीच्या जगाशी त्याला जलमार्गानेच व्यवहार करावा लागतो. यामुळे इथे जहाज बांधणीचा धंदा मोठा आहे. १९३९ सालीं त्याच्यापाशी साडेसहा लक्ष टन वजनाचीं एकूण ८६१ जहाजें होती. पण लढाईत या शक्तीचा बराच ऱ्हास झाला. एकतर युद्ध दंडापायी रशियाला ८५ हजार टन वजनाची नव्या जुन्या बांधणीची १०५ जहाजें द्यावीं लागलीं. शिवाय ४० हजार टन वजनाची ३२६ जहाजें युद्धांत नायबंद झालीं, नि काहीं वापरायला निरुपयोगी ठरल्याने मोडावीं लागलीं. यामुळे १९४५ सालीं अडीच लाख टनाची ४७१ जहाजें शिल्लक राहिलीं. पण त्यानंतर या धंद्याची खूप वाढ झाली. १९५४ अखेर त्याने सव्वासात लक्ष टन वजनाच्या बोटी बांधून व्यापाराची आपली पूर्वींचीं सर्व क्षेत्रें व मार्ग पुन्हा चालू केले.

अशा परिस्थितींत प्रगतीचा एकेक टप्पा सावकाशीने पण दृढनिश्चयाने तो गांठत होता तरी वस्तूंच्या किंमती व मजुरीचे दर स्थिर करणें त्याला फार जिकीरीचे गेलें. १९४८–४९ सालीं मजुरीच्या दराचें मान वाढविण्यांत आलें; पण पुढे कोरियाची लढाई सुरू झाल्यानंतर तेजी आली व किंमती वाढूं लागल्या. ही वाढ १९५१ च्या मध्याला थांबली व स्थिरावली; पण त्यानंतरच्या तीन वर्षांत घाऊक बाजाराच्या किंमती १३ टक्क्यांनीं उतरल्या आणि फिन्लंडची निर्गत व्यापाराची जी सर्वांत महत्त्वाची बाब लाकूड व

लाकूडसामान यांचे भाव तर २२ टक्यांनीं खालीं आले. म्हणजे १९५४ सालअखेर घाऊक किंमतींचा निर्देशांक १६९४ (मार्क) होता तेव्हां जीवनमानाचा निर्देशांक १०४३ (मार्क) वर होता. पण याच वेळीं वेतनमानाचें प्रमाण औद्योगिक क्षेत्रांत २०९१ व शेतकामांत २०३९ होतें. कारकुनी पेशाचें पगारमान मात्र १३-१४०० होतें. या वेतनांतून दोन प्रकारचे कर द्यावे लागतात. पहिला प्रत्यक्ष करांचा प्रकार म्हणजे प्राप्ती कर व म्हातारपण, अपंगावस्था वगैरेसाठी उभारल्या जाणाऱ्या निधींतील त्याचा हिस्सा हा होय. या कराचें प्रमाण सडाफटिंग व कुटुंबवत्सल अशा दोन वर्गवारीने ठरविलेले असतें. तीस हजार मार्कांचें वेतन घेणारा सडा असेल तर त्याचा हिस्सा वेतनाचे १८ टक्के व तो कुटुंबवत्सल असेल तर ११ टक्के असा असतो. वाढत्या उत्पन्नाला हें प्रमाण वाढत जातें. जसे ३० हजारांवर सड्याला १८ टक्के तर ६० हजारांवर २३ टक्के व लाखाला २६ टक्के; पण कुटुंबवत्सलाला अनुक्रमें ११; १६ व २० टक्के असे असतें; याशिवायचा कर म्हणजे सेल्स टॅक्स. हा कर किमतींतच अंतर्भूत असल्याने तो अप्रत्यक्ष बनतो. प्रत्येक माणूस दरमहा हजार बाराशे मार्क किंमतीच्या जीवनविषयक वस्तू खरीदतो असे मानलें तर त्याला सेल्स टॅक्सचे २०० ते २५० मार्क द्यावे लागतात. औद्योगिक कामगाराचें वेतन २०८१ असल्याने प्राप्तीकर ४८२ होतो. हे दोन कर मिळून ७३२ मार्क व घरभाडें सुमारे १५० मार्क जाऊन शाश्वत वेतन ( Real wage ) म्हणजे त्याला मिळणाऱ्या २०९१ या ठोक चलनी वेतनाचें उपभोगमूल्य १२०० मार्क ठरतें. जीवनमानाच्या १०४३ या निर्देशांकाशी याची तुलना केली असतां फिन्लंडचें अर्थजीवन समृद्ध नसलें तरी सुसह्य असल्याचें सकृद्दर्शनी दिसतें. पण एकूण राष्ट्रीय उत्पन्न व खर्च यांचा मेळ बांधणारें बजेट तपासले तर तें तुटीचेंच दिसतें. याचा अर्थ असा की वेतनमानाची श्रेणी कायम ठेवायची तर बजेट तुटीचें होतें. पण ही तूट काढून टाकायची तर कर वाढवायचे किंवा वेतनमान कमी करावें लागतें; अशा अडचणीच्या अवस्थेंत फिन्लंडचें आजचें अर्थजीवन हेलकावे खात आहे. एकूण भांडवली अर्थव्यवस्थेचीच ती समस्या आहे. त्याला फिन्लंड तरी काय करणार ! अर्थात् अर्थजीवन स्थिर करायचें तर राष्ट्रीय उत्पन्न म्हणजेच उत्पादन आहे यापेक्षा अधिक वाढले पाहिजे हें स्पष्ट होईल.

फिन्लंडचें बजेट २०४ अब्ज २ को. ८० लक्ष मार्कांचें ( म्हणजे २९१ को. ४७ लक्ष रुपयांचें ) आहे. म्हणजे खर्च इतका आहे; तर उत्पन्न २०० अब्ज ६५ कोटींचें आहे. म्हणजे ३३७ कोटी ८० लक्ष मार्कांची तूट आहे. पण त्या उलट धंद्यातली सरकारी गुंतणावळ नि उसनवार रकमा या तुटीच्या १५ पट असल्याने जागतिक बाजारांत देशाची पत टिकून रहाते.

युद्धोत्तर भारताशी तुलना करण्याचा इथे मोह होतो. भारतांत फाळणोने जसा निर्वासितांचा प्रश्न निर्माण केला तसा युद्धाने फिन्लंडमधेहि निर्माण केला. करेलिया प्रांत रशियाला तोडून दिल्यावर तिथली बरीच वस्ती इकडे आली. सारा उत्तर प्रदेश जर्मनांनीं उध्वस्त केल्यामुळे तिकडून सहस्रावधि निर्वासितांचा लोंढा दक्षिणेकडे वाहून आला. या संख्येची राहण्याची व निर्वाहाची सोय करणे प्राप्त झाले. यासाठी सरकारने सामुदायिक तत्त्वावर घरबांधणीची योजना उभारली. हिला ' आरावा ' कार्यक्रम म्हणतात. हजारो नव्या इमारती उठल्या तरी अजून घरांचा प्रश्न पूर्णपणे सुटलेला नाहीं. मोठ्या जमिनदारांच्या जमिनी काढून घेऊन त्या शेतकऱ्यांना वाटून दिल्या आहेत. त्यामुळे, तसेच वाढत्या उद्योगधंद्यांमुळेहि पुष्कळांना कामधाम मिळाले. युद्धांत जायबंद झालेल्यांच्या भरणपोषणाची व्यवस्था केली. याच काळांत कामगारविषयक तसेच सामाजिक स्वास्थ्य, औषधोपचार, कुटुंब सहाय्य, शिक्षण, या योजना निग्रहाने अमलांत आणल्या. पडीक जमिनींची मशागत करून त्या शेतीसाठी उपयोगांत आणल्या. पन्नास वर्षांपूर्वीं इथे दहा हजारांत २७ हें क्षयरोगाचें मृत्युप्रमाण होते तें आता ९ वर आले आहे. रहाणीचें मान सुधारलें; स्वच्छता व स्वास्थ्य या संबंधीचे कार्यक्रम कसून पार पाडले गेले. लक्षावधि लोकांना क्षयादि रोगप्रतिबंधक लस टोंचली. शुश्रुषालयें सुधारलीं व वाढविलीं. १९३९ सालीं फिन्लंडच्या सर्व इस्पितळांत मिळून २४,५०० खाटा होत्या. १९५३ अखेर त्या ३२,५०० पर्यंत वाढविल्या गेल्या. त्यासाठी १,२०० डॉक्टर्स व ५,००० परिचारिका होत्या. आज त्यांची संख्या २,३५० व ७,००० इतकी झाली आहे. या इस्पितळांचा खर्च सरकार, सहकारी संस्था व कम्यून्स यांच्याकडून केला जातो. खेड्यांच्या विस्तारांत ४२० आरोग्यालयें उभारलीं गेलीं असून तीं डॉक्टर्स व औषधी यांनीं सज्ज आहेत. याशिवाय दहा हजार खाटांची सोय होईल अशी नवी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर

अनुक्रम .. .. ......... . वि: ...................
क्रमांक ........................ ता. दि:

मध्यवर्ति २१ इस्पितळें उभारलीं जात आहेत. यांचा पाऊण हिस्सा खर्च सरकार सोशील व पाव हिस्सा खर्च त्या त्या प्रदेशांतील सहकारी व नगर संस्था सोसतील. या शिवाय प्रसुति गृहें व बालरोग चिकित्सालयें आहेत. संधिवात, चर्मरोग, नेत्ररोग, संसर्गजन्य रोग यांचींहि रुग्णालयें आहेत. कामगारांचीं औषधोपचार गृहें आहेत तीं वेगळींच. या गृहांच्या खर्चांत सरकारचा हिस्सा ४२ टक्के; कारखानदारांचा ३२ टक्के; स्थानिक संस्थांचा १८ टक्के व खाजगी व्यक्तींचा (देणगी) ७ टक्के असा हिस्सा असतो. सरकारी बजेटांत ७१ अब्ज मार्क समाजस्वास्थ्य योजनेवर खर्च होतात. समाजहित-संरक्षण (Social Benefits) योजना निधींतून कुटुंब सहाय्य ३६ टक्के; आजार २० टक्के; अपघात (लढाईत अपंग झालेल्यांचा यात समावेश होतो), व अपंग १३ टक्के; म्हातारे व थकलेले १७ टक्के; बेकार ४ टक्के आणि इतर ८ टक्के याप्रमाणे व्यय होतो.

फिन्लंडला वस्ती वाढायला पाहिजे आहे. यांत मुलांची आबाळ होऊं नये याकडे सरकारचे लक्ष आहे. ज्या कुटुंबांत मुलें जास्त असतील त्यांना खर्च निभावासाठी सहाय्य दिले जातें. प्रत्येक स्त्रीला बाळंतपणाची हक्काची रजा तर असतेच; पण शिवाय प्रत्येक बाळंतपणांत तिला ४५०० मार्कांची मदत दिली जाते. निदान तितकी मदत तिच्या नवागत बालकाला कपड्यांसाठी दिली जाते. (हे १२८ रु. होतात. ) १९५२ सालीं सुमारे ९० हजार मातांना म्हणजे तितक्याच बालकांना ही मदत दिली गेली. याशिवाय कुटुंबांचा पोषणकर्ता वारला व त्याचीं १६ वर्षे वयाखालील मुलें उघडीं पडलीं तर तशा कुटुंबांना दरवर्षी दर मुलागणिक १४ हजार मार्क दिले जातात. गेल्या युद्धांत मोठी कत्तल झाल्याने हा प्रश्न फारच उग्र बनला. दहा लाख मुलांना अशी मदत दिली जाते. फिन्लंडच्या एकूण ४० लाखांच्या वस्तीशी ही संख्या ताडून पाहिली म्हणजे तिची व मदतीची व्याप्ति यांचें प्रमाण लक्षांत येईल! प्रत्येक कारखाना आपल्या एकूण कामगारांना मिळून जे वेतन देतो त्या वेतनाचे शेकडा ४ इतकी रक्कम कारखान्यांकडून या कुटुंब सहाय्य निधीसाठी गोळा होते. या मार्गाने सरासरी निम्मी रक्कम जमा होते. बाकीची निम्मी रक्कम सरकारी तिजोरींतून दिली जाते. बेताबाताच्या उत्पन्नाच्या तरुण-व्यक्तींना लग्न करायचे झाल्यास त्यांना घर उभारणीसाठी

पांच वर्षांत परत करण्याच्या कराराने बिन व्याजी रक्कम सरकार देतें. या पांच वर्षांत मूल झालें तर कर्ज फेडीची मुदत वाढवून मिळते. तीन मुलें झालीं तर देणें बाकी रकमेचा तिसरा हिस्सा सूट मिळतो. आणि पांच मुलें झालीं तर सबंध रक्कम सूट मिळते. जास्तीत जास्त ५० हजार मार्कांपर्यंत असें कर्ज मिळतें. गेल्या आठ वर्षांत सुमारे पन्नास हजार नवदांपत्यांना अशी मदत देण्यांत आली.

कारखानदार व कामगार यांना आपापसांत सांघिक करार ( Collective bargaining ) करण्याची या देशांत मुभा आहे. मात्र कामगारांचें वेतन, कामाचे तास, इतर सवलती व हक्क या संबंधाच्या सरकारी कायद्यांना हे करार विरोधी असतां कामा नये. तसेंच त्यांनीं केलेल्या करारांच्या अर्थाविषयीं मतभेद झाल्यास कामगार-न्यायालयांकडून अर्थ निर्णय करून घ्यावा लागतो. शिवाय कामगार, कारकून व कारखानदार यांच्या समित्या असतात. त्या एकत्र बसून मतभेदाचे मुद्दे निकालांत काढतात. सन १९१७ पासून इथे आठ तासांचा दिवस व ४७ तासांचा (कामाचा) आठवडा प्रचलित आहेत. शेत कामगारांसाठीहि असाच कायदा सरकार सध्या तयार करीत आहे. घरगड्यासाठी दहा तासांचा दिवस ठरलेला आहे. भर पगारी सुटीची योजना १९२० पासून चालू असून अशी सुटी वर्षाला १२ ते १८ दिवसांची असते.

सन १९२१ च्या शिक्षणविषयक कायद्यान्वयें प्रत्येक मुलानें आठ वर्षांचें तरी शिक्षण घेतलेच पाहिजे. वयाच्या सातव्या वर्षीं त्याला शाळेंत प्रवेश मिळतो. पहाणी केली असतां १९५२ सालीं शिक्षणाच्या वयाचीं म्हणजे ७ ते १५ वर्षें दरम्यानचीं एकूण ६ लक्ष २८ हजार मुलें होतीं. यांतली फक्त २ टक्के म्हणजे १२,५६० मुलें शाळेंत जात नव्हती. सहा वर्षांचा प्राथमिक व नंतरच्या दोन वर्षांचा जादा अभ्यासक्रम असतो. सर्व शिक्षण तर फुकट असतेंच; पण पुस्तकें, वह्या, पेन्सिली आदि लागणारें सर्व साहित्य-सुद्धा फुकट मिळतें. इतकेंच नव्हे तर सुटीचे दिवस सोडून शाळेच्या दिवसांत रोज दुपारचें पुष्टान्न जेवणहि फुकट मिळतें. हा सर्व खर्च स्थानिक स्वराज्य-संस्था नि सरकार असे दोघे मिळून सोसतात. याशिवाय औषधी योजना फुकट असून गरीब विद्यार्थ्यांना थंडीसाठीं गरम कपडेहि शाळेतर्फे फुकट

मिळतात. वर्षांतून ३८ आठवडे शाळा चालतात. अति थंडीचे व उन्हाळ्याचे महिने सुटीचे असतात. अति जड बुद्धि हा मेंदु विकृतीचाच प्रकार; अशा मुलांसाठी, तसेंच आंधळे, बहिरे, मुके अशांसाठी मोठाल्या शहरांच्या ठिकाणी वेगळ्या शाळा असतात. प्राथमिक शाळांच्या शिक्षकांसाठी तीन ट्रेनिंग कॉलेजें आहेत. माध्यमिक शिक्षणाच्या ३५५ शाळा आहेत. यांतल्या १०९ सर्वस्वी सरकारी असून २४६ शाळा स्थानिक व खाजगी संस्थांच्या आहेत. सरकारीपैकी ३२ शाळा फक्त मुलांच्या, ३० फक्त मुलींच्या व ४७ सहशिक्षणाच्या आहेत. सर्वच बिनसरकारी शाळा मुलांमुलींच्या मिश्र आहेत. तीन वर्षें पूर्व-प्राथमिक शिक्षण झाल्यावर मुलें या शाळांत येतात. याचा अभ्यासक्रम आठ वर्षांचा असतो. या शाळांत एकूण सवा लाख मुलें आहेत. शिक्षकांत पुरुष ४२ टक्के व स्त्रिया ५८ टक्के आहेत. आठवे वर्ष म्हणजे आपली मॅट्रिक. हिच्या चार परीक्षा लेखी असतात. लेखी विषय म्हणजे मातृभाषा, राज्यभाषा (फिनी व स्वीडिश) एक परदेशी भाषा, व गणित किंवा एक आधुनिक शास्त्र विषय होत. बाकीच्या विषयांची परीक्षा तोंडी असते. गणित विषयाच्या या ढिलाईमुळे या देशांत हिशेब व गणित आपल्या मानाने अति कच्चे असतात. साध्या बेरजा-वजाबाक्या व गुणाकार-भागाकारांतहि कारकून चुकतात. वेळहि फार घेतात. आम्ही हे सर्व तोंडीं करीत असूं याचा त्यांना विस्मय वाटे. दोन रकमांची चार आकडी बेरीज करायला यंत्र लागतें नि हातचे धरण्यांत चुका होतात. रशियांतसुद्धा हीच स्थिति दिसली–अन् आमच्याकडे तरी आता काय होऊन राहिलें आहे !

प्राथमिक शिक्षणानंतर व्यावसायिक व धंदेशिक्षण यांकडे जाता येतें. यंत्र, तंत्र, शेतकी, शिल्प, चित्र, संगीत, डेरी, जंगल, बागबागायत, हॉस्पिटल व स्वास्थविषयक कामें, नर्सिंग, मिडवाईफरी व शिक्षक या सर्वांच्या शिक्षणाचा यांत समावेश होतो. औद्योगिक कामगार व नोकरपेशा लोक यांच्या व्यावसायिक तसेंच उच्च शिक्षणासाठी संध्याकाळच्या शिक्षणसंस्था आहेत. पत्रव्यवहाराने शिक्षण देणाऱ्या इथे दोन संस्था असून त्यांची शिष्यसंख्या २७ हजारांवर आहे. अभ्यासक्रमाचीं व अन्य पुस्तकें देणारीं तीन हजारांवर ग्रंथालयें असून पुस्तकें नेणाऱ्यांची संख्या सात लाखांवर आहे. ४० लाखाच्या वस्तींत! उच्च शिक्षणासाठीं ११ विद्यालयें व ३

विद्यापीठें आहेत. यांत सुमारे १६ हजार विद्यार्थी आहेत. यांत निम्मी संख्या स्त्रियांची आहे. अमेरिकेच्या ' फूल ब्राईट ' योजनेतून उच्च शिक्षणाला दुहेरी स्वरूपाची मदत मिळते. एक म्हणजे फिनी विद्यार्थ्याला अमेरिकेत नेऊन शिक्षण देणें व या योजनेंतून त्यांचा खर्च चालविणें; दुसरे स्वरूप म्हणजे शिक्षक व अभ्यासक्रमाची पुस्तकें अमेरिकेचींच घेणें. असे असून सुद्धां अलीकडच्या ५-४ वर्षांत अमेरिकेच्या प्रतिष्ठेला या देशांत ओहोटी लागलेली दिसते. याशिवाय अत्युच्च शास्त्रीय व संशोधनपर कार्यासाठी १९४७ सालीं फिन्लंडची अकादमी स्थापन झाली असून शिल्प, चित्र, संगीत, स्थापत्य, उद्भीज, निसर्ग, रसायन, विज्ञान, काव्य, वाङ्मय, भाषा, इतिहास, तत्त्वज्ञान, गणित, शारीर, धातू, भूगर्भ व खगोल या शास्त्रांत तिथे संशोधनात्मक अध्यापन नि लेखन होत आहे.

फिन्लंडची भूमि व राष्ट्र यांचें सर्वांगीण संशोधन हे तिथल्या शास्त्रज्ञाचें गेल्या शंभर वर्षांचें वेडच होऊन बसलें आहे. भूगर्भशास्त्रज्ञ विलॅहम, रामसे, एस्कोला, सॉरोमा, उद्भिज शास्त्रज्ञ नॉरलीन यांनीं आपल्या संशोधनपर परिश्रमाने फिनी भूमीचीं वैशिष्ट्यें विशद केलीं. वनस्पतीशास्त्रज्ञ व जंगल संशोधक कोजांदर यांचा Forest types and their significance हा संशोधनात्मक ग्रंथ सर्वत्र प्रमाणग्रंथ मानला जातो. केवळ फिन्लंडच्याच नव्हे तर उत्तर रशिया व सैबेरिया येथील जंगलांची पहाणी करून त्यांनीं काहीं विशिष्ट सिद्धांत प्रतिपादले आहेत. १९२९ मधे ते या देशाचे पंतप्रधान होते. कॅस्ट्रीन हा भाषा व वंशशास्त्रज्ञ आहे. त्याने फिनो-उग्रियन भाषा व लोकसमुह यांच्या अभ्यासासाठी एक संस्था काढली असून ती फिनी लोक कोण व त्यांची भाषा कशी उत्क्रान्त झाली या विषयांत संशोधन करीत आहे. ज्यूलियस व क्राहन या संशोधकांनी राष्ट्र विचारांत भौगोलिक-ऐतिहासिक पद्धति बसविली. काहीं काळ या पद्धतीचा जगांत बराच बोलबाला झाला; पण आतां शास्त्रज्ञ तिचा फेर-विचार करूं लागले आहेत. ( आपल्याकडे प्रसाद प्रकाशनाने जो ' महाराष्ट्र परिचय ' हा महत्त्वपूर्ण ग्रंथ प्रसिद्ध केला आहे त्यांत महाराष्ट्र प्रदेशाचा वंश व राष्ट्रवाचक विचार याच पद्धतीला धरून केलेला आहे. ) वेस्टर-मार्क हा समाजशास्त्रज्ञ चांगला नांवाजला गेला आहे. पुराणवस्तु संशोधनहि

चांगलेच प्रगतिपर आहे. वनस्पती, खगोल, सौंदर्य या शास्त्रांत फिनी शास्त्रज्ञांनी मोलाची भर घातली आहे. विर्तानीन या शास्त्रज्ञाला बायो-केमिस्ट्रींतील संशोधनाबद्दल १९४५ सालीं नोबेल पारितोषिक मिळालें. हा बहुमान मिळविणारा हा तिसरा स्योमी पुत्र होय.

१९ व्या शतकाच्या प्रारंभापासूनच या देशांत लोकगीतांचें संशोधन व अभ्यास चालू झाला. इलियस लोनसेट यानें संशोधिलेल्या ' कालेवाला ' या अमर काव्यानें फिन्लंडला व बाहेरच्या युरोपला वेड लावलें. लोनसेट हा वैद्यक, भाषा, लोकगीत यांचा संशोधक असा चतुरंग बुद्धीचा माणूस होता. म्हणी, सुभाषितें, उखाणे, कूट-काव्य यांचें व त्यांच्या भाषिक लकबींचें त्यानें मार्मिक व मौलिक संशोधन केलेलें आहे. फिनी शब्दकोश त्यानें तयार केला. धातू संशोधून व नवनवे शब्द बनवून फिनी भाषा उन्नत नि संपन्न केली. आंतो सेपानेन यानें केरेलिया प्रांतांतील निर्वासितांच्या जीवनावर ' इव्हंको ' ही चित्त थरारून सोडणारी कादंबरी लिहीली. एलिस्की कीव्ही हा फिन्लंडचा राष्ट्रीय लेखक व नाटककार गणला जातो. त्याचे ' कॉबलर्स ऑफ दि हीथ ' हे विनोदी नाटक सदाफुलीसारखे सदा ताजें, प्रसन्न नि रिझविणारें नाटक आहे. तथापि त्याची सर्व श्रेष्ठता त्याच्या ' सात भाऊ ' या कादंबरीमुळे प्रस्थापित झाली. १२-१५ विदेशी भाषांतून या कादंबरीचीं भाषांतरें झाली आहेत. सिलाम्पा याच्या ' मीक हेरिटेज ' कादंबरीला १९३९ सालचें नोबेल पारितोषिक मिळाले आहे. ऐनोकुलास, तालवियो वगैरे तरुण लेखकांच्या कादंबऱ्यांची इंग्रजी, जर्मन, फ्रेंच वगैरे भाषांतून भाषांतरें झाली आहेत. ' कुलेव्हों ' ही तालवियोची शोकांतिका फारच गाजली. मेरीया जोतुर्नी यानें प्रेम, लग्न व काडीमोड या विषयावर विनोदी नाट्यनिष्पत्ति केली आहे. मीनाकान्थचें ' आन्ना नीसा ' हे अति गंभीर नाटक आपल्या अपत्याची हत्या करणाऱ्या मातेच्या मनोविकृतिवर रचलेलें आहे. ईनो लीनो हा फिन्लंडचा अति विख्यात कवि; त्याला कविसम्राट मानतात. तोपेलस यानें ऐतिहासिक कादंबरी लिहिली. शिवाय अनेकांनी परभाषेंतलें धन स्वभाषेंत आणलें आहे. स्वीडिश भाषेंत काव्य लिहिणाऱ्यांतला सर्वश्रेष्ठ कवि मोर्नें हा होय. कीव्ही, लिनो व मोर्नें यांचे धातूचे पुतळे हेलसिंकी शहराच्या प्रमुख रस्त्यांवर उभारलेले आहेत.

स्थापत्यांत या देशाचा स्वतःचा असा एक ढंग आहे. पूर्वकाली हे वैशिष्ट्य किल्ले बांधणींत व्यक्त होई. गेल्या शतकांत सी. एल्. एंजल याने स्थापत्यांत Neo- Classism चा प्रकार आणला. हेल्सिंकीचें विद्यापीठ व ग्रंथसंग्रहालय हे त्याच्या कलेचे नमून आहेत. पार्लमेंटची इमारत सिनेरने बांधली. एंजलचा भव्य पुतळा रस्त्यावर उभारलेला आहे. नाट्यमंदिरा-समोरच्या पटांगणांत कीव्हीचा पुतळा आहे. फिन्लंडची चित्रकलाहि प्रेक्षणीय आहे. फ्रेंच चित्रकलेची छाप इथे बरीच पूर्वीची आहे, पण १९२० साला-नंतर राष्ट्रीय म्हणता येईल असा स्वतंत्र कला संप्रदाय इथे निर्माण झाला. फेरो जार्नेफेल हा या संप्रदायांतला सर्वश्रेष्ठ कलावन्त मानला जातो. या कलेंत जितके पंथ व प्रकार युरोपांत उदयाला आले ते सर्व इथेंहि येऊन गेलेले दिसतात. शिल्पकला-वैभव मात्र देशभर प्रतीत होतें. फिन्लंडमधे असे एकहि लहानमोठें शहर नाहीं की जिथे एक वा अनेक प्रेक्षणीय पुतळे नाहींत. आलतोनेन हा इथला अग्रगण्य शिल्पकार असून होवी, रेनवॉल, टोक्का, मेंतीनेन हेहि नामांकित आहेत. इथलें कांचकामसुद्धा प्रेक्षणीय आहे. अरेबिया हा कारखाना बिलोरी कांच व चिनीमातीची भांडी यांसाठी फार प्रसिद्ध आहे. इथे फर्निचर फारच सुंदर होतें. ते अमेरिकन धर्तीचें असतें, व पहाणाऱ्याची सिलोटी दिसावी इतके सुंदर पॉलिश काम इथे होतें. इथलें फर्निचर परदेशीं—अमेरिकेंतहि जातें.

फिन्लंडचें संगीत मात्र अलीकडच्या शंभर वर्षांतलेंच आहे. क्रुसेल हा त्याचा आंतरराष्ट्रीय ख्यातीचा जनक. त्याच्यानंतर जर्मनींत जन्म पावलेल्या फ्रेडरीक पासीअसने १८४८ सालीं फिन्लंडचें राष्ट्रगीत बसविलें. पुढे चार वर्षांनी ऑपेरा उदयाला आला. एंजिलियसने पहिला ऑरकेस्ट्रा (सिंफनी) बसविला. तथापि जीन सिबेलियस हाच फिनी राष्ट्रीय संगीताचा खरा उद्गाता होय. त्याच्या भावमधुर संगीताने युरोपभर प्रभाव पाडला. फिनी संगीताला तेथपासून सिबेलियस म्यूझिक हें नांव पडलें. त्याचाहि पुतळा हेल्सिंकींत पहायला सांपडतो.

राष्ट्रीय खेळ आणि व्यायाम या क्षेत्रांत फिन्लंडनें जागतिक महिमा संपादन केलेला आहे. १९१२ सालीं त्याने जागतिक क्रीडाक्षेत्रांत प्रथम पाऊल

१०२०५

टाकलें तोच जगांत दुसरा नंबर पटकाविला आणि कुस्तींत पहिला! तेव्हांपासून १९३९ पर्यंत मुष्टियुद्ध, अंगविक्षेपाचे खेळ, (Acrobatics), बर्फावरून सरकणे, पोहणे व कुस्ती यांत अनेकदां पदकें मिळवलीं. गेल्या महायुद्धांत त्याचे शेकडो खेळाडू कामाला आले नि हजारो हातपाय तुटून निकामे होऊन पडले. यामुळे १९४७ पर्यंत त्याची या क्षेत्रांतली गति मंदावली. पण पुढच्याच वर्षी त्याने आपली गेलेली भूमि पादाक्रांत करण्यास सुरुवात केली. सांघिक खेळांपेक्षा वैयक्तिक खेळांत फिनी खेळाडूचें नैपुण्य अधिक चमकतें. धांवण्याच्या शर्यतींत तो अनेक वर्षे त्रिविक्रम राहिला. १९२० साली त्याच्या एका खेळाडूने दहा हजार मिटर धांवण्याची पैज जिंकली. तेव्हांपासून पुढे तो चोवीस वेळा अजिंक्य राहिला. फिन्लंडच्या ऑलेम्पिक स्टेडियम समोरच्या भव्य पटांगणांत त्या वीराचा धांवण्याच्या आवेशांतला भव्य पुतळा उभारलेला आहे. त्याचें नांव पावनूर्मि. धांवण्याच्या विलक्षण गतिवेगामुळे त्याला उडता फिन् (flying finn) या नांवानेच जग ओळखतें. हल्लीं तो व्यापार करतो. बर्फावरून स्कीव्हिंग, नेमबाजी, पोहणें याहि क्षेत्रांत त्याने चांगली कीर्ति मिळविली आहे. १९०६ पासून १९५२ पर्यंतच्या काळांत त्याने सोन्याची ८९, चांदीची ७९ व ब्रॉझची ८८ पदकें मिळविली. यांत पहिला क्रम ट्रॅक ॲन्ड फील्ड; दुसरा कुस्ती व तिसरा ॲक्रोबेट्सचा लागतो.

फिनी जनतेची व्यायामाची आवड ही काय चीज आहे याची यथार्थ कल्पना शब्द वर्णनाने यायची नाहीं. हवा, पाणी व अन्न जितकें महत्त्वाचें तितकें महत्त्व या देशांत व्यायाम व खेळ यांना आहे. फिन्लंडमध्यें असे गांव नाहीं की जिथे स्टेडियम व व्यायामशाळा नाहीं. पांच पांच मजल्याच्या या इमारतींत गोटीबंद शरीराच्या दोन चारशे जवानांना व्यायाम घेतांना पाहून जीव भरून येतो! पटांगणांत शेंकडो संघ खेळत असतात. लेबर स्पोर्ट्स' युनियनतर्फे १०४३ संघ चालविले जातात. त्यांची सभासद संख्या २ लाख १५ हजार आहे. 'बूर्झ्वा' (मध्यम) वर्गाच्या अशाच शेकडो संस्था आहेत. त्यांची सभासद संख्या ९५ हजार आहे. याशिवाय स्थानिक संस्थांचे संघ व त्यांचे सभासद यांची संख्या निराळीच. फिन्लंडचे म्हातारेकोतारे व बालवयस्क यांसुद्धां एकूण वस्ती चाळीस लाखाची; यांतली पंधरा वर्षाखालची

व पन्नास वर्षांवरची मिळून निम्मी वस्ती वजा केली तर उरलेल्या वीस लाखांपैकीं १० लाख २८ हजारांची म्हणजे निम्म्या संख्येची जनता रोज नियमित व्यायाम घेत असते. एकूण वस्तीचे शेकडा २५ हे व्यायाम घेणाऱ्यांचे प्रमाण अनन्यसाधारण आहे ! भारतांत या मोघम आंकड्यावर विश्वासमुद्धां बसणार नाहीं. म्हणून सरकारी अहवालांतला हा तपशील देतो.

| खेळाचा प्रकार. | खेळाडू संख्या | खेळाचा प्रकार. | खेळाडू संख्या |
|---|---|---|---|
| **चेंडूचे खेळ :** | | **अॅक्रो बॅट्स :** | |
| हॉकी, क्रिकेट, | | रींग, डबल व | |
| फूट, बेस व | | सिंगरबार, बॅलेन्सीस | |
| व्हॉली बॉल वगैरे | २,६७,६७९ | वगैरे | १,०३,९४४ |
| **स्कीव्हींग :** | | पोहणें | ८०,२२९ |
| बर्फावरून लाकडाच्या | | टेकड्या चढणें, जलद | |
| फळ्यांवर उभे राहून | | व लांब अंतर चालणें | ५३,५१४ |
| सरकणें. | २,३३,३२८ | कुस्ती, मुष्टि युद्ध | ३८,४३२ |
| **ट्रॅक अॅन्ड फील्ड :** | | सायक्लींग | १५,६८० |
| | | स्केटिंग | १२,७९५ |
| उड्या, लाठी, काठी | २,२२,४५४ | एकूण | १०,२८,०५५ |

यांत पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांचाहि भरणा आहे. शिवाय देशांत लष्करी शिक्षण सक्तीचे असून त्यांतहि स्त्रिया मागे नाहींत. वरील पैकीं स्कीव्हींगचा प्रकार आता लष्करांतहि प्रविष्ट झाला असून बर्फमय प्रदेशांत शीघ्रगतीने चाल करून जाणारी हीं पथकें लष्करांत उभारलीं आहेत. गेल्या लढाईत फिन्लंड व रशिया या दोन देशांनी ह्या पलटणी उपयोगांत आणल्या होत्या. सारा फिन्लंड वर्षांतून ४–५ महिने तरी बर्फाच्छादित असतो. यामुळे स्कीव्हींगचा खेळ हजारो–लाखो स्त्री-पुरुषांना मनमुराद खेळता येतो.

फिन्लंड हा मुख्यत: एक भाषी देश आहे. फक्त ८ टक्के वस्ती स्वीडिश भाषा भाषी आहे. गेल्या दोनशे वर्षांच्या आधीची ६०० वर्षें तो स्वीडनच्या अंकीत होता. त्यामुळे विजेत्या स्वीडिश भाषेचा बडिवार

इथे फार असे. सुशिक्षित लोक त्याच भाषेंत काव्य व वाङ्मय रचण्यांत भूषण मानीत. यामुळे फिनी भाषा-मागसलेली राहिली. पुढे रशियाच्या ताब्यांत हा देश गेला तेव्हां झारने हडेलहप्पीने त्याला द्विभाषिक देश ठरविला. यामुळे सरकारला मान्य अशा दोन भाषा झाल्या; तरी पण या योगाने फिनी भाषेला राज्यमान्यता मिळाल्यामुळे काहीं देशभक्त, विद्वान् व साहित्यकार यांच्या परिश्रमाने तिला उर्जितावस्था आली. काव्य, कथा व नाट्य फिनी भाषेंत लिहिली जाऊं लागली. आज ती जगांतली एक प्रगत भाषा ठरली आहे. देशाला आता स्वातंत्र्यहि लाभलें आहे तरी काहीं ना काहीं कारणाने स्वीडिश ही राजभाषा म्हणून तिथे रेंगाळतेच आहे. यामुळे फिनी विद्यार्थ्याला स्वतःची स्योमी व केवळ ८ टक्के लोकांची स्वीडिश अशा दोन, व एखादी परदेशी मिळून तीन भाषा शिकाव्याच लागतात. सरकारांतली ही स्वीडिश अल्पभाषा सोडल्यास फिन्लंडची मुख्य भाषा एकच होय. धर्मपंथहि तिथे एकच; तो म्हणजे ख्रिश्चन. इस्लाम धर्माचे अनुयायी सुमारे तीन हजार असून त्यांच्या चार मशिदी आहेत. हेल्सिंकींत एक बुद्ध-विहार आहे. ख्रिश्चनांत शे. ९५ ल्यूथरन्स; शे. १॥ ऑर्थोडॉक्स; शे. ०·४ रोमन केथोलिक व शे. २॥ निधर्मी आहेत. रोमच्या पोपची त्यांच्यावर पहिल्यापासून इतराजी व त्याने त्यांचा छळहि पुष्कळ करविला. यामुळे १५ व्या शतकांत मार्टीन ल्यूथरचें धार्मिक बंड झालें तेव्हा फिनी लोक सर्वशः त्या पंथाला मिळाले. या धर्मपीठाची सर्वोच्च सत्ता सरकारकडे असते व ती अध्यक्षाकरवी चालते. या दृष्टीने फिन्लंडची राजसत्ता निधर्मी नाही. तथापि जनतेला कोणताहि धर्म पाळण्याची, अथवा कोणताहि न पाळण्याची, संपूर्ण मुभा आहे.

न्यायदान स्वतंत्र न्यायालयांकडूनच होतें. या न्यायालयांत देण्या-घेण्याचे तसेच फौजदारी (Civil & Criminal) असे दोन्ही प्रकारचे खटले चालतात. ग्रामीण विभागांत सरकीट (प्रादेशिक) न्यायालयें असतात व न्यायदान ज्यूरीच्या सल्ल्याने न्यायाधीश देतात. ज्यूरींत ५ ते १२ सभासद असतात. गुन्हा घडला की नाहीं हें तर ज्यूरी ठरवितेच; पण केव्हा केव्हा सबंध खटलासुद्धा ज्यूरी चालविते. तिचा एकमताचा निर्णय न्यायाधीशाला बंधनकारक असतो. सरकीटच्या खालीं नगर न्यायालयें असतात. इथे

न्यायादानाचें काम एक मॅजिस्ट्रेट, दोन किंवा अधिक सल्लागारांच्या मदतीनें करतो. सरकीट कोर्टावर अपील कोर्ट असतें. याला एक अध्यक्ष, केव्हा केव्हा एक उपाध्यक्ष, काहीं सल्लागार व असेसर्स असतात. खटल्याच्या वर्गवारी-नुसार तीन तीन सभासदांपुढे ही अपीलें वर्गवारीने जातात व ही त्रिसदस्य-समिति त्यांचा निवाडा देते. या योजनेमुळे काम तुंबत नाही. सुप्रीम कोर्ट हे सर्वोच्च न्यायालय असून तिथे अपील कोर्टाच्या निवाड्याविरुद्ध येणाऱ्या तक्रारींचा निकाल होतो. हे न्यायालय माफीहि देऊं शकतें; व न्यायविषयक प्रश्नांचे निवाडे करतें. याशिवाय काहीं स्पेशल कोर्टें असतात. तीं म्हणजे जमीनविषयक तीन, विमाविषयक एक, कामगारविषयक एक, तुरुंगविषयक एक व लष्करविषयक अठरा अशीं आहेत. मंत्री व वरिष्ठ अधिकारी यांचे खटले चालवायला एक असाधारण स्टेट कोर्ट असतें. सरकारी कारभारा-संबंधींचे खटले सुप्रीम ॲड्मिनिस्ट्रेटिव्ह कोर्टापुढे चालतात. सिव्हिल सर्व्हिस कोर्ट सरकारी नोकरांच्या गैरशिस्त वर्तनाची चौकशी करतें. न्यायदानविषयक कूटप्रश्नांचें निराकरण न्यायमंत्रिखातें करतें.

१९४७ सालीं पॅरीसला झालेल्या शांतता तहाच्या अटींप्रमाणे देशाची सरहद्द व अंतर्गत सुरक्षितता यांचें रक्षण करण्यास अवश्य असेल तितकेंच लष्कर फिन्लंडला ठेवता येतें. यामुळे सरहद्दीवरील पायदळ नि वैमानिक हल्ला विरोधी तोफखाना मिळून ३४,४००; नाविक दल ४,५०० व विमान दल ३,०००; इतके या सैनिकांचें खडें सैन्य त्याला ठेवता येते. लढाऊ बोटी एकंदर दहा हजार टन वजनाच्या व विमाने फक्त ६० ठेवतां येतात ! या सर्वांचे सैनिक मिळून फिन्लंडचें संपूर्ण सैन्य ४१,९०० सैनिकांचें त्या करारान्वये ठरलेलें आहे. अणूशस्त्र तसेच टॉर्पेडो व सबमरीन्स ठेवण्याची बंदी आहे ! अध्यक्ष हाच कमांडर-इन-चीफ असून लष्करचा कारभार संरक्षण मंत्र्याकडे असतो. या सज्ज सैन्याशिवाय प्रादेशिक दलें व लष्करी शिक्षण केंद्रें आहेत. फिन्लंडमधे लष्करी नोकरी सक्तीची मानली जाते व प्रत्येक नागरिक वीस वर्षांचा झाला की, त्याने नोकरीवर हजर होण्यासाठी लष्करी खात्याकडे स्वतःची नोंद करावी लागते. १७ वे वर्ष पूर्ण झाल्यावर प्रत्येकाने २४० दिवस लष्करी शिक्षण घ्यावे लागते. अशा तरुणांच्या कवायती आम्ही हेल्सिंकीत पाहिल्या आहेत. अधिकाऱ्यांचें शिक्षण ३३० दिवसांचें

असतें. स्त्रियांना लष्करी पेशा सक्तीचा नाहीं. पण गेल्या लढाईत पुरुषांची वाण पडली तेव्हा त्यांचीहि "लोत्ता स्वार्द" नांवाची पलटण उभारली गेली होती व तिच्यांत १ लक्ष ७० हजार स्त्रिया भरती झालेल्या होत्या ! पॅरीस कराराने ही स्त्री पलटण रद्द केली.

फिन्लंडशी भारताचें राजनैतिक नातें आहे. त्याची वकिलात दिल्लींत असून फिन्लंड, नॉर्वे व स्वीडन मिळून भारताचा एक वकील असतो. तो स्वीडनच्या राजधानींत स्टॉकहोमला राहतो.

भारताप्रमाणेच फिन्लंड हें सार्वभौम लोकसत्ताक राज्य आहे. २१ वर्षे वयाच्या सर्व जनतेला मताधिकार असून ती आपलें पार्लमेंट निवडते. पार्लमेंटचे सभासद दोनशे व त्यांची निवड दर चार वर्षांनी होते. आपल्याकडच्यासारखे तिथल्या पार्लमेंटचे लोकसभा व राज्यसभा असे विभाग नाहींत. अध्यक्षांची निवड अप्रत्यक्ष म्हणजे लोकांनी ३०० सभासदांचे मंडळ निवडायचे व त्याने अध्यक्ष निवडायचा या पद्धतीने होते. या मंडळाला इलेक्टोरल कॉलेज म्हणतात. अध्यक्षपदाची मुदत सहा वर्षांची असते. सेनापती तोच असला तरी युद्धप्रसंगी आपला हा अधिकार तो कोणत्याहि व्यक्तीस देऊं शकतो. पार्लमेंट कायदे व अंदाजपत्रक तयार करतें. पण त्याने केलेला एखादा कायदा व ठराव अध्यक्ष रद्द करूं शकतो. मात्र पार्लमेंटने तोच पुन्हा पास करून कायम केला की मग अध्यक्षाला तो मान्य करावा लागतो. वटहुकूम काढण्याचा अधिकार अध्यक्षांना असतो. फिन्लंडांत मंत्रिमंडळ निवडीत नाहींत. अध्यक्षच तें नियुक्त करतो. मुख्य न्यायाधीश व सॉलिसीटर जनरल हे दोघे पार्लमेंटने नियुक्त करायचे असतात. परराष्ट्र धोरणाचें नियंत्रण अध्यक्षच करतो. संधि-विग्रहहि पार्लमेंटच्या सल्ल्याने तोच करतो. या दृष्टीने फिन्लंडची घटना अमेरिकन धाटणीची आहे.

फिन्लंडमधे सहा राजकीय पक्ष आहेत. पैकी पांच पक्षांचे प्रतिनिधि पार्लमेंटमधे आहेत. पार्लमेंटच्या दोनशे सदस्यांपैकी स्वीडिश पक्षाचे १३; उजव्या गटांच्या संयुक्त आघाडीचे २४; जनता पक्षाचे १३; शेतकरी पक्षाचे ५३; सोशल डेमोक्रॅट ( इंग्लंडच्या लेबर पार्टीसारखा हा पक्ष आहे ) पक्षाचे ५४; व जनता लोकशाही आघाडीचे (कम्युनिस्ट व डावे

सोशलिस्ट ) ४३ सभासद आहेत. यांतले पहिले तीन उघड उघड भांडवलदार व त्याचे धार्जिणे असे असून त्यांचें संयुक्त संख्याबल शे. २५ आहे. बाकीचे तिघे जवळ जवळ तुल्यबल— म्हणजे प्रत्येकी शे. २५ या प्रमाणांत आहेत. अध्यक्ष उजव्या पक्षाचे असले तरी विलक्षण वास्तववादी असल्याने त्यांनी या सर्व पक्षांचा आपल्या मंत्रिमंडळांत समावेश केला आहे. मात्र अधिकृत कम्युनिस्ट पक्षाने त्यांत समाविष्ट व्हायचें नाकारले आहे. पार्लमेंटमध्ये सर्व पक्ष जवळ जवळ समप्रमाण असल्यामुळे राज्याला एकप्रकारे टिकाऊपणा व स्थीरपणा प्राप्त झाला आहे. १९१९ साली इथे सार्वभौम लोकसत्ता प्रस्थापित झाली तेव्हापासून १९५४ पर्यंतच्या कालाकडे पाहिलें तर शेतकरी-कामकरी व डावे पक्ष यांचें संख्याबल सतत वाढत चाललेलें दिसतें. १९३९ सालीं सोशल-डेमॉक्रॅट हा सर्वांत मोठ्या संख्येचा ( ८५ सभासद असलेला ) पक्ष होता. तो आज ५४ वर येऊन ठेपला आहे. शेतकरी पक्षाचें प्रमाण सरांस सारखें ( तेव्हा ५६ आता ५३ ) राहिलें आहे. उलट डावी आघाडी तेव्हा पांचाची होती ती आता ४३ ची झाली आहे. तरी मागल्या निवडणुकीपेक्षा तिची संस्था यावेळी सहाने कमीच झालेली आहे. रशियाशी तेव्हा चालू असलेली वर्दळ हे याचें एक तात्पुरतें कारण होतें. राज्याचे अध्यक्ष पासीकिवी हे उजव्या गटाचे तर पार्लमेंटचे अध्यक्ष ( स्पीकर ) फॅगरहोम हे सोशलिस्ट पक्षाचे व मुख्यमंत्रि कोनानेन हे शेतकरी पक्षाचे आहेत.

मंत्रिमंडळाला कौन्सिल ऑफ स्टेट म्हणतात. मुख्यमंत्रि याचे अध्यक्ष असतात. मंत्र्यांत खातेवाटणी होते. सर्वच खात्यांच्या कामाचें धोरण मंत्रि-मंडळांत ठरतें, व मग प्रत्येक मंत्रि आपापल्या खात्याचा कारभार त्या धोरणाप्रमाणे पण स्वतंत्रपणे चालवितो. यांत सांधिक जबाबदारी (Collective Responsibility )चें तत्त्व अनुस्यूत आहे. परराष्ट्र, न्याय, संरक्षण, अर्थ, गृह ( अंतर्गत ), शिक्षण, शेतकी, वाहतूक व सार्वजनिक, व्यापार–उद्योग, सामाजिक इतकीं खातीं आहेत. मंत्र्यांच्या हाताखाली सेंट्रल ब्यूरो व त्याच्या खाली त्या त्या विषयाचे तज्ज्ञ अधिकारी असतात. राज्यकारभाराच्या सोई-साठी देशाचे काउंटी, डिस्ट्रिक्ट व कम्यून असे घटक विभाग पाडलेले आहेत. यांतले पहिले दोन्ही सरकारच्या नियंत्रणाखाली असतात. कम्यून्सना

मात्र स्थानिक स्वायत्ततेचे सर्वाधिकार आहेत. एकूण काउन्टीज दहा असून त्यांच्यावर गव्हर्नर असतो. डिस्ट्रिक्ट्स म्हणजे जिल्हे ५०; यांचे उपविभाग (तालुके म्हणू या) २६१; व त्यांवर शेरीफ हा अधिकारी असतो. कम्यून्सचे तीन प्रकार आहेत. नगर, बरो व रूरल; यांची संख्या अनुक्रमे ३५, ३० व ४८३ आहे. आलंद बेटाला प्रांतिक स्वायत्ततेचे संपूर्णाधिकार आहेत. कम्यून्सना सहकार्याने आपापसांत संघ बनाविण्याची मोकळीक आहे. यांचे अधिकार म्हणजे आपापल्या क्षेत्राचे आर्थिक प्रश्न हाताळणे व बंदोबस्त ठेवणे हे आहेत. अर्थात् पोलिस कम्यून्सचे असतात. कम्यूनच्या हद्दींत राहणारा किंवा मालमत्ता धारण करणारा किंवा व्यापार करणारा असा प्रत्येक मनुष्य कम्यून्सचा सभासद असतो. त्याचा कारभार सभासदांनी तीन वर्षांसाठीं निवडलेल्या समित्या चालवितात. राज्यकारभार मात्र सरकारकडेच असतो. कारभाराची खातीं निवडलेल्या प्रतिनिधींच्या हातीं देण्याऐवजी नोकरीला अधिकारी ठेवून त्याच्याकडून तीं कामें करून घेण्याची वाढती प्रवृत्ति अलिकडे या कम्यून्समधे दिसून येते. या अधिकाऱ्यांना डायरेक्टर व सेक्रेटरी अशा संज्ञा आहेत.

◆ ◆ ◆

: ४ :

इंग्रजी भाषेंत ज्याचे फिन्लंड हें नांव रूढ आहे तो व त्याचे शेजारी स्वीडन नि नॉर्वे हे देश युरोपखंडांत सर्वांत अधिक उत्तरेला आहेत. भौगोलिक मांडणींत ते एकमेकांचे शेजारी आहेत. इतके की स्वीडनच्या माथ्यावरून नॉर्वेने फिन्लंडच्या गळ्याला मिठी मारली आहे. ६० ते ७४ अक्षांशावर ते पसरलेले आहेत. स्कँडिनेवियन देश ते हेच. इंग्रजी भाषेने सांगितलेल्या फिन्लंड या नांवानेच जरी आपण त्याला ओळखूं व संबोधूं लागलो असलों तरी फिनी लोक आपल्या देशाला (Suomi) म्हणतात. हें भाषिक नांव आहे. फिन्लंडच्या भाषेचें नांव स्योमी असून स्योमी भाषेची भूमि ती स्योमी. भारताची राज्यभाषा हिंदी व देशहि हिंदच. हिंदला ते इंदे असें म्हणतात. या न्यायाने त्या देशाचें स्योमी हें भाषासंज्ञक नांव आहे.

स्योमी ही सृष्टीची अति लाडकी अन् प्यारी भूमि आहे. सत्तर अक्षांशापलीकडच्या उत्तरध्रुव प्रदेशांत हिमकणांच्या मऊ व स्निग्ध गाद्या-गिरद्यांवर ती लोळते आहे. सूर्याच्या हेमकिरणांनीं विणलेला हिरवा शेला तिने अंगावर घेतला आहे. त्या शेल्याचा केवढा तरी मोठा चंदेरी पदर तिच्या पायांत रुळतो आहे. डोक्याकडे अफाट अंतराळ पसरलेलें आहे. पण तें अगदीं निर्मनुष्य ! चीटपाखरूंसुद्धा नाहीं तिथे कायम सोबतीला. नाहीं म्हणायला मोठाल्या सांबरांचे छोटे छोटे कळप केव्हा तरी दिसायचे किंवा कातड्याच्या बेडौल पोषाखांतला एखाद दुसरा लॅपमन (नॉमेड) दिसायचा. असल्या विजनवासामुळेच तर स्योमीची–उच्चाराच्या सोईसाठी आपण अलंकाराने तिला श्यामा म्हणूं. श्यामेची सोबत करायला सूर्य तिथे आला अन् तिच्या सौंदर्याने मुग्ध होऊन तिथेच तिच्या भोवतालीं घुटमळत राहिला. कवि संकेताप्रमाणे मूळची ‘ जातीने शूचिवर्णा, म्हणून ललनाजनांची भूषा ’ अशी चारुगात्री श्यामा त्याला तिथे दिसली. त्यांतहि पुन्हा ती

एकटीच. इतकी अनुकूलता आयतीच मिळाल्यावर 'मधुभोजनासाठी याचकांच्या झुंडी' झुलायच्या ! कोणाहि रसिकाची अशी अवस्था व्हावी तर सर्व रसांचा निर्माता व धाता जो रसरत्नाकर सूर्यनारायण त्याचें निराळे ते काय होणार ! तो तिथेच चिकटला. पूर्ण दिवसभर सोबत करण्याचा वायदाहि त्या लुब्ध काम्याने श्यामेशी केला. बेसावधपणाने दिलेल्या वचनापायीं तो आता असा जखडला गेला आहे की आपल्या संध्याराणीला भेटून यायचीसुद्धा त्याला सवड राहिली नाहीं.

काय करणार बिचारा ! सृष्टीच्या अनंत कार्यांत त्याच्या पराक्रमाची केवढीहि महती असली तरी त्या पराक्रमाला मर्यादासुद्धा तशाच मोठ्या आहेत. सूर्याने फक्त एक दिवसाचे वचन दिलें. पण एक दिवस तो काय? श्यामेने सृष्टिमातेला गाऱ्हाणें घातलें अन् त्या अनुरक्तेला प्रसन्न होऊन सृष्टीने मारुतीच्या शेपटाप्रमाणे दिवस लांबवायला सुरुवात केली. उत्तरायण तर केव्हाच सुरू झाला होता अन् त्यांत सृष्टीने आता वसंत फुलविला. चमत्कार असा झाला की सूर्याने दिलेलें एक दिवसाचें वचन त्यामुळे तब्बल अडीच महिन्याचे बंधन होऊन बसलें. एकदां दिलेले वचन पाळायचें तर वसंताचा अडीच महिन्यांचा उत्कर्षकाल संपेपर्यंत जागचें हालतां येणार कसें त्याला ! श्यामेच्या उशालगतच्या अंतरिक्षाच्या छोट्याशा वर्तुळांत तो बिचारा सारखे चकावे घेत राहिला. तेवढाच त्याच्या जिवाला विरंगुळा ! उषा-भेटीचें तर सध्या नांवच काढायला नको. या वसंतकालीं म्हणजे ७३ दिवस-पर्यंत 'मावळणें' ही अवस्थाच नाहीं. यामुळे दिवस संपला असे म्हणायलाच नको. हा वसंत ओसरेल नि पृथ्वी थोडी कलंडती होईल तेव्हा क्षितिजाचा डोंगरमाथा थोडा तरी उंचावेल, नि सूर्याला पाठीशी घालील. त्या झुंजूमुंजू कालांत उषा क्षितीजाच्या झरोक्यातून उडी मारून निसटेल व त्या पळपुटीचा पाठलाग करायला अरुण आपला नामांकित सप्ताश्वरथ उधळीत डोंगरमाथा ओलांडून वर येईल तेव्हा कुठे दुसरा दिवस उजाडणार नि श्यामेला दिलेल्या वचनातून सूर्याची सुटका होणार. तोपर्यंत आपल्या पराक्रमाचा गर्वभार हलका करीत त्याला तिथेच जखडून रहावे लागणार आहे ! 'हें सारें गुपीत आम्हाला आता कळलेलें आहे. म्हणून त्याला उत्तर ध्रुवाच्या कोंडवाड्यांत गाठून भर मध्यरात्री समोरासमोर पाहून रुजवात करून घेण्याच्या

प्रतिज्ञेने मी आज श्यामाच्या सुंदर भूमीवर पाय रोवून उभा होतो. इथे ज्या मुख्य कामासाठी मी आलो होतो त्या विश्वशांति परिषदेच्या कामकाजाचें वेळापत्रक व उत्तर ध्रुवप्रंधाचा प्रवास या संबंधींची सर्व माहिती मिळवून व जुळवून दि. २६ जूनच्या मध्यरात्रीं पितृलोकांत जाऊन सूर्य दर्शन घेण्याचा निश्चय मी पक्का करून टाकला होता.

हाच दिवस नक्की करण्याचें कारण असे होतें की दिनांक २४ व २५ ला परिषदेचें काम स्थगित रहायचें होते. या दोन दिवशीं फिन्लंडचा राष्ट्रीय उत्सव उजवला जातो. दि. २४ च्या मध्यरात्रीला अवघा फिन्लंड नाचत असतो. घरोघरी पाईन वृक्षाच्या फांद्या रोवतात. कमानी उभारतात. ध्वजा तोरणें लावतात. रोषणाई होते. फटाके व दारूकाम सुटतें. शिवाय देशभर गांवोगांवी स्टेडियम्समधे साजशृंगार व दीपोत्सव होतात. नाच, गाणीं, नाटकें, प्रहसने आदि करमणुकीचे सर्व प्रकार करतात. यच्चयावत् मानव या स्टेडियम्सवर जमतात, किंवा रस्त्यारस्त्याने झकपक पोषाख करून हिंडत असतात. त्या रात्रीं पिण्यांत धरबंद नाहीं की स्त्री-पुरुष हा भेद नाही. फिन्लंडमधे एरव्हीं मला पिऊन झिंगलेले लोक क्वचितच दिसले अन् दारू प्यालेल्या स्त्रिया तर मी पाहिल्याच नाहींत. पण त्यारात्रीं त्यांचे पाय जमिनीवर टेकलेले नव्हते. हातांत बाटल्या घेऊनच स्त्री-पुरुष हिंडत होते. मधेच फेर धरून एकमेकांच्या कमरेला विळखे घालून ते नाचत होते. आम्ही परकीय हाहि भेद त्यांत नव्हता. समोर दिसेल त्याला किंवा तिला बोलवायचें व नाचायचें. आम्ही ज्या ओतानेमी नगरींत रहात होतों तिथल्या घाईघाईने तयार केलेल्या स्टेडियमवर नाच गाण्याचे कार्यक्रम मोठ्या प्रमाणांत चालले होते. आम्हांलाहि आग्रहाचीं आमंत्रणें होतींच. आमचे दोन कलावंत, भारतीय संगीत व वीणावाद्य यांचा परिचय फिनी जनतेला करून देणार होते. पण तिथे जाऊन पाहिलें तो तिथले सारें विश्व हवेवर तरंगत होतें नि ओसंडत होतें. असल्या धागडधिंग्यांत वीणेच्या नाजूक तरल कंपनादाला कुठला अवसर असणार ! आम्ही बहुतेक जण हा सर्व प्रकार पाहून घरीं परतलों. काहीं मात्र त्यांत मिसळले व त्यांच्याबरोबर फेस होऊन रात्रभर नाचत राहिले.

या उत्सवाला तिथे दोनतीन नांवें प्रचलित आहेत. त्यावरून त्याचें

प्राचीनत्व प्रतीत होतें, मिड समर फेस्टिव्हल हें त्याचे मुख्य नांव. पण सत्यनारायणाच्या नामावलीप्रमाणे कोणी त्याला मिडनाईट सन फेस्टिव्हल म्हणतात; कोणी सेंट जेम्स फेस्टिव्हल म्हणतात; तर कोणी त्याला सेबेलियस फेस्टिव्हल म्हणतात; जीन सेबिलियस हा फिन्लंडच्या राष्ट्रीय संगीताचा उद्गाता. आपल्या कोमल सुरेल व भावमधुर स्वरसंगीताने सेबिलियसने सारा फिन्लंड भारून टाकला आहे इतकेंच नव्हे तर युरोपभर त्याचा प्रभाव आहे, असें ते लोक मोठ्या अभिमानाने सांगतात; नांवें कोणचीहि असोत, पण मुख्यतः तो मध्यरात्रीच्या सूर्य दर्शनाचा महोत्सव आहे. उत्सवाच्या या दिवशीं म्हणजे दि. २४ च्या संध्याकाळपासून दि. २६ च्या दुपारपर्यंत सारा देशभर कामधंदा बंद असतो. सर्व कचेऱ्या, बँका, दुकाने, कारखाने, वाहतूक सर्व कांहीं बंद; शाळा कॉलेजांना तर वसंतऋतूची (उन्हाळी) सुटीच असते. चालू असतात फक्त रेल्वे नि भोजनगृहें. आमच्या शांतता परिषदेला-सुद्धा अडीच दिवसांची सुट्टी होती. तिच्या भरीला आणखी दीड दिवस घालून मी उत्तर ध्रुव प्रदेशांत जाऊन येण्याचा बेत ठरविला होता.

फिन्लंड हा हिमबंधाच्या कक्षेतला ६० ते ७४ अक्षांशावर वसलेला देश आहे. ७० अक्षांश हा उत्तर ध्रुवबंध होय. या बंधाच्या पलीकडे उत्तरेला तो २४० मैलपर्यंत पसरलेला आहे. पण त्या टोकाला त्याची रुंदी मात्र ६०-७० मैलांइतकीच आहे.

जुलै हा तिथे उत्युच्च उष्णतामानाचा (म्हणजे आपल्याला थंडीचाच) व फेब्रुवारी आत्यंतिक थंडीचा महिना असतो. एप्रिल ते सप्टेंबर हा वसंत ऋतुकाल असून ऑक्टोबर ते मार्च हा हेमंत काल होय. वर्षा ऋतु असा इथे निराळा नाहींच. बाराहि महिने रिमझिम चालू असते. मार्च मध्यापासून दिवस मोठा मोठा होत जातो. जुलैंत तो दक्षिण भागांत २१ तासांचा असतो. पण उत्तर ध्रुव बंधावरच्या तसेंच त्या पलीकडच्या उत्तर प्रदेशांत जून ते ऑगस्ट दरम्यानच्या ७३ दिवसांत सूर्य केव्हाहि मावळत नाहीं. या ७३ दिवसांपैकीं जून २१ ते जुलै अखेरपर्यंतच्या, सुमारे ४० दिवसांत सूर्य क्षितिजाच्या बराच वर असतो. यानंतर तो अंशाअंशाने खालीं येतो. पण संपूर्ण दिसेल इतपत क्षितीजाला लगटून सरपटत थोडा पुढे जातो व मग वर चढूं लागतो. इथे

सूर्य आपल्या अगदी समोर असल्याने त्याचें चोवीस तासाचें अहोरात्र भ्रमण आपल्या डोळ्यांसमोर अंडाकृतीने होत असतें. यामुळें 'मध्यान्हीचा सूर्य माथ्यावर तळपत होता' असें वर्णन कथा लेखकाला करतांच येणार नाहीं आणि याच कारणासाठी "माथ्यावर चंद्र की हो ढळला" अशी लावणीहि रचतां येणार नाहीं. सूर्य समोर तिरकस म्हणून चंद्र आपल्या डावीकडे तिरकस. म्हणजे सूर्याच्या समोर आलेला असल्यावर चतुर्थीच्या चंद्राची जशी आडवी कोर आपल्याकडे दिसते तशी ती तिथे न दिसता शब्दाला आपण कंस घालतो तशी उभी दिसते. वसंतकालाप्रमाणे हेमंतकालहि सहा महिन्याचा व तेव्हां रात्रीहि मोठ्या मोठ्या होतात. हेल्सिंकी-ताम्पेरी भागांत त्या २१ तासाच्या होतात पण उत्तर ध्रुव बंधापलीकडे दीड दोन महिनेपर्यंत अखंड अष्टौप्रहर तिमिर दाटलेला असतो. वृत्रांचें हे आक्रमण ८५-९० अक्षांशाकडे अहोरात्र तीन महिनेपर्यंत चालू असेल; व देवांना वृत्रांच्या जाचांतून सोडविण्या-साठीं ऋषी नवाग्व याग करीत असतील ! असें वर्णन लो. टिळकांनीं आपल्या Arctic Home in the Vedas या ग्रंथांत केलें आहे. म्हणजे ७० अक्षांशा-पलीकडे अंश मानाने त्या त्या अक्षांश भागात अहोरात्र ५३ ते ९१ दिवस तरी सूर्यदर्शनाची आशा करायला नको ! त्यानंतर मात्र तास अर्धातास या क्रमाने प्रकाशकाल वाढत जाऊन जानेवारींत मकर संक्रांतकालीं ४-५ तास सूर्यदर्शन होत जाईल.

उत्तर ध्रुवबंधापलीकडचा तीव्र हिंवाळ्याचा काळ १८० ते २१० दिवसांपर्यंतचा तर दक्षिणेकडे हेलसिंकी भागांत तो १५० दिवसांपर्यंतचा असतो. या वेळी इथे उष्णतामान शून्याखालीं २१ ते २५ फॅ. वर असतें. अर्थातच रस्त्यांवर, झाडांवर, घरांवर सर्वत्र बर्फाचे थरावर थर सांचतात. वसंतकालाचे प्रकाशदायी सहा महिने हा देवांचा दिवस नि हेमंताचे तिमिरमय महिने ही देवांची सहामाही रात्र असें म्हणतात. दिवस तो उत्तरायण व रात्र ती दक्षिणायन. इतकीं घनदाट जंगलें या देशांत असूनसुद्धा इथे पाऊस मात्र वर्षभरांत १६ ते २१ इंचच असतो व तो वर्षभर झिमझिमत असतो. ऑगस्ट ते ऑक्टोबर हा जोरदार वर्षाकाल तेव्हा प्रतिमासी तीन इंच पाऊस होतो. बाकी एकदोन इंच. उन्हाळ्यांत जास्तींत जास्त उष्णतामान ५५-६० फॅ. पर्यंत गेलें की पावसाची शिंपण होऊन जाते व पारा झरकन् खाली येतो.

यामुळे इकडे पावसाच्या दाणेदार सरी माहीतच नाहींत. आपल्या टपोऱ्या थेंबांच्या सडसडणाऱ्या सरींचें आम्ही वर्णन केलें की तिकडच्या लोकांना – मुलांना खूप गंमत वाटे. आपलीं पावसाची काही गाणीं ( म्हणजे इंग्रजींत मुक्तानुवाद ) मी काहींना लिहून दिलीं. फिन्लंडमधे अशीं गाणीं, लोकगीतें, कहाण्या, उखाणे, म्हणी यांचा संग्रह करण्याचें वेड फार आहे. या रुचिर वाङ्मयाची सुमारे तीस हजार छापील पानें त्यांनीं प्रसिद्ध केलीं आहेत. यामुळे तर आमच्याइकडेसुद्धा त्यांच्यासारखीं मुलांम्हाताऱ्यांचीं ( लोक ) गीतें असतात हें जाणून त्यांना कौतुक वाटलें. मला वाटतें, आपल्या काहीं निवडक कहाण्या व लोकगीतें तिकडे जाण्यासारखीं आहेत.

हेल्सिंकी हें फिनलंडचें आत्यंतिक दक्षिण टोक. फिनी आखाताच्या काठावर उत्तरध्रुवबंधापासून ५०० मैल अंतरावर तें वसलेलें आहे. इथे वसंतऋतूंत किमान १९ व कमाल २१ तासांचा दिवस असतो. त्यानंतर सूर्य मावळतो म्हणजे दृष्टिआड होतो. पण काळोख मात्र कधींच पडत नाहीं. चांगला प्रकाश असतो. म्हणून इथल्या रात्रींना पांढऱ्या रात्री ( White nights ) म्हणतात. आपल्याकडे मुंबईला पहांटे सहाच्या सुमाराला जितका उजेड असतो तितका तिथे रात्रीं ११॥–१२ पर्यंत असतो. नंतर सुमारे तासभर झुंजुमुंजू उजेड असतो. एकाच्या सुमाराला दिशा उजळूं लागतात. या १२ ते १ च्या संधिकालाला twilights म्हणतात. यावेळीं क्षितिजावर प्रथम पांढरा उजेड असतो. त्यावर बारीक झिरमिरीत निळसर पडदा सोडावा; मग पुन्हा दुसरा नीलपटल पसरावा व या गडद नीलिमेंतून क्षितिजाचा पांढरा प्रकाश उजळत असावा; मग वाऱ्याने पडदा हलून वायुलहरी उठाव्या तसा स्निग्ध रंग लहरींचा मंद तरंग सुटावा; असा रंगछटांचा नाजूक व मोहक खेळ काहीं काळ चालल्यावर क्षितिजाकडे किंचित् रक्तिमा उमटून दिशा कलाकलांनी उजळत जाव्या म्हणजे पुन्हां नीलपटलावर एक पांढरा पडदा यावा, त्यावर दुसरा, या तीन पडद्यांना भेदून रक्तिमेने डोकवावें; पुन्हा अधिक पांढरें दिसावें; नीलिमा तरल होत अंतर्धान पावावी व फटफटीत उजेड पसरावा। असा तो दिव्य मोहक देखावा पहात भान हरपून अपरावस्थेंत तासभर गुंगून जावें! कोण सूत्रधार हा स्निग्ध तरल व वातशीतल असा रसरंग योजीत असेल कोण जाणे! तासाभराने या रसरंग

मिश्रणांतून तांबुस-गुलनार रंगछटा उधळीत अरुण येतो! अर्थात् वसंत संपातकालीं ध्रुवबंधापासून काहीं अंतरावरच हें संधिप्रकाशाचें दर्शन होईल. हेल्सिंकीपेक्षाहि अधिक दूर दक्षिणेकडील एक दोन हजार मैलांच्या अंतरावरून हा उषा-अरुण संगम अधिक हृदयंगम दिसेल. पण खुद्द उत्तर ध्रुवबंधापलीकडे या वसंतकालीं मात्र उषादर्शन होणार नाहीं. कारण सूर्य अहोरात्र पहारा करीत उभा आहे तिथे!

उत्तर ध्रुवाकडे जायला हेल्सिंकीहून मी मुद्दामच रेल्वेने जायचें ठरवले होतें. कारण त्यामुळे दक्षिणोत्तर सारा फिन्लंड व त्याचे लोक, त्यांतलीं शहरें व निसर्ग यांचें प्रत्यक्ष दर्शन घडेल हा हेतु होता. हा प्रवास पाचशे मैलांचा आहे. वाटेंत केमी, लौरिता, मुर्दा, हिरावस वगैरे अनेक शहरें लागलीं त्यांत हेलसिंकीच्या खालोखाल महत्त्वाचें व साऱ्या फिन्लंड-मधलें औद्योगिकदृष्ट्या अत्यंत प्रगत असें ताम्पेरी शहर होय. सुमारे सवा-लाखाची त्याची वस्ती असून ती संपूर्णतया औद्योगिक पेशाची आहे. सभोवार हिरवेगार डोंगर, स्फटिकवत् शुभ्रोदक सरोवरें व दाट वनराजी या निसर्गसुंदर पार्श्वभूमीवर आंखीव नि रेखीव बांधणीच्या भव्य नि आकर्षक इमारतींचें हें अति प्रेक्षणीय शहर आहे. रशियांतून हद्दपार झाल्यावर महाभाग लेनिन १९१८ च्या क्रांतीच्या आधीचे कित्येक दिवस याच ताम्पेरी शहरांत वास्तव्य करून होता. इथून तो रशियन क्रांतिकारकांशी गुप्तसंबंध ठेवील असे व नेतृत्व करीत असे. द्विधाचित्त झालेल्या रशियन क्रांतिसमितीला "६ नोव्हेंबर म्हणजे फार लौकर व ८ नोव्हेंबर म्हणजे फार उशीरा" या वाक्याने समारोप केलेले सुप्रसिद्ध ऐतिहासिक पत्र लेनिनने याच शहरांतून लिहिलें. आता तें पत्र लेनिनग्राड येथील स्मोलनीच्या संग्रहालयांत चौकटींत मढवून ठेवलेले आहे. आजच्या मानाने तेव्हाचे ताम्पेरी शहर पुष्कळच लहान होतें. ज्या छोट्या घरांत लेनिन रहात असे ते फळकटी घर स्मारक म्हणून जपून ठेवलेले आहे असें म्हणतात. संशोधनाच्या क्षेत्रांतहि ताम्पेरींचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. या शहराच्या आसपास गेल्या ५०-७५ वर्षांत पुष्कळच उत्खनन व संशोधन झालेले आहे; त्यावरून या भागांत पुष्कळच प्राचीन कालापासून मानववस्ती होती असे मानलें जातें, भूस्तर शास्त्रज्ञांनी इथले दगड संशोधिले ते दलदल व बर्फ यांचे बनलेले असल्याचें त्यांना

आढळून आले. यावरून या भागांत अति प्राचीन कालापासून भूस्फोटाचे व हिमप्रलयाचे प्रसंग घडून आले या विधानाला पुष्टि मिळते. हे खडक संशोधकांच्या मतें १४०० दशलक्ष म्हणजे १ अब्ज ४० कोटी वर्षांपूर्वीचे असावे असा त्यांनीं कयास बांधला आहे. या अंदाजावरून हें स्पष्ट होते की मेंदूला पुष्कळच ताण देऊन उमगावें लागेल इतके ते पुरातन आहेत. तथापि या संशोधनाचें आत्यंतिक महत्त्व हें की त्या अज्ञातकालीं तेथे जीवसृष्टि नांदत होती असे हे शास्त्रज्ञ म्हणतात. उत्क्रान्ति शास्त्राच्या न्यायाने ही जीव-कोटी सतत विकास पावत गेली असेल तर तिचे आता काय झालें? पण या संबंधीचें अधिक विवेचन पुढे येणार असल्याने हा मुद्दा इथेच सोडून पुढच्या प्रवासाला लागूं.

रेल्वेचा हा एकूण प्रवास पांचशे मैलाचा असून तो रोवानेमी येथे पुरा होतो. इथे रेल्वे संपते. रोवानेमी हें शहर ८–१० हजारांच्या वस्तीचें व आधुनिक पद्धतीच्या इमारतीचें शहर आहे. उत्तर ध्रुवबंधाच्या सीमारेषेवर म्हणजे ७० अक्षांशावर वसलेलें जगावरचें तें एकुलतें एक शहर आहे. गेल्या युद्धांत इथे दोन लाख जर्मन सैनिकांचा तळ होता. इथूनच त्यांनीं लेनिनग्राडवर त्याच्या उत्तरेकडून धडक मारली होती. १९४५ सालीं पळून जातांना जर्मनाने उभें शहर जाळून बेचीराख केलें. त्यानंतर आजचें शहर आधुनिक पद्धतीने बांधलें. पण अजून तिथे घरांची टंचाई आहेच. बॉम्ब माऱ्यांत अर्धवट कोसळलेली, भिंतींना तडा गेलेली अशी कित्येक घरें तिथे दिसतात व माणसें त्यांत राहतात. काहींना जागाच नाहीं. ते कुडामाडाच्या भिंतीच्या झोपड्या उभारून राहतात. हा भाग अत्यंत गलिच्छ व घाणेरडा आहे.

पिसाळलेल्या नागिणीप्रमाणे उत्तरेकडून सळसळत येणाऱ्या एका विस्तीर्ण नदीच्या कांठावर रोवानेमी वसलेलें आहे. सही सही हरिद्वारची शोभा इथे दिसते. तीच ती सळसळणारी गंगामाई नि तिचे बांधील घाट, पात्रापलीकडचे तेच ते नील पर्वत नि तेंच ते पलीकडचें अरण्य. नदीचा पूल ओलांडून ५–१० मैल पलीकडे गेलें की तिथे सरकारी नोंद कचेरी लागते. हें एक छोटेसे खेडेगांव आहे. त्याचें नांव नाप्पेपारी. युद्धानंतर जर्मनांचे क्रूर पराक्रम पहाण्यासाठी श्रीमती रूझवेल्ट तिथे गेल्या होत्या.

त्यांच्या त्या भेटीच्या स्मरणार्थ तुळईसारख्या अखंड गोल लाकडांची एक छोटी बंगली बांधलेली आहे. तिच्यांतच ही नोंदणी कचेरी आहे. एक भली मोठी जाड नोंद-पोथी तिथे ठेवलेली असून प्रवाशाने तिच्यांत आपले संपूर्ण नांव व पत्ता लिहून सही करायची असते. मग शंभर मार्क म्हणजे एक रुपया पांच आणे दिले की उत्तर ध्रुवबंध ओलांडल्याचें सरकारी प्रमाण-पत्र मिळतें. आणखी दोन रुपये दिले की आपल्या प्रियजनांना विमानाने पाठवायला चार इंच लांबीचा व एक इंच रुंदीचा रेशमी ध्वज मिळतो. त्याच्या पुठ्यावर दोनचार ओळी लिहिण्याइतकी जागा असते. नोंद-पोथींत सही करून मी प्रमाणपत्र घेतलें. त्यावर हा मजकूर असतो :

**Certificate**

*This is to Certify that* **Lalji Pendse** *has crossed to day, the Arctic cirele at a point in Rovaneemi in North Finland.*

*We wish you good luck, now and forever.*

*The Arctic circle.* *Dtd. 26–6–'55*

नोंदणी कामदाराची सही.

ध्वजावर मी माझ्या मुलाला पत्र लिहिलें.

"·संदीप, उत्तरध्रुवबंधावरून हें पत्र लिहितो आहे. आज मध्यरात्रीं मी सूर्य पहाणार आहे. तिथे जायला सांबराच्या गाडींत बसणार आहे. इथून हेल्‌सिंकीला जाऊन मॉस्कोला जाईन. मोठें पत्र तिथून लिहीन.

—बाबा

इथून पांच मैलांवर एक टेकडी आहे. तिचें नांव औरस्वारा. इथूनहि मध्यरात्री सूर्य पहातात. पूर्व सरहद्दीकडे पन्नासेक मैलपर्यंत दाट जंगल लागतें, मग तें पुढे विरळ होत जातें. वृक्षहि खुजट होत जातात. पुढे पुढे तर त्यांना झुडुपें हीच संज्ञा सार्थ ठरते. जमीनहि हिमकण-मिश्र पांढरी दिसूं लागते, व पुढे बर्फाच्या कणांचा रवेदार थर रस्त्यावर जमलेला दिसतो. त्यावर सूर्य किरणें पडल्याने चमचम होऊन डोळे दिपूं लागतात. इकडच्या लोकांच्या डोळ्यांचीं बुबुळें कांचेसारखी व पांढरट कां

याचें एक कारण या प्रकाशाचा परिणाम हें असूं शकेल. पश्चिमेचा भाग उंचवट असून त्यांतून वेगाने नद्या वहात येतात. त्यांच्या अति वेगवान धारेवरून होड्या वल्हविण्याचा इथे खेळ चालतो. वल्हविणारे सराईत कोळीच असतात. तरी पण प्रवाहाच्या तुफान धारेत सांपडल्यावर आपल्या-सारख्या नवख्या नवागताचें काळीज पाण्याची मदमस्ती पाहून धडधडूं लागतें यांत कांहीं शंका नाहीं. यांतल्या कांहीं नद्यांत सांपडणारे ‘ सॉलमन ’ हे गोडे मासे फार चविष्ट म्हणून मध्य युरोपांत प्रसिद्ध आहेत. एका नदीचें नांव स्वार्नी ( स्वर्ण शब्दाशी किती साम्य आहे पहा ) असें कळलें. तिच्या व दुसऱ्या कांहीं नद्यांच्या रेतींत सुवर्ण कण सांपडतात. आपल्या गंगामाईचीहि अशीच ख्याती आहे. स्योमी कथा वाङ्मयांत या संबंधीच्या बऱ्याच गोष्टी आहेत. एका युवकाचें कोणा एका युवतीवर प्रेम जडलें व त्याने लग्नाची मागणी घातली. तेव्हा तिने त्याला अशी अट घातली की या नदींतले सुवर्णकण वेचून त्यांची लग्नभेटीची आंगठी तयार करून आणलीस तर मी तुझ्याशी लग्न करीन. सहा महिने अहोरात्र नदीकांठी बसून त्या युव्याने सुवर्णकण गोळा करून त्यांची आंगठी आपल्या प्रेयसीच्या बोटांत घातली. तेव्हा त्याचें लग्न झालें, अशी एक कथा आहे. सरकारी मुद्रितांतहि या सुवर्णाचा उल्लेख आहे. म्हणजे नदीचें नांव, तिच्या पात्रांत सांपडणाऱ्या धातूच्या नावांशी त्याचा संबध आणि त्या धातूनामाचें संस्कृत शब्दाशी साधर्म्यच नव्हे तर तादात्म्य याची मला मोठी मौज वाटली. पण फिनी व रुसी भाषांत असे किती तरी शब्द आढळतात. त्यांचा कांहीं विचार पुढच्या भागांत करूं.

सूर्य दर्शनाची इथून पुढे पूर्व, पश्चिम अशी अनेक ठिकाणें आहेत. यांतल्या पूर्वेच्या ओहलो या ठिकाणाशी आम्ही रात्रीं दहा-साडेदहा वाजतां येऊन ठेपलों व लागलीच चढणीला लागलों. प्रकाश तर इतका स्वच्छ होता की हातावरच्या घड्याळांत सेकंद काट्याचीहि गति स्पष्ट दिसत होती. समोरच्या टेकडावर चढून तिथून सूर्य पहायचा होता. टेकडी कांहीं फार उंच नाहीं. पण पायथ्याचा बराच लांबीचा भाग चढणीचा आहे. वर येऊन पोचलों तेव्हा सुमारे दोनशे लोक खडकावर बैठका शोधून बसलेले नि कांहीं उभे होते. यांत स्त्रियाहि होत्या. पांच-दहा लोकांनीं

सूर्यासमोर दुर्बिणीसारखे कॅमेरे रोखून ठेवले होते. या लोकांत काहीं देशस्थ तर काहीं परस्थ हजारो मैलांचें अंतर तुडवीत आलेले होते. जर्मनी, फ्रान्स इटली, इंग्लंड, कानडा, अमेरिका अशा किती तरी देशांच्या एकमेकांशी सर्वथा अपरिचित असलेल्या व्यक्ति भगवान् सूर्यांची अस्तंगतीची अननुभूत लीला पहायला आलेले व एकमेकांशी लगटून बसलेले होते. या मंडळींत कॅलिफोर्नियाचे एक वयोवृद्ध इंजिनियर व त्यांच्या पत्नी भला मोठा कॅमेरा घेऊन आलेले होते. सूर्याच्या गतिरेषेचा वेध घेण्यासाठी ते दर तीस सेकंदांनीं फोटो घेत होते. डोळ्याला जाड काळ्या काचांचा चष्मा व डाव्या तळ-हातावर घड्याळ असे ते तासन्तास फोटो घेत उभे होते. ज्यांच्यापाशी चष्मा नव्हता ते काळ्या सेल्यूलाईडचा तुकडा घेऊन व त्याला सूईच्या अग्रा-एवढे भोंक पाडून त्यांतून पहात होते. काहीं वेळ सूर्याकडे पहायचें व १०-१५ सेकंदांनीं डोळे घट्ट मिटून घ्यायचे; पुन्हा पहायचे व पुन्हा डोळे मिटून घ्यायचे. कारण सूर्याकडे एकसारखे पहात राहिले तर दृष्टीवर परिणाम होईल, अंधत्व येईल.

रोज रोज मुंबईच्या अरबी समुद्रांत बुडी घेऊन अदृश्य होणाऱ्या त्या महान्म्याला शेवटी त्याच्या शयनागारांत घुसून हुडकून काढल्याच्या विजयी मुद्रेने त्या दिनांक २६ जून १९५५ च्या रात्रीं ११ वाजतां मी त्याच्यावर प्रथम दृष्टिपात केला तेव्हा तो वरमून गोरामोरा झाला होता. क्षितिजापासून या वेळीं तो वीत-दीड वीत उंच होता. पण आम्हा भारतीयांशी नित्यशः चालविलेल्या लपंडावांत आता हार खावी लागल्यामुळे हिरमुसला होऊन त्याने मान खाली घातली, व क्षितिजाचा आधार घेण्यासाठी खाली खाली घरंगळूं लागला. बाराच्या सुमाराला क्षितिजाला तो लगटलाच; पण आणखी खाली सरकून तोंड लपवायला त्याला मुभा होतीच कुठे ! श्यामेला दिलेल्या वसंतवचनाने तो बांधला गेला होता. मग सुमारे तासभर तसाच क्षितिजाला लगटून तो पुढे सरपटत राहिला व एकाच्या सुमाराला हळूहळू उंचावूं लागला. त्याची प्रवासगति अंडाकृती होती.

रात्रीं बाराला तो आमच्या अगदी समोर होता व किंचित् लंबगोल दिसत होता. त्याचीं मंद किरणें सर्वत्र पसरलेलीं होतीं. तरी पण आमच्या समोर काहीं किरणांचा दाट व मोठा प्रकाशझोत येत होता. या किरणांपुढे

पांढरे ढग होते. त्यांच्यावर किरणप्रकाश पडून ते चमकदार तांबूस वर्णाचे वाटत. असेच अंतरा अंतरावर सर्वत्र ढग रेंगाळत होते नि त्यांच्यावर रक्तिमा चमकत होती. या दिव्य मंगल रंगसंगतीची खुमास वर्णनाला अशक्यच ! डोळ्यांच्या पेल्यांत ती भरून घ्यावी व अंतःकरणांत खोल साठवून ठेवावी. या दृश्यावरूनच तर सूर्याच्या सप्ताश्व रथाची कल्पना पूर्वजांना सुचली नसेल ना ? सूर्य चलित असल्याने तो रथारूढ आहे. पुढचे तांबुसलेले ढग हे घोडे नि किरणझोत हे त्याचे रश्मि. देवलोकीची ती सप्ताश्वरथाची दिव्य मनोरम मिरवणूक दीड वाजेपर्यंत आमचे मुजरे घेत मंद गतीने चालली होती. पण मग अरुणाचा चाबूक कडाडला नि घोडे उधळले. रात्रीं तीन वाजतां सूर्य इतका वर आला की भारतांत सकाळचा नवाचा सुमार वाटावा. ध्यानी मनी नसता एकाएकीं फिन्लंडला येण्याची कल्पना उमटावी; चुटकीसरशी ती यशस्वी व्हावी; शुक्लेंदुवत् शुभ्रपावन अशा पितृभूमीला आपले पाय लागावे; भर मध्यरात्रीं महन्मय भास्कराची देवदुर्लभ अशी क्षितिज-यात्रा आपण पहावी; हें एक दिव्य अन् अतर्क्य असें स्वप्नच माझ्या आयुष्यांत घडलें. पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या रक्ताचे पूर्वसंस्कार क्षणभर मनांत उसळून आले. त्यांनीं मला पुलकित केला अन् धुंदहि केला.

तेजाळत चाललेल्या सूर्यनारायणाचें दर्शन पुन्हा एकदा अभिलाषी मनाने घेऊन आम्ही परत फिरलों. बहुधा सर्वच लोक परत फिरले. कारण यानंतरचा अंतराळांत उंचावत जाणारा तेजोनिधि कुठूनहि दिसणारा होता. प्राचीनकालीं सोमरसपानाने पूर्वजांना जसें झालें असेल तसें माझें मन यावेळी उन्मादमस्त होऊन तरंगत होतें. हात, पाय, प्रत्येक अवयवावयव त्याच निर्मम, निरव अवस्थेत तरंगत होते. याच अवस्थेंत मी रोवानेमीला परतत होतो. कारण दुपारची गाडी गाठायची होती. रस्ताभर मनांत संबद्ध असंबद्ध विचार चाललेले होते. संबद्धतेचा एकपरीने लय झाला होता त्या अक्षुण्ण अवस्थेत. मनाला वाटे, तो दिव्य 'सप्ताश्वरथ' आपण पाहिला. पण तिथे जे व जेवढें दिसलें तेवढ्यावरच पूर्वजांनीं–ऋषींनीं रथाची कल्पना रचून ती ऋग्वेदासारख्या प्रमाण ग्रंथांत सामावून टाकली असेल का ? पण मग कुठे कुठे दशाश्वरथाचाहि उल्लेख आहे तो कां ? अन् युरोपीय वाङ्मयांत कुठे आठ घोडेहि उल्लेखिलेले आहेत. मग अशी संख्येची चाळवाचाळव कां ?

पुन्हा असेहि वाटे, सात तरी नक्की का मानायचे ? वाऱ्याच्या गतीबरोबर वहात जाणारे ढग केव्हा कुठे असतील अन् किती असतील ? शाश्वत विधानाला ते प्रमाणभूत कसे ठरतील ? अर्थात् घोड्याचें रूपक बसवायला या चलित, अस्थिर नि अनिश्चित ढगांपेक्षा अधिक स्थायी व स्थीर-शाश्वत असें काहींतरी या रूपकामागे असले पाहिजे. काय असेल बरें तें ? हा विचार करतांना सूर्यभ्रमणाचें वार्षिक वेळापत्रक चौकसपणाने तपासून पाहिलें पाहिजे.

उत्तर ध्रुवावर जानेवारीच्या २९ व्या दिवसापासून दीर्घ तिमिरानंतर उषःकाल सुरू होतो. आपल्या देशांत आपण पाहतों तशी तिथली उषा तास अर्धा तास दिसून पळून जाणारी चवचाल व नाचऱ्या वृत्तीची नाहीं. किंबहुना खरें उषादर्शन आपल्या या भागांत होतच नाहीं. तिकडे ती दीर्घकालपर्यंत दिसत राहते, व मग अरुणाची प्रभा फाकते. सुमारे तीस दिवसपर्यंत हें उषादर्शन सतत असतें. पुढे मार्चचे पंधरा दिवस ती क्रमशः कमी कमी होत जाते व सूर्याची तिरीप (अरुण प्रभा) वाढत जाते. मार्चच्या १६ व्या दिवसापासून तो पुढें सतत १९४ दिवसपर्यंत सूर्य अहोरात्र उगवलेला असतो व मध्यरात्री क्षितिजसंन्निध असतो. या १९४ दिवसांपैकी जूनच्या २१ व्या दिवसापासून पुढे सुमारे ४० दिवस तर तो अहोरात्र (म्हणजे मध्यरात्तीसुद्धा) क्षितिजाच्या बराच वर असतो. या चाळीस दिवसानंतर तो हळूहळू क्षितिजाकडे घरंगळत जातो व सप्टेंबरच्या २५ व्या दिवसापासून अस्तंगत होऊं लागतो. इथून पुढे ४८ दिवस अहोरात्रीच्या (म्हणजे २४ तास) बऱ्याच भागांत तो दिसला नाहीं तरी काळोख मात्र कधीच नसतो. कारण जानेवारीच्या उषःकालाप्रमाणे आता संध्याराणीचा दिगंत विलासकाल सुरू झालेला असतो. उषःकाली व संध्याकाळी रात्री या प्रदेशांत सूर्य दिसला नाहीं तरी ध्रुवबिंदूच्या पलीकडे १६ अंश पर्यंतच्या अंतरिक्षांत तो असल्याने त्याचीं तिरपी किरणें क्षितीजावर चमकत राहतात. यापुढे म्हणजे नोव्हेंबरच्या १३ व्या दिवसापासून जानेवारीच्या २९ पर्यंतचे ७६ दिवस संपूर्ण तिमिरव्याप्त म्हणजे पूर्ण काळोखाचे असतात. अशा रीतीने दीर्घ उषःकाल, संपूर्ण सूर्य-प्रकाशाचा वसंतकाल व दीर्घ संध्या प्रकाशकाल यांचे मिळून नऊ साडेनऊ महिने होतात. ध्रुव प्रदेशाच्या साडेतेवीस अंशाच्या क्षेत्र वर्तुळांत अक्षांशमानाप्रमाणे

हे महिने ८-७-६ असे होत जातील. आयन योजना या सहामाहीच्या अक्षांश भागांत सिद्ध आहे. तिलाच आपण देवाचा सहामाही दिवस-रात्र असें म्हणतों. ७० अक्षांशासन्निध दिवस अहोरात्र ७३ दिवसाचा व तिमिर-व्याप्त रात्र ५१ दिवसाची असते. अंतिम उत्तरेच्या स्पीट्सब्रर्जन व स्वर्नाया झेल्मा बेटांवर हे दिवस-रात्र अनुक्रमे ९३ व ७१ असतील. उषा व संध्या यांचा काल तिमाही असेल.

अर्थात् सूर्यरथाला घोड्यांची दहा, नऊ व सात अशी जी संख्या दर्शविली गेली आहे ती ध्रुवबिंदूवर्तुळापासून अक्षांशमानाप्रमाणे वसंताच्या सूर्योदय काळाच्या बदलत्या महिन्यांची द्योतक असावी. सैबेरियाच्या उत्तरेला ( स्वर्नाया झेल्मा ) दहामाही वसंतसंपात म्हणजे सूर्य प्रकाश काल म्हणून तेथली दशाश्वरथाची; सैबेरियाच्या दक्षिणेला नऊ माही सूर्य प्रकाश व उरल-खोऱ्यांत सातमाही वसंत म्हणजे उदीत सूर्य म्हणून तिथली सप्ताश्वरथाची; अशा दोन्ही कल्पना ऋग्वेदांत आलेल्या आहेत. त्याच्याहि खाली पामीर ( कॉकेशस ) हिंदुकुशाकडे सूर्य बारा माही व ऋतु सहा बनतात. इथे सूर्याला सर्वकाळ व सर्वत्र पाहणारा ( तळपणारा ) 'विचक्षणम्' हें संज्ञाभिधान प्राप्त झालें, हें मागे आलेंच आहे. नंदनवनाच्या वर्णनाप्रमाणेच या सात व सहा माही दिवस-रात्री व दीर्घ उषा यांची ऋग्वेदापेक्षाहि भरपूर वर्णनें अवेस्ता ग्रंथांत आलेलीं असल्याचें विस्तृत विवेचन लोकमान्य टिळक यांनीं संशोधनपूर्वक मांडले आहे. आपल्या या विधानाच्या समर्थनासाठी दीर्घ तिमिराचा म्हणजेच वृत्रांचा उच्छेद करण्यासाठी त्यांनीं अंगीरसाच्या नवाग्व व दशाग्व यज्ञ सत्रांचा उहोपोह केला आहे. हें सत्र प्रकाशकालांत चाले. ग्व म्हणजे गवा व प्रतिमासिक एक गव्याचा यज्ञ असें हें नऊ व दहा गव्यांच्या यज्ञाचें सत्र असे. यावरून सूर्यरथाच्या घोड्यांची उपमा वसंतकाळच्या महिन्यांची वाचक आहे ही टिळकांची उपपत्ति सार्थ दिसते.

हें लिखाण मुख्यतः प्रवासवर्णनाचें आहे. यामुळे मी ओळीने जिथे गेलो, जे पाहिलें व त्यावरून जे सुचलें ते त्या त्या स्थळी व सुचेल तसें तसें लिहीत गेलों. यामुळे उत्तर ध्रुवासंबंधीची माहिती अनेक ठिकाणी विखुरली गेली आहे. त्यांतला प्रवासाचा भाग मनोरंजक वाटला तरी ही माहिती एके ठिकाणी संकलित स्वरूपांत नसल्याने खटकल्यासारखें होतें. म्हणून उत्तर

ध्रुव प्रदेशासंबंधी जे काहीं ग्रथित केले त्यांतून उत्पन्न होणाऱ्या प्रश्नांकडे वळण्यापूर्वीं, थोडा द्विरुक्तीचा दोष पत्करूनसुद्धा, त्या प्रदेशाची माहिती इथे संकलीतपणाने मांडतों.

फिन्लंड हा युरोपचा सर्वांत अधिक उत्तरेचा देश आहे. हेल्सिंकी हें त्याचें राजधानीचें दक्षिण टोक ६० अक्षांशावर आहे. उत्तरेचें टोक ७२·७४ अक्षांशावर आहे. ७० अक्षांशावर ध्रुवप्रदेशबंध असल्याचें मानतात. या बंधापलीकडे फिन्लंड २४० मैल पसरलेला आहे. इथे सलग भूप्रदेश संपून बेरेंतचा लहानसा समुद्र लागतो. त्याच्या पलीकडे आर्क्टिक म्हणजे उत्तर ध्रुवाचा महासागर पसरलेला आहे. फिन्लंडच्या डोक्यावर सुमारे ८०–८२ अक्षांशावर म्हणजे सुमारे चारशे मैल उत्तरेला या महासागरांत स्पीट्सबर्जन हें छोटें बेट आहे, रशियांतील सैबेरियाचें तुंद्रस हें उत्तरेचें टोक फिन्लंडच्या उत्तर टोकाशी समांतर आहे. सैबेरियाच्या उत्तरेला असलेलें " स्वनाया झेल्मा " हें बेट स्पीटसबर्जनशी समांतर आहे. या दोन बेटांच्या मधे आज बेरेंत व कारा हे छोटे समुद्र पसरलेले आहेत. ते दहा-बारा हजार वर्षांपूर्वीं या भागांत हिमप्रलय व भूकंप होऊन भूपृष्ठावर जे फरक झाले तेव्हा निर्माण झालेले आहेत. पण त्या प्रलयापूर्वीं समुद्राच्या जागीं अखंड भूप्रदेश पसरलेला होता. हवा समशितोष्ण व आल्हाददायक होती. वनस्पतींनीं व उद्भीजांनीं फुललेला, नि मानव व वन्य प्राण्यांनीं गजबजलेला असा तो अति रम्य प्रदेश होता. यालाच देवांचें नंदनवन म्हटलेलें आहे. सैबेरियांत मोठाल्या मृत प्राण्यांच्या देहांचे बर्फमय भूमींत गाडले राहिल्यामुळे ओळखतां येण्यासारखे सांगाडे सांपडले. दक्षिण सैबेरियांत हत्ती व घोडे यांचे सांगाडे सांपडले. ते तपासून पहाता ते दहा हजार वर्षांपूर्वींचे असल्याचें भूस्तरशास्त्रज्ञ म्हणतात. फिन्लंडच्या उत्तर ध्रुवबंधापलीकडे दहा हजार वर्षांपूर्वीं मानवाची वस्ती होती. पण शेवटल्या हिमप्रलयानतर ती उठली, असें फिर्ना भूस्तर–शास्त्रज्ञांचें मत आहे. हें मत सामान्यपणे सर्वच युरोपियन व अमेरिकन शास्त्रज्ञांचें आहे. या सर्वांवरून शेवटचा हिमप्रलय दहा-बारा हजार वर्षांपूर्वीं झाला असावा या कल्पनेला निर्णायक पुष्टि मिळते.

या उत्तरध्रुव प्रदेशांत किती प्राचीन कालापासून वस्ती होती हें अजून निश्चित किंवा सर्वमान्य झालेलें नाहीं. उत्तर फिन्लंडमधील खडक अतीव

प्राचीन कालाचे म्हणजे कोट्यावधी वर्षांपूर्वींचे आहेत इतकेंच नव्हे तर ताम्पेरी नजीक जें उत्खनन झालें त्यांत ते १४,००० लक्ष म्हणजे १ अब्ज ४० कोटि वर्षांपूर्वींचे असावेत व तिथे तेव्हा कसल्यातरी प्रकारची जीवकोटी नांदत असावी असें अनुमान करण्यासारखा पुरावा सांपडल्याचा फिनी भूगर्भशास्त्रज्ञांचा दावा आहे. अर्थात् मानव असेल असें कोणीच सुचवीत नाहीं. तसें सुचविणेहि शक्य नाहीं. पण कोटिकोटि वर्षांपूर्वी जर तिथे कसली का असेना, पण जीवकोटि नांदत असेल तर उत्क्रांति शास्त्राप्रमाणे तिचा निरंतर विकास होत राहिला असला पाहिजे व कालांतराने तो विकास क्रमशः चतुष्पाद व द्विपाद प्राण्यांत परिणत व्हायला पाहिजे होता. पण तसें असेल तर मानवसुद्धा कोटि वर्षांपूर्वींच सिद्ध व्हायला पाहिजे होता. पण वस्तुस्थिति तसें काहीं घडल्याची दिसत नाहीं. त्याअर्थी सृष्टिक्रमांत झालेल्या विकासाचा विनाश व्हावा, पुन्हा नव्याने सृष्टि विसकित व्हावी, पुन्हा ती नष्ट व्हावी, हा क्रम कित्येकदा घडत गेला असला पाहिजे. हा निवळ तर्क नसून भूस्तरशास्त्राने सिद्ध केलेली गोष्ट आहे. या सिद्धांताप्रमाणे सृष्टीच्या उत्क्रान्तिकार्यांत या भागांत कालांतराने मधून मधून हिमप्रलय नि भूकंप व्हावे व त्यांत तो उध्वस्त व्हावा; कालांतराने मग पुन्हा सृष्टि व जीव फुलूं लागावे, पुन्हा कालांतराने तोच विकास व विनाशक्रम होत रहावा, या क्रमाने सुमारे दहा बारा हजार वर्षांपूर्वी जो शेवटचा अतिप्रचंड हिमप्रलय व भूकंप होऊन उलथापालथ झाली त्यांत हा प्रदेश बराचसा जलमय झाला व नजिकच्या भागांवर शेकडो फूट उंचीचे बर्फाचे थर माजले. ताम्पेरीला जे अति प्राचीन खडक सांपडले ते अशाच अनेक प्रलयकालीं थरावर थर सांचून बनलेल्या डोंगराच्या तळाचे होत.

उत्तरध्रुवाकडची भूमि बर्फ व भूपृष्ठाखालचा गाळ यांच्या मिश्रणाने बनलेली आहे. शेवटच्या तीव्रतम हिमप्रलयामुळे तिथली हवा अति थंड बनल्याने वनस्पती पोषणास व मानववस्तीस ती भूमि सर्वथा निरुपयोगी बनली. यामुळे प्रलयांतून वांचलेल्या मानवांनीं तिचा त्याग केला व सैबेरिया मार्गाने खाली उरल पर्वताच्या प्रस्तर खोऱ्यांत उतरून ते तिथे स्थिर झाले. हा काळ कोणचा यासंबंधी दोनतीन मतें व्यक्त झालीं आहेत. कोणी हा काळ ऐंशी हजार वर्षांचा धरतात तर दुसरे कोणी तीस हजारांचा धरतात. पण

मानवी प्रगति व संस्कृतिविकास यांचा विचार करतां तो इतका प्राचीन मानणे शक्यच नाहीं. शेवटच्या हिमसंपाताचा काळ तीस हजार वर्षांचा धरला तर प्राचीन ऋग्वेद काळ किमानपक्षी १८–२० हजार वर्षांपूर्वींचा धरावा लागेल. पण इतक्या प्राचीकालीं मानवाचें बौद्धिक व सांस्कृतिक जीवन ऋग्वेद रचण्याइतके उन्नत असेल तर त्यानंतरची त्याची प्रगति इतकी मंद का असावी ? अगदी प्रारंभकालीं जीवनक्षेमाचीं म्हणजे उत्पादनाचीं साधनें अत्यंत तुटपुंजी असतात तेव्हा विकासहि अति मंद गतीचा असतो. पण या साधनांचा विकास होत जातो तसतशी जीवन व संस्कृति विकासाची गति वाढत जाते. यामुळे असल्या अति प्राचीन कालाचा संकेत हा "मनकी मानी बात" असाच बेहिशेबी मानला पाहिजे. व दहा हजार वर्षे ही काल गणना मान्य केली पाहिजे. फिन्लंडच्या उत्तरध्रुव बंधांतल्या प्रदेशाला लॅपलॅन्ड म्हणतात. तेथे दहा हजार वर्षांपूर्वी वस्ती होती. बरीच प्रगत संस्कृति तिने सिद्ध केली होती. पण नंतरच्या हिमप्रलयांत ती नष्ट झाली; वस्ती परागंदा झाली. तो प्रदेश ओसाड पडला. काहीं थोडी वस्ती दक्षिणेकडे सरकली. सर्व जीवन म्हणजेच जीवन व्यवहाराचीं साधनें व विविधता नष्ट झाल्याने ती लोकवस्ती पुन्हा अर्ध रानटी अवस्थेला पोचली. आजची नोमॅड प्रजा ही त्याच अर्धरानटी लोकांची संतति होय. आजहि ती जवळ जवळ त्याच अवस्थेंत आहे. परागंदा झालेला मानव बहुधा सैबेरिया मार्गाने खालीं उरलकडे उतरला असेल किंवा नष्ट झाला असेल. पण पुढे कित्येक हजार वर्षांनंतर पूर्वेकडून (म्हणजेच उरलकडून) मृगयावान् पण मेंढपाल अवस्थे-प्रत पोचलेल्या काहीं टोळ्या फिन्लंडच्या दक्षिण टोकाकडे आल्या. मृगयावान् असल्याने त्या शस्त्रसज्ज होत्या. त्यांनीं विरळ वस्तीच्या रानटी टोळ्यांना उत्तरकडे म्हणजे लॅपलँडमधे हुसकून लावलें व त्यांच्या जमिनी बळकावल्या. उरलकडच्या या टोळ्या इस्तोनिया, लटव्हिया मार्गाने आल्या असाव्यात असें मानायला जागा आहे. फिन्लंडमधून काहीं टोळ्या मध्ययुरोपकडे गेल्या. या पुराव्यावरूनहि शेवटचा हिमप्रलय संपून हिमांतरकाल १०–१२ हजार वर्षांपूर्वींच सुरू झाला असावा व हिमप्रलयांत हा प्रदेश निर्मनुष्य बनला असावा या कल्पनेला पुष्टीच मिळते.

उत्तर ध्रुव प्रदेशांत ऋतुमान आपल्यासारखे नाहीं. तिथे पावसाळ्याचा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
वि: ......... ७४-७५
अनुक्रम
नों: दि: ..........

असा ऋतु नाहींच. [illegible] मधून मधून झिमझिम चालू असते. म्हणजे उन्हाळा व हिवाळा हे दोनच ऋतु तिथे असल्याचें स्पष्ट होईल. वर्षाचे हे दोन ऋतु म्हणजे देवांचा सहामाही दिवस व सहामाही रात्र होय. यालाच आपण अनुक्रमें उत्तरायण व दक्षिणायन म्हणतों. जानेवारीच्या १४ व्या दिवशी सूर्याचें मकर राशींत संक्रमण होतें. तेव्हापासून हें उत्तरायण म्हणजे देवांचा दिवस सुरू होतो. अर्थात् त्या दिवसापासून सूर्य सर्वत्र लख्ख दिसूं लागतो असें नाहीं. आर्क्टिक महासागरांतलीं स्पीट्सबर्जन व स्वर्नोया झेल्मा हीं जीं दोन बेटें वर उल्लेखिलीं आहेत त्यांच्या जवळपासच्या प्रदेशांत म्हणजे ८३-८६ अक्षांशावर सूर्य मार्चच्या मध्याला उगवेल व सप्टेंबर अखेरीला मावळेल. त्यानंतर नोव्हेंबरच्या मध्यापर्यंत संध्याप्रकाश होत राहील. त्यानंतर सुमारे ७३ ते ८१ दिवस संपूर्ण काळोखाचे असून फेब्रुवारीच्या मध्यापासून महिना-दीड महिना उषा दर्शन होत राहील, व मग सूर्यदर्शन होऊं लागेल. हा वसंत काल होय. फिन्लंडच्या ज्या उत्तर ध्रुवबंधांत मी फिरलो, तिथे ७६ दिवस अहोरात्र सूर्यप्रकाश असतो. तसेंच हेमंतांत म्हणजे नोव्हेंबर नंतर ५३ दिवस अहोरात्र तिमिर म्हणजे काळोख असतो. यावरून फेब्रुवारीच्या शेवटच्या भागांत सूर्य काहीं तास उगवतो व पुढे पुढे त्याचा प्रकाशकाल मोठमोठा होत जाऊन जूनच्या २१ व्या दिवसापासून ऑगस्ट अखेरपर्यंत सूर्य समोरच्या क्षितिजावर सतत चक्राकृति फिरत रहातो. चोवीस तास म्हणजे अहोरात्र सूर्य तळपत असल्याने या वसंत संपातकाली उषादर्शन मुळीच नसतें. तसेंच संध्यादर्शनहि अशक्यच. सप्टेंबरपासून मग दिवस अधिकाधिक लहान होत जातो. त्या मानाने पुढे महिना-दीड महिनाभर मनाला वेड लावणारी संध्याप्रकाशाची मनोरम रंगरूपें पहायला मिळतील. त्या काळा-नंतर रात्र सुरू होते, ती जानेवारीच्या मध्यापर्यंत अहोरात्र चालूच असते. वृत्रांच्या इंद्रावरील स्वारीचा काळ तो हाच. जानेवारींत संक्रमण होऊन सूर्य उदीचीला येऊं लागतो. ध्रुवबिंदू पलीकडील गोलार्धांत सूर्य १६ अंश क्षितिजाखालीं असेल तेव्हा त्याचीं तिरपी किरणें क्षितिजावर परावर्तित होऊन उषेची प्रभा फांकेल व अरुण फडकूं लागेल. उषादर्शनाचें हें अगदी सामान्य व ढोबळ वर्णन झालें. पण आजच्या वैज्ञानिक शोधावरून उषेचें रहस्य आपल्याला कळून चुकलें आहे. त्यावरून असें म्हणता येईल की

सूर्यावर जी भगें किंवा क्षतें असतात त्यांतून पांढरा गॅस ( बाष्प ) कारंजांतून पाण्याचे फवारे उडावे तशा तऱ्हेने बाहेर पडून पसरतो नि पृथ्वीच्या कवचावर आदळून त्यांतील प्रोटोन व इलेक्ट्रॉन विभक्त होतात व उलट सुलट गतीने कवचाभोवती फिरत राहतात. या गतिचक्रांत त्यांच्यांतील द्रव झिरपूं लागतात व ते पृथ्वी कवचाच्या आंत असलेल्या हवेंतील ऑक्सिजन व नायट्रोजनवर आदळतात. या घर्षणांतून एक प्रभा निर्माण होते तिला आपण उषेची प्रभा म्हणतों. ती फांकल्यावर काहीं काळाने म्हणजे सूर्य १६ अंशाच्या आणखी थोडा वर आल्यावर ही प्रभा आरक्तता धारण करते. अर्थातच ही क्रिया सूर्य मंडलांत किंवा प्रत्यक्ष ध्रुवबिंदूवर घडत नसून ज्या तिरकस दिशेने सूर्य-किरणें जातात त्या दिशेला ध्रुवापासून बऱ्याच अंतरावर घडते. म्हणून उषेच्या प्रभेचीं वर्तुळें ध्रुवबिंदूपासून दूर जरा तिरकस असतात.

दि. २६ जूनच्या रात्रीं लॅपलॅंडच्या ईशान्येस इव्हेलो गावीं जाऊन मी सूर्यदर्शन घेतलें. दिवस उन्हाळ्याचे होते. जमिनींत बर्फकण चकाकत होते. हिमप्रवाह ( नद्या ) तर सळसळून वहात होता. हिवाळ्यांत इथे इतके बर्फ पडतें की झाडें व झोपड्या संपूर्णपणे झांकल्या जातात. जुलैचा तिसरा आठवडा अति उन्हाळ्याचा. या वेळी उष्णतामान ५६° डिग्रीपर्यंत वाढतें. जानेवारी-फेब्रुवारीचे दिवस अति हिमवृष्टीचे म्हणजेच अति थंडीचे असतात. यावेळी उष्णतामान २० फॅ.च्या आसपास असतें. पोटांतलें पाणी गोठावें अशी ती थंडी ! इथून हेल्सिंकी दक्षिणेला ७०० मैलांवर आहे. तिथे या काळांत २१ तासाचा दिवस असतो. नंतरच्या तीन तासांत प्रत्यक्ष ऊन नसलें तरी पांढरा प्रकाश असतो, इतका की वर्तमानपत्र वाचावें. मध्यरात्रीला इथे संधिप्रकाशाची शोभा दिसते. अर्थात उत्तर ध्रुवबंधांत ती दिसत नाहीं. कारण सूर्य मध्यरात्रींहि क्षितीजावर वीतभर वर असतो. पण क्षितिज-संन्निध आलेल्या सूर्याचे मंद तांबडे किरण भोवती रेंगाळत असणाऱ्या पांढऱ्या ढगांतून परावर्तित होतात. तेव्हा फिकट तांबूस सोनेरी चकाकी सर्वत्र पसरलेली असते. एका उंचशा टेकडावर बसून रात्रीं १० ते ३ वाजेपर्यंत सूर्याचें क्षितिज–सन्निध भ्रमण मी पहात होतो. मध्यरात्रीं डाव्या हाताकडून उजव्या हाताकडे सूर्याची गति चाललेली होती. रात्रीच्या दहा वाजता तो क्षितिजापासून दोन विती उंच असावा. साडेअकरापर्यंत तो वीतभर खालीं

आला, व पाऊण वाजेपर्यंत क्षितिजाला लगटून तो पुढे पुढे चालत राहिला. यावेळी तो रक्त बिंबाधर होता. आमच्या समोर होता. त्याच्यापासून आमच्या दिशेने काहीं किरणझोत येत होते व त्यांच्यापुढे आलेल्या पांढऱ्या ढगांना तांबूस चकाकी देत होते. हें सर्व वर्णन मागे आलेंच आहे.

या वर्णनातून संशोधन शास्त्र काय सुचवतें तें आपल्याला आता पहायचें आहे. तें तपासून पहाण्यासाठी आपण फिनी भाषा व वंश यांचा पुढच्या भागांत विचार करूं.

◆ ◆ ◆

23028
230

: ५ :

फिन्लंडच्या भाषेंत व पुढे रशियन भाषेंतहि आम्हांला संस्कृत व संस्कृतसम असे पुष्कळ शब्द आढळले. कलकत्त्याच्या एका गृहस्थाने अशा शेकडो शब्दांची एक टिपणी तयार केलेली आहे. या शब्दांचें कुतुहल वाटून मी त्यांचा फावल्या वेळांत विचार करूं लागलो; आणि हे लोक कोण व मूळ कुठले, तसेंच त्यांची भाषा तरी कोणची व कोणच्या भाषा वंशाची? असे प्रश्न मनांत घोळूं लागले. या प्रश्नांना अनुलक्षून काहीं इंग्रज, फ्रेंच व जर्मन लेखकांनीं पुष्कळ संशोधन केले आहे. खुद्द फिनी वाङ्मयांतहि या संबंधीचे काहीं ग्रंथ आहेत. 'आर्यांचे मूळ वसतिस्थान' या आपल्या ग्रंथांत लो. टिळकांनीं काहीं उपपत्ति लावली आहे. ती प्रत्यक्षतः फिनी लोक व त्यांची भाषा यांना अनुलक्षून नसली तरी तिच्यांतून काहीं प्रमेयें सांपडतात.

फिनी पुरुष किमानपक्षी साडेपांच फूट उंचीचा व स्त्री ५ फू. १॥ इंच उंचीची आहे. उत्तरेकडे माणसें ठेंगणी व दक्षिणेकडे उंच आहेत. वर्ण उजळ व शुभ्र. स्त्री पुरुषांत भेद हा दिसतो की काळसर डोळ्याचे प्रमाण स्त्रियांत जास्त तर काळसर केसांचें प्रमाण पुरुषांत जास्त. इथेंहि आयुर्मयादा पुरुषापेक्षा स्त्रीचीच जास्त आहे. हल्लीचे फिनी लोक पूर्व बाल्टीक व नॉर्डीड या वंशाच्या मिश्रणाने झालेले आहेत, सामिक वंशाचेंहि काहीं मिश्रण आहे, असें सर्वसामान्य मत आहे. युरोपियन व स्कॅंडिनेव्हियन लोकांचा शेजार हजारो वर्षांपासूनचा असल्याने त्या दोन्ही लोकांच्या संस्कृतीची छाप फिनी लोकांवर पुष्कळच पडत गेली. शिवाय ११ व्या शतकांत त्यांनीं ख्रिस्ती धर्म अंगिकारल्यानंतर ही छाप अधिकाधिक घट्ट होत गेली. पण दुसऱ्या बाजूने रोमन चर्चकडून त्यांचा सतत छळ होत गेल्याने मार्टीन ल्यूथरच्या बंडाचा त्यांच्यावर प्रभाव पडला नि सारी फिनी जनता ल्यूथरच्या पंथांत

गेली. अर्थात् यामुळे संस्कृतिदृष्ट्या काहींच फरक पडण्याचें कारण नव्हते व तसा फरक पडलाहि नाही. तरीपण धार्मिक कडवेपणा जाऊन त्यांच्यांत सहिष्णुता आली. शेजारच्या या संस्कृतिप्रमाणे फिनी भाषेवरसुद्धा तिकडच्या भाषा व कला यांचा प्रभाव पडत गेला. तरी मूळ स्योमी ऊर्फ फिनी भाषा प्रकृतीने मृदू आहे. या भाषेंत मुळांतच व्यंजने कमी नि स्वरांचा वापर फार आहे. तोच तो स्वर लागोपाठ येतो व त्यामुळे अर्थ पण बदलतो. उदाहरणार्थ 'वाजा' शब्द पहा. Vaja वाजा म्हणजे छप्पर किंवा झोपडी; पण Vaaja वाऽजा म्हणजे पांचर व Vajaa वाजाऽ म्हणजे विरळ. इंग्रजी 'a' 'an' सारखे उपपद फिनी भाषेंत नाहीं नि आपल्यासारखे क्रियापदांचे लिंगभेदवाचक फरकहि नाहींत ( जसेः–मी **गेलो**, मी **गेले** ). तथापि संस्कृत भाषा–समुहाप्रमाणे ती ध्वनि ( उच्चार ) प्रधान भाषा आहे. थोड्या शब्दांत पुष्कळ अर्थ व्यक्त करण्यास ती समर्थ आहे. पण शब्द मात्र लांबलचक असतात.

फिनी भाषेंत सभोंवतालच्या पूर्व बाल्टिक व स्कँडिनेव्हियन देशांच्या विशेषतः स्वीडिश-भाषांचे अनेक शब्द मूळरूपांत वा अपभ्रंश व रूपांतरीत होऊन किंवा त्या भाषांतील मूळ क्रियापदांच्या धातूंपासून नव्या रूपाने सिद्ध होऊन वावरत असले तर ते स्वाभाविक आहे. अन्य भाषिकांशी व्यवहार करतांना वस्तूबरोबर शब्दांचीहि ये जा होतेच. कितीतरी फारसी व इंग्रजी शब्द आपल्या भाषेंत या पद्धतीने आले व कालांतराने समरस नि एकरूप झाले. याच न्यायाने शेकडो वर्षांचा शेजार, दळणवळण, समान धर्म, परकीयांचें प्रदीर्घकालीन वर्चस्व या सर्वांमुळे फिनी भाषेंत या भोंवतालच्या देशांतील रूढ भाषांचे शब्द आले असल्यास नवल नाहीं. पण या भाषेंत संस्कृतसारख्या अति दूरच्या भाषेतले शब्द नि भाषाविशेष कसे यावे याचें मात्र नवल वाटतें. फिन्लंडमध्यें वावरतांना असे कितीतरी शब्द कानीं पडत. त्यांचे ध्वनि व उच्चार परिचित वाटत इतकेच नव्हे तर त्यांचे अर्थहि पुष्कळदा समसमान असत. कित्येक शब्द संस्कृत शब्दासारखे वाटत. जसे– स्वार्नी, द्वे, त्रे. कित्येक शब्द शुद्ध संस्कृत नसले तरी रूपांतर पावल्यासारखे पण जवळचे वाटत. जसें **वदा** हा शब्द. याचा अर्थ पाणी हे कळल्यावर तर वदा या ध्वनि उच्चाराकडे खासच लक्ष वेधले जाई व मग मनांतल्या मनांत चौकशी सुरू होई. पाणी या मराठी शब्दाला संस्कृत शब्द **उदक**

हा आहे. आपल्याकडील कोंकणींत त्याचा उच्चार करतांना प्रादेशिक लकबीमुळे **द** दीर्घ होतो व **क** पायफोड्या होतो. म्हणजे संपूर्ण उच्चार **उदाक्** असा होतो. आपल्या अनेक देश्यभाषांत व बोलींत **उ** चा **व** होतो. (उंडगा- वडगा ओला-वला) या नात्याने **उदाक्** चा **वदाक्** होईल व लंगडा **क्** लोप पावेल. खुद्द मराठी भाषेच्या शब्दांतहि वऱ्हाडी, खान्देशी, पुणेरी व कोल्हापुरी धाटणीत अशी रूपांतरें होत असतात. या नात्याने **उदकचें उदाक्, वदाक्, वदा** असें रूप होणे संभाव्य दिसतें. रशियांत याच **वदाचा वदो** व झेक भाषेंत **वोदो** होतो. पण फार लांब कशाला; दक्षिण गुजराथच्या नरडा वगैरे काळी परज जातींत पाण्याला **वडो** म्हणतात. दुसरा शब्द कौला. याचा अर्थ हिंवताप. हिमालयाच्या पायथ्याशी हिंवतापाला कौल्ह म्हणतात. द्वे व त्रे आणि द्वा व त्रा हे दोन नि तीन या संख्यांचे वाचक शब्द अनुक्रमे फिनी व रशियन भाषांत प्रचलित आहेत. याच संख्यांचे दर्शक अशा संस्कृत भाषेंतल्या दहा अंकापर्यंतच्या शब्दांशी त्यांचें किती विलक्षण साम्य आहे पहा! मनुष्याच्या अगदी प्राथमिक गरजांचे वाचक असेच शब्द मी इथे नमुन्यासाठी घेतले आहेत. याचा खुलासा विचारला असता उसनवारीचे किंवा देण्याघेण्याच्या व्यवहारामुळे एका भाषेतून दुसऱ्या भाषेत काहीं शब्द जातात तसे हें आले असावेत असे उत्तर मिळाले. पण अधिक खोल जाऊन विचार करूं लागलो तर हे उत्तर समर्पक दिसत नाहीं हें स्पष्ट होईल. कारण राष्ट्राराष्ट्रांत देवघेव चालते ती प्रथम वस्तुवाचक व नंतर शास्त्र, कला व संस्कृतिवाचक असते. इंग्रजांकडून आम्हीं वस्तु घेतो, शास्त्र घेतो, सुधारणा घेतो, चित्र, ललित व नाट्यकलांची म्हणजे सांस्कृतिक अभिव्यक्तीची अंगोपांगे घेतो. तीं आमच्याजवळ नसतात किंवा आमच्यापेक्षां अधिक सरस असतात म्हणून घेतो, व तीं घेतांना त्यांची नांवें व अभिधानेहि घेतो. पण कोणालाहि दुसऱ्यांकडून पाणी घ्यावे लागत नाहीं. मानव मुळातच पाण्याजवळ वस्ती करून राहिला आहे. पाणी, इंधन व प्राथमिक संख्यागणती ही त्याच्या कसल्याहि सांस्कृतिक अवस्थेतली आत्यंतिक निकडीची-प्राथमिक गरज असल्यामुळे, किंवा त्या प्राथमिक सान्निध्याच्या व वापराच्या वस्तू असल्यामुळे, त्यांना व्यक्त करण्याचा ध्वन्योच्चार म्हणजे शब्द त्याने आपल्या वाङ्मय भांडारांत सर्व प्रथम निर्माण करायला हवा. म्हणून प्रत्येक भाषेंत वा

बोलीत-मग ती कितीहि मागासलेली व तुटपुंजी असो, असल्या या प्राथमिक अवस्थेचे वाचक शब्द तिच्यात असायचेच. एक दोन हे लहान संख्यावाचक शब्दसुद्धा असेच अतिप्राथमिक स्वरूपाचे म्हणजे मृगयावान् व मेंढपाल जीवनांतले असल्याने तेहि प्रत्येक बोलींत उपजतच उत्पन्न झालेले असतात. देवघेवीच्या व्यवहारांची ते वाट पहात बसत नाहींत. म्हणून असे हे शब्द देवघेवीच्या व्यवहारांतून आलेले उसनवारीचे ( Loan words ) शब्द असावेत असेच पुढे लेनिनग्राड येथेहि मिळालेले फिनी थाटाचे उत्तर मुळीच समर्पक नाहीं. अर्थात् **वदा, द्वे, त्रे, स्वार्ना**, औरस्वारा हे मुळातच फिनी भाषेचे असले पाहिजेत किंवा फिनी समाज या देशांत येऊन स्थिरावला तेव्हा, जेथून तो आला असेल तेथूनच येतांना त्याने ते शब्द आपल्या बरोबर आणले असले पाहिजेत हे उघड आहे. हे शब्द मुळांतच त्या भाषेचे आहेत असे म्हटलें तर त्या भाषेतले धातू संशोधिले पाहिजेत आणि हे धातू जर अन्य भाषेंतल्या तत्सम व तदर्थी धातूंशी जुळते दिसले तर त्या दोन भाषांत केव्हातरी नाते होते, निदान साम्य होते हे स्पष्ट होईल. वदो, द्वा, त्रा, प्रशस्त, ताम्रापात्रा, साखर या रशियन शब्दांनाहि हाच न्याय लागू पडेल.

आपल्या देशांतलेंच एक जुने उदाहरण देतो. महाल व पेटा या खालच्या मुलकी विभागाला ‘ परगणा ’ हें नांव आपल्याकडे चालू असे. प्रांगण या शब्दाचा तो अपभ्रंश होय असे कोणाला म्हणतां येईल. पण मग त्यावर असा प्रश्न उद्‌भवेल की हा अपभ्रंश कुठे झाला? जर तो या देशांतच झाला असेल तर का झाला व पुढे का लुप्त झाला याची कारण-मीमांसा करावी लागेल. शिवाय संस्कृतापासून भारतातच तो अपभ्रंश झाला असेल तर अन्यत्र तो शब्द असणार नाहीं. जर ही कारणपरंपरा सांगता आली नाहीं, व तो अन्य देशांत रूढ असलेला दिसला तर एकतर हा शब्द अन्य भाषेचा असावा, तो अपभ्रंश भारताऐवजीं त्या अन्य देशांत झालेला असावा, आणि भारतांत तो केवळ परकी शब्दांसारखाच वापरला गेला असावा हे कबूल करावे लागेल. आणखी दुसरीहि एक गोष्ट पत्करावी लागेल ती ही, की संस्कृत भाषा भारतोत्पन्न नसून बाहेरून ती इथे आली असली पाहिजे. ही चौकशी आपण पुढे करणारच आहो. पण जर परगणा हा पूर्ण सिद्धशब्द विशिष्ट काळांतच व विशिष्ट अर्थानेच इथे

आला असेल तर त्या कालकारणानुरोधानेच त्याचा प्रथम विचार करणें योग्य होईल. ‘ परगणा ’ हा शब्द जमाबंदी कारभाराचा एक मुलकी घटक या अर्थाने आपल्याकडे परिचित व रूढ झाला तो मोंगल आमदानींत होय. मोंगलसत्तेचा संस्थापक बाबर हा समरकंदनजिकच्या एका खेड्यांत जन्मला. त्या खेड्याचें नांव ‘ फरगाना ’ असें आहे. शब्द ताझिकी आहे. बाबरने भारतांत राज्य स्थापल्यावर जमाबंदी खात्याची जी मांडणी केली तिच्यांत मुलकी कारभाराचा घटक यास ‘ फरगाना ’ हें नांव योजले जाऊं लागलें. ‘ फरगाना ’ चा अपभ्रंश ‘ परगणा ’ असा आपल्याकडे झाला. परगणे अमुक अमुक असे लिहिले जाऊं लागलें. मोंगल–मुसलमानी असे बरेच शब्द मराठी राज्यांतहि रेंगाळत राहिले. पण आंग्लाईमधे ते हळुहळू लुप्त होऊं लागले व आता तर ते गेलेच. उसनवारीच्या पुष्कळ शब्दाचें जगभर असेच होतें. भाषा व संस्कृतीच्या ( राष्ट्रीयत्वाच्या ) पुनरुत्थानांत ते लुप्त होतात व नवे देश्य शब्द उदयाला येतात. कारण उसनवारीचे शब्द विशिष्ट प्रयोजनवाचक असतात. पाणी, एक, दोन, हे शब्द तसे आहेत का ? फिनी भाषेच्या पुनरुत्थानांतहि ते टिकून आहेत, कारण क्रयविक्रयापेक्षा आधिक व्यापक जीवनमूल्यांचे ते द्योतक आहेत व म्हणूनच ते तिथे टिकून आहेत, हेच या विधानाचें समर्थन आहे.

फिनी भाषेंत संस्कृत वा संस्कृतसम शब्दांचा भरणा तर आहेच. रशियन भाषेंत तर तो अधिकच आहे. पण फिनी भाषेंत दुसरा एक विशेष हा आहे की तिच्यांत विसर्ग वा विसर्गसदृश उच्चार आढळतात. रूसी भाषेत ते आढळत नाहींत. संस्कृत भाषेशिवाय विसर्ग कुठेहि नाहीं. ग्रीक व लॅटीनमधे तो गेला आहे; पण तिथे त्याचा स व ह झालेला आहे. पण फिनी भाषेंत तो मूळ रूपांत ऐकू येतो. अर्थात् फिनी भाषेचा विचार करतांना या विसर्गसदृश उच्चार-विशेषाचाहि विचार केला पाहिजे व धातूहि संशोधिले पाहिजेत.

मग फिनी भाषेंत हे शब्द कुठून आले असतील ? फिनी लोकांच्या वंशशोधनांत आतापर्यंत तीन सिद्धान्त व्यक्त झाले आहेत. पहिला सिद्धांत असा कीं ते इंडो युरोपियन वंशाचे होत. पुढे हा सिद्धांत त्याज्य ठरून दुसरा सिद्धांत हा उदयाला आला, की कोणत्याहि वंशगटापासून त्यांची

उत्पत्ति झाली नसून फिनी वंश हा स्वतंत्र गट आहे. अधिकाधिक संशोधनानंतर हा सिद्धान्तहि लटका पडला व आता आजच्या संशोधकांची अद्यावत कल्पना अशी झाली आहे, की मूळ एक युग्रेलीफ अथवा उग्रेलियन वंशशाखा पूर्वेकडून ( म्हणजेच युरेशियांतून ) पश्चिमेकडे भ्रमण करीत निघाली व दक्षिण फिन्लंडमधे येऊन स्थीर झाली. फिनो-युग्रीफ वंश तो हाच. म्हणजे आजच्या फिनी लोकांची मूळ वंश शाखा फिन्लंडची नसून ती रशियाकडून आलेली आहे. या वंशशाखेचे लोक इथे आले तेव्हा ते मेंढपाल व मृगयावान् अवस्थेत होते. अर्थात् पाणी व इंधनच नव्हे तर लघुसंख्याज्ञान या अवस्थेत सिद्ध झालेले असतें. फिन्लंडमधे आल्यावर मूळच्या नॉर्डिक लोकांना त्यांनीं हुसकावून लावलें व त्यांच्या जमिनी बळकावल्या. तेव्हा हिमोत्तर दहा हजार वर्षांपासून फिन्लंडचा जो उत्तर ध्रुवबंधांतला भाग निर्मनुष्य होऊन ओसाड पडला होता त्यांत या नॉर्डिक लोकांनीं प्रवेश केला. आज या भागांत नॉर्डिक लोकांची वस्ती अगदीच विरळ—थोडी आहे. दोनशे चाळीस मैल लांबीच्या व साठसत्तर मैल रुंदीच्या त्या प्रदेशांत नॉर्डिक वंशाची वस्ती फक्त २५०० ची आहे. शारीरशास्त्रदृष्ट्या ते फिनी लोकांहून भिन्न आहेत. दक्षिण फिन्लंडमधून या युग्रीफ वंशांतले काहीं लोक बाल्टिक मार्गाने मध्य युरोपकडे गेले व तिथल्या लोकांत संमिश्र बनूं लागले. पूर्वेकडून येतानाच ते विभक्तिसाधित भाषा बरोबर घेऊन आले होते. ( विसर्ग, वदा, द्वे, त्रे हे शब्दहि त्यांनीं तिकडूनच आणले असतील का ? ) इथे राहून जसा त्यांचा रक्तसंकर घडला तसाच संकर आणलेल्या भाषेचाहि झाला असावा व सततच्या नि दीर्घकालीन संकरामुळे मूळचे रूप पालटून तिला आजचे रूप प्राप्त झाले असावें, हे तर्कसुलभ वाटतें. ही मूळ भाषा कोणची व मूळ युग्रीफ वंश तरी कुठला ? कोणाचा कोण ? याची अधिक प्रमाण व साधार चौकशी झाली पाहिजे; अजून ती व्हायची आहे. भारतीय भाषाशास्त्रज्ञांना या कामी बरीच कामगिरी करता येण्यासारखी आहे.

फिनी संशोधकांकडून आपल्याला आत्तापर्यंत पांच महत्त्वाच्या गोष्टी कळल्या आहेत:—( १ ) ताम्पेरी उत्खननांत असे आढळून आले की तिथले बर्फमिश्र दगड अति पुरातन म्हणजे १४०० दश लक्ष वर्षांपूर्वीचे असून त्याकाळीं तिथे जीवसृष्टी नांदत असावी. ( २ ) ताम्पेरीच्या उत्तरेला

म्हणजे उत्तरध्रुव प्रदेशांत अनेकदा हिमसंपात व धरणीकंपादि प्रकार होऊन मोठाले फरक घडून आले नि जीवसृष्टी नष्ट झाली. ( ३ ) यांतला शेवटचा हिमसंपात व सृष्ट्य प्रलय होऊन गेल्यावर हिमोत्तर काळ सुरू झाला. यांत तो प्रदेश अतिथंड बनून दहा हजार वर्षांपूर्वी तिथली मानव वस्ती पांगली. हे हिमवर्षण व सृष्ट्य प्रलय ( earth quake ) फार दीर्घकाल चालत असावे. या काळांत जमिन होती तिथे पाणी झालें. जमिनीवर नवे शेकडो हजारो फुटांचे बर्फमिश्र थर माजले. पूर्वीच्या समशीतोष्ण हवेत अमूलाग्र बदल होऊन मनुष्य वस्तीसाठी तो प्रदेश सर्वथा असह्य बनला. ( ४ ) आजची फिनी ही त्रिसंकर प्रजा ज्या फिनोयुग्रीफ वंशगटापासून निर्माण झाली त्या गटाचा मूळ वंश उग्रालियन हा होय. तो पूर्वेकडून फिन्लंडकडे आला. ( ५ ) तिथून येतांना तो विभक्तिसाधित भाषा घेऊन आला.

फिनी संशोधकांच्या या महत्त्वाच्या विधानांचा विचार करायचा तर आपल्याला चौकशीच्या क्षेत्राचा विस्तार करावा लागेल. कारण, वरच्या पांच विधानांपैकी तीन प्रत्यक्षपणे उत्तरध्रुव प्रदेशाला लागू आहेत. म्हणून या प्रदेशाचा विस्तार किती हे आधीं पाहिले पाहिजे. हा विस्तार उत्तर ध्रुवबिंदूपासून साडे तेवीस अंश विस्तारांतला सर्व प्रदेश होय. ध्रुवप्रदेशाची सीमारेषा शास्त्रज्ञ ७० अक्षांशावर मानतात. ( गणिताने ती ६८ अक्षांशा-वर येईल ) व त्यांत कॅनडाच्या उत्तरेच्या ग्रीनलँडपासून स्कँडिनेवियाचा म्हणजे नॉर्वे, स्वीडन व फिनलँडच्या उत्तरेचा $\frac{1}{3}$ प्रदेश तसेंच रशियांतील सैबेरियाचा उत्तर भाग असा सर्व अर्ध अंडाकृती भाग येतो. यांतला बराचसा भाग आज आर्क्टिक, बेरेन्त व कारा या समुद्रांनीं व्यापलेला आहे. तिथे मागल्या हिमवर्षणापूर्वी सैबेरियाला जोडून मोठा भूखंड होता. हवा समशितोष्ण म्हणजे थंड उन्हाळा नि उष्ण हिंवाळा असल्याने तो प्रदेश वनस्पती, पक्षी, फुलें, चौखूर प्राणी यांनीं विपुल असा आल्हाददायी प्रदेश होता. ऋग्वेदाच्या प्राचीन ऋचांनीं आणि पारशांच्या अवेस्ता या धर्मग्रंथाने देवाचें नंदनवन असे त्याचें वर्णन केलें आहे. कॅनन टेलर, डॉ. वॉरन वगैरे संशोधकांनींहि या प्रदेशाला Paradise म्हणजे नंदनवन या नांवानेच संबोधिलें आहे.

हा हिमसंपात काहीं एक-दोन वर्षांचा नव्हता. शेकडो वर्षे तो चालू होता. उत्तरध्रुवाचा अखंड भूप्रदेश त्याने व्यापून टाकला होता. फिन्लंडच्या उत्तरेला स्पिट्सबर्जन नांवाचे व सैबेरियाच्या ( राशिया ) उत्तरेला स्वर्नाया झेल्म्या या नांवाचें अशी दोन बेटें हल्ली दिसतात. तिथे पूर्वी दोन मोठे पर्वत होते. यांतल्या स्वर्नाया झेल्म्या बेटाचा पर्वत हाच भारतीयांच्या प्राचीन ग्रंथांत उल्लेखिलेला मेरू पर्वत होय असें लो. टिळक यांचें मत आहे. अर्थात त्याच्यासमोर जवळजवळ समांतर असलेलें स्पीट्सबर्जन बेट हा प्राचीन मांदार पर्वत असेल का ? हिम प्रलयांत या भूखंडाच्या ठिकाणी समुद्र होऊन भूपृष्ठाखाली जी प्रचंड खळबळ होत होती, तिच्यामुळे जमिनीचा गाळ किनाऱ्यालगत लांबवर पसरला व त्यांत हिमकण मिसळून त्याचे शेकडो व हजारो फूट उंचीचे थर माजले, इतकेच नव्हे तर त्यांनीं उत्तर युरोपापासून सैबेरियापर्यंतचा विस्तृत प्रदेश व्यापून टाकला. ताम्पेरीला डोंगर दिसले ते या प्रकाराने बनलेले आहेत. ग्रीन लँडवर वनस्पती उगवणे व मनुष्यवस्ती स्थिरावणे अजूनहि दुरापास्त आहे. हिमवर्षणाचा शेकडो वर्षांचा काळ संपून हिमोत्तर काल सुरू झाला तेव्हा तिथे हिमप्रवाह तयार झाले. आल्प्स पर्वताच्या दऱ्यांत तसेच फिन्लंड सैबेरियादि ध्रुवबंधाच्या समीपच्या प्रदेशांत हिमनद्यांचा अचपळ संचार आजहि चालू आहे. त्यांच्या धारेवरचा होड्या वल्हाविण्याचा खेळ, त्यांत सांपडणारे सुवर्णकण नि सोलमन मासे आपण मागे पाहिलेच आहेत. इंग्लंड, उत्तर जर्मनी व मॉस्कोचा उत्तर प्रदेश इथपर्यंतचा सर्व उत्तर युरोप खंड—नव्हे त्याहि पलीकडे थेट उरलपर्यंतचा सर्व विस्तीर्ण भूखंड त्या हिमाने व्यापून टाकला. वॉरनचें असे मत आहे की असे हिमप्रलय निदान दोनदा तरी झाले. पण अधिकाधिक संशोधनानंतर आधुनिक फिनी भूस्तरशास्त्रज्ञांच्या मताप्रमाणे असे हिमप्रलय अनेकदा झाले आहेत. हेंच मत अधिक योग्य दिसतें.

ताम्पेरीनजीकचे खडक तर या ज्ञात प्रलयकालाच्याहि फार फार पूर्वीचे आहेत. चौदाशे दशलक्ष वर्षांपूर्वीचे ते असावेत असा फिनी भूस्तरवेत्त्यांचा अंदाज आहे. भारतीय गणनापद्धतीने चौदाशे मिलियन म्हणजे १ अब्ज ४० कोटी वर्षे होतात. त्या खडकांत नंतर जीवसृष्टि नांदत असावी असें अनुमान, या शास्त्रज्ञांना तिथे जे अवशेष सांपडले त्यावरून, तसेच या

खडकांचें रसायनिक पृथक्करण करून जें द्रव्य सापडलें, त्यावरून केलें आहे. भारतीय गणितींनीं सृष्टीच्या उत्पत्तीची जी कालगणना केली आहे तिच्यावरून आपण श्वेतवाराह कल्पाच्या सातव्या मन्वन्तरातील अठ्ठाविसाव्या युगाच्या म्हणजे कलियुगाच्या प्रथम चरणांतल्या ५०५८ व्या वर्षांत आहों असें पंचांगावरून दिसतें. हीं दोन अब्जावर वर्षें होतात. फिनी भूस्तर-शास्त्रज्ञांच्या संशोधनाप्रमाणे ताम्पेरीच्या खडकांचें आयुर्मान १ अब्ज ४० कोटी वर्षांपूर्वींचें आहे. यावरून भारतीय पंचांगकारांची ही कालगणना सहज हंसून काढण्यासारखी सोमपानाच्या धुंदींतली तरल कल्पना नसून तिला काहीं तरी अधिक घट्ट बैठक खास आहे हें लक्षांत येईल.

जीव सृष्टीची नि मानवाचीहि उत्पत्ति अतिप्राचीन आहे या कल्पनेचा पाठपुरावा करणारा आणखी एक पुरावा हा मजकूर छापला जात असतांना उपलब्ध झाला आहे तो इथें मांडतो. त्यावरून ताम्पेरीविषयक विधानाला पुष्टि मिळेल. तसेंच जीवोत्पत्तीच्या कालनिर्णयालासुद्धा मदत होईल; शिवाय डार्विनपासूनच्या आधुनिक जीव शास्त्रज्ञांनी मानवाच्या पूर्वजासंबंधीं मांडलेला सिद्धांत खोटा ठरून भारतीयांच्या ( आर्यांच्या ) दशावताराच्या कल्पनेला नव्यानें उजाळा मिळेल. नुकतीच म्हणजे दि. १५ ते १७ डिसेंबर १९५७ रोजीं दिल्ली येथे कै. सरदार पटेल यांच्या स्मृत्यर्थ जागतिक कीर्तीचे जीव-शास्त्रज्ञ प्रो. हालडेन यांनी ‘ जीवकोटींतील एकात्मता व विविधात्मता ’ या विषयावर तीन व्याख्याने दिलीं. यांतल्या पहिल्या भाषणांत त्यांनी उत्क्रान्तीच्या सिधान्तांचें विवरण केले; व त्यांत माकडापासून मानवाची उत्क्रान्ति झाली या डार्वीनपासून आत्तापर्यंत चालत आलेल्या सिद्धांताचें खंडन करून हिंदुतत्त्ववेत्त्यांच्या मत्स्यापासून चतुस्पाद व आधुनिक मानव उत्क्रान्त झाला या सिद्धांताचें समर्थन केलें.

प्रो. हालडेन यांचा या विषयाचा साठ वर्षांचा दीर्घ व्यासंग, प्रगाढ पांडित्य व शंकातीत अधिकार लक्षांत घेतला म्हणजे त्यांच्या विधानांना किती महत्त्व प्राप्त होतें तें लक्षांत येईल. जगाची उत्पत्ति दहा हजार वर्षांतली ही ख्रिस्ती व इस्लामी धर्मांतली कल्पना त्यांनी त्याज्य ठरविली, व ती कोटी कोटी वर्षांइतकी प्राचीन असल्याचें मत प्रतिपादन केलें. या जीव कोटींतली पहिली ज्ञात जात मासा ही असून तिचा काळ ३५ ते ४० कोटी

वर्षांइतका ते प्राचीन मानतात. याच क्रमाने मत्स्यापासून मानवापर्यंतची उत्क्रान्ति केव्हां व कोणच्या क्रमाने झाली हें विशद करतांना त्यांनी हिंदु-पुराणांतील विष्णूच्या दशावतार कल्पनेचा हवाला दिला आहे. ते म्हणतात : सर्व जीव सृष्टि:—मासा, पक्षी, चतुष्पाद, द्विपाद व आधुनिक पूर्ण मानव यांची उत्क्रांति एकाच पूर्वजापासून झाली असून हा पूर्वज म्हणजे मत्स्य होय, माकड नव्हे. या उत्क्रांतीचे टप्पे हिंदूंच्या अवतार कल्पनेने सामान्यपणे व्यक्त होतात. हे टप्पे असे आहेत :

| | | |
|---|---|---|
| (१) अनेक पंखाचे मासे<br>( Fish with many paired fins ) | = | काळ ३५ कोटी पूर्व वर्ष<br>हा **मत्स्यावतार** |
| (२) सरपटणारा व पोहणारा<br>(Reptile) | = | २५ कोटी वर्ष पूर्व<br>हा **कूर्मावतार** |
| (३) अजस्र चतुष्पाद<br>( Four legged mammels resembling Bears) | = | ६ कोटी वर्ष पूर्व<br>हा **वराहावतार** |
| (४) सिंहमुखी मानव सदृश<br>( Human character like Narasinha ) | = | दीड कोटी वर्ष पूर्व<br>हा **नृसिंहावतार** |
| (५) उभा ठेंगू मानवरूप<br>( Dwarf, erect, much more like men ) | = | दहा लक्ष वर्ष पूर्व<br>हा **वामनावतार** |

या नंतरच्या आजचा पूर्ण मानव ( परशरामावतार ) प्रो. हालडेन यांनी उत्क्रांतीचा एकेक टप्पा वरीलप्रमाणे विष्णूच्या अवतार कल्पनेंत बसवून मांडला.

ताम्पेरीच्या उत्खननांत जीव–कोटीचें प्राचीनत्व दिसून आलें त्याला वरील विवेचनानें काल निश्चिति, निदान अंदाज, काहीं प्रमाणांत तरी प्राप्त होतात. तसेंच मानव केव्हा उत्क्रान्त झाला असेल याची स्थूल कल्पना या विवेचनांतून मिळतें. असे जरी असलें तरी त्या जीवकोटीची व मानवाची अखंड व एकधारी वाढ तेव्हापासून सतत होत राहिली असेल असे मात्र नाहीं. कारण त्यानंतर पुनः पुन्हा प्रलय होऊन त्यांत त्यांचा लय होत गेला

असेल, म्हणजे तत्कालीन अवस्थेंत उत्पादनाची जी साधनें त्याने अवगत केली असतील, जीवन व्यवहाराची जी काहीं घडी बसाविली असेल व कसली तरी संस्कृति सिद्ध केली असेल ती मोहेंजोदरो व हरीआप्पा संस्कृतीप्रमाणे नष्ट होऊन स्वतः तोहि नष्ट झाला असेल किंवा परागंदा झाला असेल. असा प्रलय होऊन गेल्यावर प्रलयोत्तर काळांत पुन्हा उद्धीज व जीवसृष्टीचें विकसन होऊन मानव जीवन नव्याने सुरू झाले असेल. उत्पत्ति आणि लय यांचा असा प्रलयांतकारी खेळ कितीदा तरी झाला असावा. या क्रमाने शेवटच्या हिमप्रलयानंतर उत्तरध्रुव प्रदेशाच्या वरच्या भागांत समुद्र ( कारा, बेरेंत व आर्क्टीक ) पसरला आणि अतिबर्फ नि अतिथंडी यामुळे खालच्या भागाकडे मानव आला व तिथे जीवन विकसित झालें. येथपासून पुढे हा विकास मोठासा अडथळा न येता सतत चालू राहिला.

फिन्लंडच्या उत्तरेला दहा हजार वर्षांपूर्वी जी मानवकोटी नांदत होती तिचें पुढे काय झाले ? फिनी शास्त्रज्ञ म्हणतात, तिचा साधार मागोवा सापडत नाहीं. कॅनन टेलर म्हणतो, ते बाल्टीक व मध्ययुरोपांत आले व तिथल्या बास्क आदि लोकांत मिसळून गेले. फिन्लंडच्या उत्तरेप्रमाणेच सैबेरियाच्या उत्तर भागांतहि याच पूर्व पाषाणयुगांत मानवी सृष्टि विकसित झाली होती. सैबेरियाचें उत्तर टोक तुंद्रस. (हा नामोच्चार ध्वनि लक्षांत ठेवण्यासारखा आहे.) या तुंद्रसहून वोल्गाच्या किनाऱ्याने हे मानव गटागटाने खालीं उरलकडे आले असे मानायला पुष्कळच कारणें आहेत. मूळ आर्यवंशाचे पूर्वज ते हेच होते हे आता बहुधा सर्वमान्य झालें आहे. प्रो. ऱ्हीस यांनींहि सेल्टिक व ट्यूटोनिक पुराणांच्या आधाराने हेच अनुमान काढले आहे. कॅनन टेलरच्या मताने आर्यभाषा इथेच उत्पन्न झाली. लो. टिळक हे पूर्व पाषाणयुग दोन हजार वर्षं मागे नेतात. पण कालगणनेतला हा फरक सोडला तर ऋग्वेदांतील तसेंच अवेस्तांतील प्रमाणांवरून त्यांनींहि वरील संशोधकांसारखाच निष्कर्ष काढला आहे. राहूल सांकृत्यायन पाषाणयुग—आरंभकाल दहा हजार वर्षांपूर्वीचाच धरतात. यामुळे टिळकांच्या गणनेला एकपरीने दुजोराच मिळतो.

फिनी संशोधकांच्या चवथ्या प्रमेयाशीं आतां आपण येऊन ठेपलों. तो मुद्दा हाः—आजची फिनी ही त्रिसंकर प्रजा ज्या फिनो-युग्रीक वंशगटापासून झाली, त्या गटाचा मूळवंश उग्रालियन हा असून तो पूर्वेकडून

फिन्लंडमधे आला. फिन्लंडच्या पूर्व सरहद्दीशी अफाट रशिया लगटलेला आहे. हेल्सिंकीहून लेनिनग्राडला आगगाडी आहे. हेल्सिंकी व लेनिनग्राड अगदी समोरासमोर समरेषेवर म्हणजे ६० अक्षांशावर वसलेलीं आहेत. पूर्वेकडून फिन्लंडला यायचे तर फक्त याच देशांतून येता येईल. अर्थात् पूर्वेकडून म्हणजे रशियांतून उग्रालियन वंश पश्चिम दिशेने निघाला व फिनो-युग्रीक या नांवाने तो फिन्लंडमधे जाऊन पोंचला. 'अन्' हा प्रत्यय लावून उग्रालियन हें इंग्रजी नांव बनलेलें आहे. हा प्रत्यय लागतांना लचा इकारांत ली होतो. जसे:—विलसन्–विलसोनियन्; एलफिन्स्टन्–एलफिन्स्टोनियन्; मायसोर – मायसोरियन्. अर्थात् उग्रालियन् या विशेषणवाचक संज्ञेचें सामान्यनाम उग्राल असे होईल. या नांवाचें उराल – उरल या नांवाशी विलक्षण साम्य आहे. उरलपर्वत पूर्वेलाच असून त्याच्या खोऱ्यांतल्या विमान-तळाचें नांव उराल्स्की असें आहे. आपण या पर्वताला इंग्रजी पद्धतीने उरल म्हणतों, पण रशियांत त्याचा उराल असाच उच्चार आहे. या न्यायाने उग्रालियन याचा अर्थ उग्राल — उराल — उरलकडचा असा होतो. महाभारतांत कौरवांच्या पक्षाला उत्तरेकडून आलेले उग्र लोक होते याची इथे आठवण होते. यांचा या उग्रालशी काहीं संबंध असेल का? याच उरलशी दहा बारा हजार वर्षांच्या सुमाराला उत्तर ध्रुवाकडून आलेले लोक रहात होते, व ते सर्व आर्य गटाचे होते. पण आर्य आले तेव्हा इथे त्यांच्याशिवायची मानववस्ती नव्हतीच का? याचें उत्तर नकारार्थी देत येणार नाहीं; उलट ते होकारार्थींच द्यावे लागेल. आज या भागांत कझाग लोक राहतात. पलीकडे किरगीझ, मंगोल वगैरे राहतात. हे वंश प्राचीन असल्याने त्यांचे पूर्वज किंवा अन्य लोक तेव्हा तिथे रहात असणे शक्यच आहे. आर्यांच्या असुरांशी झालेल्या लढायांवरून अन्य लोक तिथे होते हेंच सूचित होतें. म्हणून उग्रालियन या भागांतून गेले तेवढ्यावरूनच काहीं ते आर्यगटाचे ठरत नाहींत असें म्हणता येईल. पण आपला सध्याचा मुद्दा एवढाच आहे की ते आर्य असोत वा आर्येतर असोत, आर्य ज्या उरल भागांत रहात होते त्या भागाकडून ते गेले. बहुधा ते वोल्गा ओलांडून लट्व्हिया; इस्तोनिया या मार्गाने गेले असतील किंवा पोलंडमधून गेले असतील. कारण ते फिन्लंडच्या दक्षिण किनाऱ्याला पोचले होते हें तर

निश्चित आहे. विशेष म्हणजे जातांना ते विभक्ति-विशिष्ट भाषा घेऊन गेले होते हें पांचव्या मुद्यांत स्पष्टच आहे. लट्व्हियाचे लोक स्वतःला आर्योत्पन्न मानतात.

वंशांचा राष्ट्रवाचक विचार आधुनिक जीवनांत ज्या पद्धतीने होतो त्या पद्धतीने फिनो-यूग्रीफ वंशाचा विचार करता येणार नाहीं. कारण, मुख्य म्हणजे त्या काळी त्यांचे जीवन स्थिर नव्हते. भटकेपणामुळे त्यांना विशिष्ट अशी भूमि नव्हती. म्हणून स्थिर समाज व विशिष्ट भूमि यांच्या दृष्टीने विचार होणे शक्यच नाहीं. भटकेपणामुळे संकरहि सुलभ होता. सातत्य भावनेचा उदय कृषीजीवन दृढावून कुटुंबसंस्था स्थिर झाल्यानंतरचा असल्याने तोहि निकष त्यांना लावता येणार नाहीं. त्या अवस्थेत संस्कृतीहि नाहींच. असे असलें तरी दोन निर्णायक गोष्टी आपल्याला उपलब्ध आहेत. त्या म्हणजे भाषा नि शारीर. त्यांच्या अनुरोधाने विचार करून आपल्याला काहींसा निष्कर्ष काढता येईल.

उरलकडून उग्राल वंशाचें पश्चिमेकडे भ्रमण सुरू झालें तो प्रारंभाचा पाषाणकाल ( early stone-age ) होता असा उल्लेख मागे आला आहे. या काळी ते लोक मृगयावान् होते. यामुळे त्यांच्याजवळ आयुधें होतीं. त्यांच्या बळावर त्यांनीं फिन्लंडमधील रानटी लोकांना हुसकावून लावून त्यांच्या जमिनी बळकावल्या. मृगयेबरोबर मेंढपाल जीवनहि सुरू झाले होतें. या अवस्थेत भाषा व संख्यागणना यांची प्राथमिक सिद्धि झालेली असते. अर्थात् उग्रालवंश जेव्हा भ्रमण करीत निघाला तेव्हा त्याच अवस्थेत जे इतर लोक उरलशी रहात होते त्यांनीं कोणची तरी एक भाषा सिद्ध केलेली होतीच; इतकेच नव्हे तर ती विभक्ति मंडित होती. तीच भाषा घेऊन तो वंश निघाला. टेलर याने उरलपासून आलताईपर्यंतच्या सर्व लोकांच्या भाषांचा अभ्यास केला असून तो म्हणतो पूर्व पाषाणयुगाच्या अंतीं फिन्लंड-मधील एका जातीचे लोक मध्य युरोपांत आले. ( हिमप्रलयामुळे १०,००० ते ९५०० वर्षांपूर्वी फिनलंडमधून निघून गेलेले लोक ते हेच ) त्यांची मागसलेली भाषा व बास्क भाषा या बऱ्याचशा एकरूप आहेत ...... पुढे कालांतराने मेंढपाल अवस्थेंतले फिनो–यूग्रीफ लोक मध्य यूरोपांत आले व तिथे त्यांनीं विभक्ति विशिष्ट आर्य भाषा निर्माण केली. यावरून या एकंदर

प्रश्नाचा उलगडा असा होईल, की उरल भागांत आर्य व आर्येतर टोळ्या दहा हजार वर्षांच्या सुमाराला रहात असल्या तरी ज्या अर्थी उग्रालियन लोक विभक्तिसाधित आर्य भाषा घेऊन गेलेले आहेत त्या अर्थी त्यांचा संबंध आर्य भाषाभाषी लोकांशी पोंहोचतो हें स्पष्ट दिसतें. याच उरल भागांतून निघून गेलेले व इंडो-यूरोपियन, इंडो-स्लाव्ह, इंडो-इराणी, इंडो-आर्यन वगैरे नामाभिधानाने पुढच्या काळांत ख्यातनाम झालेले वंशगट हे सर्व याच आर्य भाषाभाषी वंशाचे होत. जिकडे ते गेले तिकडे कालांतराने त्यांचे वांशिक व भाषिक संकर होत गेले. इतके, की त्या भाषा एकमेकींना परक्या ठरल्या. तरी पण त्यांच्या भाषांत अनेक शब्द मूळ आर्य भाषेंतले रूपांतरित झालेले अजून टिकून आहेत तर काहीं जवळजवळ त्याच मूळ रूपांत आहेत. उदाहरणार्थ हेटाईट भाषेंत म्हणून अशा भाषांचे मूळ तपासले पाहिजे.

राहूल सांकृत्यायन या आर्य भाषाभाषी लोकांना शतवंश या नांवाने संबोधितात. याच वंशांतून पुढे क्रमाक्रमाने व टप्प्याटप्प्याने वर उल्लेखिलेले वंशगट विभक्त होऊन दाही दिशांना लागले. सूर्य, चंद्र, शेष आदि वंश ते या शतवंशापैकीच असावे. यांतल्या नागांची शंभर कुळें असून ती कश्यप म्हणजे कॅस्पियन समुद्रापलीकडून तक्षशीला, काश्मीर, सिंधू व तिथून मथुरा या प्रदेशातून पाताळांत म्हणजे दक्षिणेकडे उतरलीं. (या नागवंशाचे हेति वंशाशी काहीं साधर्म्य दिसते) कश्यप समुद्रापलीकडील प्रदेश म्हणजेच नैऋत्येकडचें वोल्गा नदीचे पूर्व पश्चिम खोरें. आर्य हे मूळ त्या भागातून उत्तर कुरु मार्गाने भारतांत आले. उत्तर कुरूंत येतानाच त्रैवर्णिक सिद्ध झालेले होते, व इथे आर्यांचे सुप्रसिद्ध चातुर्वर्ण्य उत्पन्न झाले. वैराज्य ही राज्य-पद्धतीहि तिथेच सिद्ध झाली असे मत इतिहासाचार्य राजवाडे यांनीं रा. मा. वि. चंपूच्या प्रस्तावनेत मांडलें आहे. या विरुद्ध काहीं विचारकांचे मत असे आहे, कीं आर्य हे मूळचे भारतांतलेच असून त्यांची संस्कृत भाषा इथेच उत्पन्न झाली. पण हें मत पत्करलें तर अनेक आपत्ती उत्पन्न होतात. त्यांचा निरास या भारतवाद्यांना करता आलेला नाहीं. पं. बाळशास्त्री हरिदास यांनीं एक तृतीय पंथ मांडला आहे. भारतवादाचे त्यांनी समर्थन केले. पण त्यांतल्या आपत्ती व टिळक-मत-विरोध टाळण्यासाठी त्या मताला त्यांनी अशी पुस्ती जोडली की आर्य मूळ इथले हे तर खरेच; पण वसाहत

करण्यासाठी ते उत्तरध्रुव प्रदेशांत गेले आणि मग हिमप्रलय झाल्याने तिकडून दहा हजार वर्षांपूर्वी पुन्हा परत आले. यात दोन्ही अर्थ साधले. भारतवाद्यांचाहि बोज राखला गेला अन् टिळक मताचाहि आदर केला गेला! पण प्राग विद्यापीठाचे विश्वविख्यात संशोधक व प्राच्य भाषा विशारद डॉ. बेद्रीश ऱ्होझनी यांच्या संशोधनामुळे या वादावर पडदा पडावा. आर्यांचे मूलस्थान कॅस्पियन समुद्राचा आसमंत प्रदेश हेंच असून तिथून सर्व प्रथम आर्यांचा इंडो-युरोपीय गट युरोपकडे गेला. कालांतराने तो दक्षिण अमेरिकेंत पोंचला ( माया व इंगस संस्कृति तिथे सिद्ध झाल्या ) यातले सर्वांत आधी बाहेर पडले ते हेतिवंशीय होत. मार्गक्रमणांत त्यांच्या अनेक टोळ्या पडल्या व त्या तुर्कस्तान, ॲसीरिया, इजिप्त, बाबिलोनिया, इराक या भागांत जाऊन राहिल्या. तिथे अन्य भाषिकांच्या मिश्रणांतून नवी संस्कृति व साम्राज्यें उदयाला आलीं. मूलस्थान या प्रदेशाच्या नैऋत्येकडे असल्याने त्याची स्मृति टिकून रहावी म्हणून नैऋत्येला एक निसर्ग देवता ( The god of Nature ‘ Ninurta ’ ) नैऋत्य देवता कल्पून तिची स्तवने तयार केलीं. त्यांची हेती भाषा कॅस्पियन-कॉकेशस-प्रदेशीय भाषा-वंशाची आहे असे मत डॉ. ऱ्होझनी यांनीं मांडलें आहे. ( या भाषेंतल्या पुराण वाङ्मयांतल्या काहीं कल्पना व शब्द भारतीय पुराणांतल्या कल्पना व शब्द यांशी सदृश आहेत ) आर्यांना डॉ. ऱ्होझनी यांनी अश्वपालक म्हटलें आहे.

आर्यांचा दुसरा गट इराणांत स्थिरावला. या क्रमाने आर्यांच्या टोळ्या काश्मीर, चित्रल मार्गे मोहेंजोदरो भागांत उतरल्या. कै. राजवाडे यांच्या नागवंशाच्या भ्रमण क्रमाशी डॉ. ऱ्होझनी यांचे हें मत जुळतें आहे. डॉ. ऱ्होझनी यांच्या समग्र संशोधनाचा परिचय करून देणे इथे शक्य नाहीं. पण आर्यांचे मूलस्थान व त्यांची भाषा या संबंधीच्या त्यांच्या पुराव्यामुळे टिळक–राजवाडे सांस्कृत्यायन यांची उपपत्ति निरपवाद ठरते. तिसरा इंडो–आर्यन गट राजवाडे व टिळक म्हणतात त्याप्रमाणे उत्तर कुरू-उत्तर मद्र म्हणजेच ताशकंद-स्तालिनाबाद–स्वात या मार्गाने भारतात आला. कॅस्पियनच्या या नैऋत्य प्रदेशांतच संस्कृत भाषा सिद्ध होत असावी. अर्थात या संस्कृत भाषेच्या पूर्वीची जी कोणची भाषा ( म्हणजे आर्य भाषा ) असेल ती या शतवंशाची समाईक भाषा असणार आणि बाहेर पडतांना हे वंशगट आपली ही समाईक भाषा

आणि नवीन सिद्ध होत असलेली संस्कृत भाषा या दोन्ही भाषा बरोबर घेऊन आशिया व यूरोप या द्विखंडांत संचार करीत निघाले असणार, हें शक्य आहे. याच न्यायाने फिनो-यूग्रीक गट वदा, द्वे, त्रे, वान्ता, स्वार्नो, औरस्वारा सारखे तयार शब्द घेऊन फिन्लंडला पोचला असणार. फोरर याच्या कल्पनेप्रमाणे फिनो-उग्राल भाषा जर 'हेति' भाषेची पूर्व भाषा ठरली तर संस्कृत भाषेशी तिचें नातेंहि स्पष्टच ठरेल. पण हें मत फार विवाद्य आहे. अर्थात् भाषेसंबंधीचा निष्कर्ष तो वंशासंबंधीचाहि म्हणावा लागेल. याचा अर्थ असा, की फिनी लोकांचा पूर्वज फिनो-यूग्राफ ज्या उग्रालियन वंशगटांतून उत्पन्न झाला तो उग्राल वंशगट शतवंश कुटुंबांचा असावा. स्वत: फिनी संशोधकांची स्ववंश निश्चिति अजून झाली नाहीं. तीन पर्याय त्यांच्यांत निर्माण झाले. यांतले पहिले दोन त्यांचे त्यांनींच टाकून दिले. आता त्यांना अधिकतर साधार व म्हणून मान्य वाटणारा तिसरा पर्याय म्हणजे पूर्वेकडून विभक्ति साधित-भाषा घेऊन येणाऱ्या उग्राल वंशगटाचा; त्याला धरून मी केलेल्या या विवेचनाचा निष्कर्ष म्हणजे त्यांच्या तिसऱ्या पर्यायाचा परिसंहार होय. स्ववंश निश्चिति न झाल्याने त्यांच्या भाषेंतल्या संस्कृत धाटणीच्या शब्दाचीहि त्यांना उपपत्ति सांगता येत नाहीं, व त्यांना उसनवारीचे शब्द म्हणून त्यांची बोळवण करावी लागत आहे. पण ती एक विसंगति किंवा अपूर्णता आहे. डॉ. व्होझनी यांच्या संशोधनाने कदाचित् त्यांना ही दिशा सांपडेल. त्या देशांत बरेच दिवस फिरत असतांना मला ती तीव्रतेने जाणवली. म्हणून उपलब्ध झाली ती सर्व माहिती मी संकलित केली. ही बहुतेक सर्व माहिती सरकारी प्रकाशनांतून व काहीं इतर प्रमाण मानल्या जाणाऱ्या प्रकाशनांतून नि ग्रंथांतून घेतलेली असल्याने ती अधिकृत व साधार आहे याबद्दल शंकेला जागा उरत नाहीं. या अधिकृत संकलनांतून लावलेली उपपत्ति व काढलेले निष्कर्ष तेवढे माझे आहेत. आणि ते इथे केवळ विचारार्थ म्हणून मांडले आहेत.

वंश व राष्ट्रसंशोधनांत भाषेबरोबरच शारीरशास्त्रालाहि महत्व आहे. त्याच्यामुळे निष्कर्षांना निर्णयाचा दर्जा प्राप्त होतो. या दृष्टीने विचार करतांना सर्व प्रथम ही गोष्ट लक्षांत येते, की गेलीं दोन हजार वर्षें फिनांचें जीवन ज्यांच्याशी निगडीत आहे त्या स्कँडिनेव्हियन व युरेशियन ( म्हणजे युरोपीय

रशिया—लेनिनग्राड व मॉस्को ) लोकांच्या शारीर लक्षणांहून, ते सर्वथैव निराळे पडतात. खाली बाल्टिक लोकांशीहि त्यांची शरीरयष्टि व चेहेरे-मोहेरे जमत नाहींत. या अर्थाने भोंवतालच्या लोकांपेक्षा फिनी लोक निखालस निराळे आहेत. फिन्लंड सभोवतालच्या या देशांतील माणसें—विशेषतः स्त्रिया—आडव्या बांध्याच्या, कमरेखाली जाडजूड, पोटऱ्या खांबासारख्या जाड व सरळ, डोळे वाटोळे, नाकें जाडी, जबडा रुंद, बोटें जाड व आखूड अशी आहेत. या उलट फिनी माणसें निमूळत्या चेहेऱ्याचीं व आकुंचित हनुवटीचीं, धरधरीत नाकाचीं, सडपातळ व बांदेसूद आहेत. त्यांच्या पोटऱ्या घाटदार, निमुळत्या नि बारीक आहेत. मुद्रा तरतरीत व प्रसन्न असून तिच्यावर बुद्धीची चमक आहे. दिसायला सशक्त पण नाजूक आहेत. हीं लक्षणें फिनी स्त्रींत अधिकच उठून दिसतात. तिला आपली साडी नेसवा, कुंकू लावा व बांगड्या भरा; आपल्यापुढें एक शुचिवर्णा, नाजुक व देखणी खानदानीची भारती उभी आहे असा भास होईल. आम्ही त्यांना भेटी देण्यासाठी साड्या बांगड्या नेल्या होत्या. त्यांना त्या नेसविल्या होत्या नि त्यांचें तें गोजिरें रूप आम्हीं डोळे भरून पाहून घेतले होतें. हीं शारीर लक्षणें आर्य गटांना लागू पडणारीं आहेत. भारतांतील प्राचीन कोरीव चित्रें, नाट्य व कथा वाङ्मयांतलीं वर्णनें यांच्याशी फिनी लक्षणें जुळणारीं आहेत. उरालपासून भारतापर्यंतच्या आशियाई लोकांना रंगभेद छटा सोडून, हें वर्णन बरेचसें लागू पडेल.

या विवेचनावरून फिनी लोक हे प्राचीन आर्यगटांपैकी असावे असे या चौकशीवरून दिसतें. जो उग्रालियन गट फिनो-यूग्रीफ या नांवाने पुढे फिन्लंडच्या दाक्षिण भागांत आला व मिश्रणाने वृद्धिंगत झाला तो उरल पर्वतासमीपच्या शतवंशापैकी होता हें स्पष्ट दिसतें. त्या वांशिकांत जी भाषा तेव्हा रूढ असेल ती म्हणजे आर्य भाषा ( व नवोदित संस्कृत भाषा ) घेऊन उग्रालियन वंशगट फिन्लंडकडे आलेला असावा. ज्या शब्दांची चर्चा आत्तापर्यंत केली ते व तसे शब्द मूळ वा रूपांतराने तिथे आढळले ते या आर्य भाषा वा तदुत्पन्न संस्कृत भाषा यांचे असावेत.

फिनी भाषेसंबंधीची हीच उपपत्ति मी अधिक कटाक्षाने रशियन भाषेला लावतो. सोवियत् संघराज्यांतील ग्रेटर रशियन हा वंशगट शतवंशा-

पैकी आहे की नाहीं याविषयी माझी अजून निश्चिति नाहीं. पण तो त्यांतला नसावा असा माझा कल आहे. तथापि माझ्या कटाक्षाचें कारण असे आहे की उत्तरध्रुवावरून सैबेरियामार्गें खाली आलेल्या लोकांच्या म्हणजेच शत वंशाच्या सरासरी चार हजार वर्षांच्या बहुरंगी जीवनाची रंगभूमि, नवाग्व व दशाग्व सत्रांची यज्ञभूमि, ताम्रायुध व ताम्रपात्र तसेंच वल्कलांपासून कापसाच्या वस्त्रापर्यंतच्या निर्मिति विलासांची आणि ऋग्वेद रचनेची कर्मभूमि ही उरलपासून हिंदुकुशालगतच्या वरच्या स्वात प्रदेशापर्यंतची भूमि आहे अशी टिळक व सांकृत्यायन यांची ग्वाही आहे. आर्य विशेषत: संस्कृत भाषा यांचा या भूमीवर सरासरी दोनतीन हजार वर्षेपर्यंत संचार झालेला आहे. आणि म्हणूनच तर रशियन भाषेंत पुष्कळच संस्कृत व संस्कृत–धाटणीचे शब्द सांपडतात. वाक्यरचनेची धाटणीहि तशीच दिसते. या पुढच्या रशियन प्रवासासंबंधीं लिहिण्याची संधि आली तर असे पुष्कळ शब्द आढळणार आहेत. रुसी-मंगोलियांत संस्कृत पोथ्या सापडणार आहेत. उरलवरून पुढे जात सारा पामीर व हिंदुकुशचा प्रदेश ओलांडून वरच्या स्वात खोऱ्यांतल्या ज्या कुनार नदीच्या तीरावर सुमारे चार हजार वर्षांपूर्वी आर्यांनीं सूर्याला अर्घ्य दिले असतील त्या सरितेचीं चार आचमने आपणहि घेणार आहोंत. अशा रीतीने आर्यभाषेचा व नंतर संस्कृतभाषेचा विजिगिषु संचार शेकडो वर्षें होत राहिल्याने तिथल्या भाषांवर या 'देव'भाषेचा प्रभाव अवश्य पडलेला असला पाहिजे. या दृष्टीने तिथल्या भाषांचा तौलनिक अभ्यास होणें अवश्य आहे. यासाठी आमचे भाषाशास्त्रज्ञ व समाजेतिहास शास्त्रज्ञ तिकडे जाऊन राहणे अवश्य आहे. महिना दोन महिन्यांच्या मुदतीचीं व माझ्यासारख्या सामान्य माणसांची भरती केलेली केवळ प्रवासप्रिय अशी सांस्कृतिक मंडळें या कामाला मुळीच उपयोगी नाहींत व अधिकारीहि नाहींत.

रशियाचे पंतप्रधान मार्शल बुल्गानीन १९५५च्या नोव्हेंबर महिन्यांत भारताच्या भेटीला आले होते तेव्हा पुण्यांत त्यांचा सत्कार करतांना डॉ. जयकर यांनीं उपस्थित केलेल्या प्रश्नाप्रमाणे रशियन भाषा व संस्कृत भाषा यांचे सहोदर संबंध कशा प्रकारचे असण्याचा संभव आहे हें या विवेचना-वरून ध्वनित होईल.

◆ ◆ ◆

## : ६ :

हेल्सिंकी शहराचा मुख्य रस्ता मॅनरहॅमेंती. शहराच्या तो मधोमध आहे. पार्लमेंटची इमारत याच रस्त्यावर आहे. या इमारतीपासून थोड्याच अंतरावर हमरस्त्यावर हॉक नांवाचे भव्य होटेल आहे. तिथून डाव्या हाताकडे एक मोठा रस्ता जातो. त्यावर होटेलपासून पांच मिनिटाच्या अंतरावर हमरस्त्यावरच मासुहाली हॉल्सची भव्य इमारत लागते. तिच्या उजव्या बाजूला व मागे खूप मोठालीं उद्यानवत् हिरवळीची मैदानें आहेत. यांतल्या मागच्या मैदानापलीकडे इथले प्रसिद्ध ऑलेम्पिक स्टेडियम आहे. त्याच्या उजव्या अंगाला समोरच दाट वनराजींनीं आच्छादलेले डोंगर आहेत. इथले दृश्य अति मनोरम आहे. हेल्सिंकीच्या विमान तळावर उतरल्याबरोबर पहिल्या दिवशीं याच स्टेडियमच्या कार्यालयांत आमच्या स्वागतार्थ चहापानाचा समारंभ झाला होता. नंतर आम्ही ओतानेमीला मुक्कामासाठी गेलो. त्यानंतर सहाव्या दिवशीं त्याच जागीं आम्हीं पुन्हा आलो. पण आज या जागेचा अन् तिच्या भोंवतालच्या साऱ्या क्रोशीचा नूर पार पालटून गेला होता. मॅनरहॅम रस्ताभर नि तिथून या हॉलपर्यंतच्या सर्व रस्त्यावर जगावरील बहुतेक सर्व प्रमुख देशांचे राष्ट्रध्वज फडकत होते. मधून मधून भारताचा चक्रांकित तिरंगा ध्वज दर्शन देई तेव्हा अंतःकरण अभिमानाने व कौतुकाने भरून येई. केवळ दहाच वर्षांपूर्वीपर्यंत भारताला स्वतःचा ध्वज होताच कुठे ! ब्रिटनच्या ध्वजांत तो अंतर्धान पावलेला होता. आज ब्रिटन, अमेरिका व रशियाच्या बरोबरीने स्वतंत्र राष्ट्रांच्या मालिकेंत चिनी ध्वजाच्या शेजारी तो गौरवाने फडकत होता. मधून मधून तोरणें लहरत होतीं नि भव्य कमानीहि उभारल्या गेल्या होत्या. इमारतीवर आणि ट्राम व बसीसवर शांततेच्या प्रतीकाचे नीलसलील ध्वज लावले होते. वाहनांच्या गतीमुळे ते फडफडू लागले की, त्यावरचीं कबुतरें वाऱ्यावर जणू

तरंगताहेत नि वातावरणांत शांतीचा शुभंकर संदेश फैलावत आहेत असे वाटे. रस्त्यांच्या वळणांवर फुलांची आरास रचली होती. मासुहाली हॉल तर शेकडो ध्वजांच्या पंखाने उडतो आहे असे वाटत होते. त्याच्या पुढचे पटांगण माणसांनीं फुलून गेले होतें. विश्वशांति परिषदेच्या पांचव्या अधिवेशनाचें आज इथे पुण्याहवाचन होतें.

अधिवेशन तीन वाजतां सुरू होणार होतें. आम्ही दाटीवाटींतून मार्ग काढीत अडीच वाजता तिथे जाऊन पोचलो. हॉलबाहेरच्या पडवींत पोस्ट ऑफिस दिसलें. बरोबर लिहून आणलेलीं पत्रें पेटींत टाकून आम्ही पोलिस पहाऱ्यांतून आंत प्रवेश केला. हें एक मोठें दालन आहे. एका बाजूला पुस्तकांचा स्टॉल आहे. रोज निघणारी परिषदेची प्रसिद्धकें समोरच्या स्टॉलवर वांटण्याची सोय आहे. चौकशी व तक्रारी यासाठी व्यवस्था आहे. पलीकडे असंख्य हॅंगर्स लटकताहेत. इथे ओव्हरकोट, टोप्या, हातातलें सामान व हॅंडबॅग्स ठेवायच्या आहेत. उजव्या हाताला परिषदेचा भव्य हॉल आहे. तीन हजार माणसें सामावतील एवढा तो मोठा आहे. त्याची बरोबरी करील असा मुंबईत किंवा दिल्ली शहरांतसुद्धा हॉल नाहीं. दरवाजांतून प्रवेश केला कीं प्रतिनिधींना बसण्यासाठी तीन रांगांनीं मांडलेले बाक आहेत. एक बसण्याचा व दुसरा त्याच्या पुढे लिहिण्याचा. व्यासपीठावर होणारीं भाषणें प्रत्येक माणसाला नीट ऐकता यावीं म्हणून कानमंत्र सांगणारे हेड फोन्स प्रत्येक सीटवर ठेवलेले आहेत. या रांगांच्या पुढे एकावर एक चढत जाणाऱ्या पायऱ्यांचे गॅलरीवजा व्यासपीठ आहे. त्याच्या एका बाजूला सबंद पाईन वृक्ष उपटून आणून उभा केला आहे. त्याच्या फांद्याफांद्यावर कबुतरें बसलेलीं आहेत. दुसऱ्या बाजूला वक्त्यांसाठी भाषणाची जागा केलेली आहे. व्यासपीठामागे नीलवर्ण पडदा सोडून त्यावर Assemble'e Mondiale De La Paix हे वाक्य पांढऱ्या कापडावर कापलेल्या अक्षरांनीं शिवलेले आहे. खाली शांतिदूत कबुतराचें उडण्याच्या आवेशांतलें चित्र आहे. तीन रांगांत देशोदेशींचीं प्रतिनिधि-मंडळें एकामागे एक अशी नियोजित जागेवर बसलेलीं आहेत. पहिल्या रांगेत प्रथम श्रेणी चीनची व त्याच्या मागे भारत; मधल्या रांगेत सर्वांपुढे रशिया व त्यांच्या मागे फ्रान्स; शेवटल्या ओळींत अग्रेसर ग्रेट ब्रिटन व त्यामागे कॅनडा; अशा पद्धतीने देशपरत्वे विभाग

पाडले होते. व्यासपीठाच्या डाव्या हाताला प्रेस व प्रेस फोटोग्राफर्सची गॅलरी नि उजव्या हाताला परिषदेच्या विविध कार्यालयांची व्यवस्था आहे. व्यासपीठाच्या मागल्या बाजूला सात आठशे माणसे बसतील असा हॉल आहे. त्यालाहि एक व्यासपीठ व सहा कॅबिन्स आहेत. कमिट्या वा कमिशन्सच्या बैठकी या हॉलमधे होतात. मुख्य हॉलच्या व्यासपीठावरून जेव्हा वक्ता बोलत असतो तेव्हा मागच्या सहा कॅबिन्समधून ते भाषण सहा निरनिराळ्या भाषांतून ध्वनिक्षेपित होतें. अर्थात् वक्त्याने आपलें भाषण लिहून काढून परिषदेच्या कार्यालयांत ते आधीच सादर करायचे असतें. त्याची या सहा भाषांतून भाषांतरें अगाऊच करून ठेवलेलीं असतात. वक्ता बोलूं लागला की या सहाहि भाषांतून या भाषणाचा ध्वनिक्षेप होतो. प्रत्येक श्रोत्यापाशी हेड फोन असतो व टेबलावर सहाहि भाषांचा स्वीच बोर्ड असतो. आपल्याला पाहिजे त्या भाषेच्या नांवापुढील भोकांत स्वीच अडकवून दिला, की त्या भाषेंतल्या भाषणाचा गुंजारव कानांत होत राहतो. परिषदेने जागतिक व्यवहारासाठी मान्य केलेल्या या भाषा म्हणजे इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, डच, रशियन आणि ज्या देशांत परिषद भरली असेल त्या देशाची भाषा ( यंदा फिनीश ) या होत. पहिले दोन दिवस—म्हणजे जून २२ व २३ या तारखा-स्वागताध्यक्ष फिन्लंडच्या ओसामी प्रांताचे राज्यपाल व्हॅलिनो मेल्ती व उद्घाटक फिन्लंडच्या एक मंत्री ताईन–लेवो–लारसन नंतर अध्यक्ष डॉ. क्युरी यांचीं भाषणें, संदेशवाचन व देशोदेशींच्या शांति समित्यांचें अहवाल कथन यांत गेले.

अमेरिका, मॅक्सिको, फिलीपाईन्सपासून जपानपर्यंतच्या ६८ देशांच्या प्रतिनिधींनीं परिषदेंत भाग घेतला होता. यांत फ्रान्सची संख्या सर्वांत जास्त म्हणजे १२५ होती. याच्या खालोखाल भारताचा क्रम लागत होता. आमची संख्या ९० होती. यांत बंगालचे २५; पंजाब, दिल्ली, उत्तर प्रदेश मिळून १८; आसाम १; व राजस्थान १; असे उत्तरेचे ४५ प्रतिनिधि होते; तर बाकीचा दक्षिण भारत म्हणजे मद्रास १; त्रावणकोर २; मलबार १; हैद्राबाद १; कर्नाटक २, आंध्र १; गुजराथ-सौराष्ट्र १२; व मुंबई-महाराष्ट्र २५ ( यांत विदर्भाचे ५ मिळून ) ४५ प्रतिनिधि होते. संख्येच्या दृष्टीने बंगाल व महाराष्ट्र तुल्यबल असले तरी आमची एकांडेगिरीचीं तोंडें दाही

दिशेला वळलेलीं असत. उलट बंगालची संख्या एक गटाने वागे. यामुळे त्यांचा प्रभाव पुष्कळच पडत असे. आम्ही मात्र चिल्लर खुर्च्यांवारी खर्ची पडत असूं.

देशोदेशीच्या या दोनहजार प्रतिनिधींत धंद्याच्या दृष्टीने अशी वर्गवारी दिसली:—शेतकरी ५७; व्यापारी ७४; इंजीनियर्स व तंत्रज्ञ ६८; कायदेपंडित ९४; कलावंत १०८; शिक्षक १४०; शास्त्रज्ञ व डॉक्टर्स १४५; लेखक व कवी १४६; पत्रकार १४९; कारकुनी पेषाचे १६२; ट्रेड युनियनिस्ट ३५४; पार्लमेंटेरीयन्स १०४; धर्मगुरु ७२; बाकीचे व्यापारी, उद्योगपती वगैरे इतर व्यवसायांचे होते. वयोमानाने तीस ते चाळीस वर्षांच्या प्रातिनिधींची संख्या सर्वांत जास्त होती. एकूण १८६० प्रतिनिधींत ४३७ स्त्रिया होत्या. शिवाय दोनशे निमंत्रित व प्रेक्षक म्हणून उपस्थित होते. मॅक्सिको, फ्रान्स व जपानचे माजी अध्यक्ष नि मुख्य मंत्रि, भारताचे डॉ. किश्लू व श्रीमती रामेश्वरी नेहरू, बेलजीयमच्या सम्राज्ञी, बर्टरॅंड रसेल आदींचे शुभसंदेश आलेले होते. शांतता प्रस्थापनेसाठीं परिषद जे निर्णय करील त्यांत मी सदैव सहभागी राहीन असे या वृद्ध राणीने कळविले होतें. स्वागताध्यक्षांचें भाषण सडेतोड पण मार्मिक झालें. जागतिक शांततेची लहान देशांना किती आवश्यकता आहे, जागतिक बड्या राष्ट्रांचीं धोरणें वर्चस्व स्थापनेच्या प्रेरणेने कशी चालतात, संहारक शस्त्रांचें संशोधन व वाढते साठे यांपासून जगांत अस्थिरता नि भीति यांचें वातावरण कसे पसरतें, यांचें मुद्देसूद विवेचन करून वरचढ व आडमुठ्या धोरणाबद्दल त्यांनीं अमेरिकेचे चिमटे काढले.

यानंतर श्रीमती ताईन लेवो लारसन यांचे उद्‌घाटनाचे भाषण झालें. त्यांत त्यांनीं सद्‌भावना, परस्परावलंबन व सहिष्णुता यांवर भर दिला. सर्वांनीं आपापल्या देशांतील जनतांना जागृत करून ही गुणत्रयी तिच्या मनावर बिंबवली तर शांतता अभेद्य राहून युद्धोत्तर काळाची रचना करता येईल. शास्त्राने विकासाची अद्‌भुत साधनें निर्माण करून ठेवलीं आहेत त्यांचा मानवी जीवन समृद्ध व सुखमय करण्याकडे उपयोग करावा अशी सर्वांना आवर्जून प्रार्थना करीत त्यांनीं परिषदेची नांदी गाईली.

डॉ. कुरी अध्यक्षीय भाषण करण्यास उभे राहिले तेव्हा त्यांच्या सन्मानार्थ टाळ्यांचा कडकडाट झाला. त्यांचा आवाज धीरगंभीर, निश्चयी

नि ठाशीव होता. त्यांत मुद्यांची स्पष्टता व सखोल विवरण होतें. गेल्या जागतिक युद्धानंतर उद्‌भवलेल्या परिस्थितीचे, निरनिराळ्या बड्या राष्ट्रांच्या धोरणांचे, नव्या आक्रमक भावनांचे व त्यांतून निर्माण झालेल्या अणु-शक्तीच्या महान् संशोधनाचे त्यांनीं मुद्देसूद व बहारदार वर्णन केलें व या शक्तीचा संहाराकडे उपयोग व्हावा याचा त्यांनीं निषेध केला. नंतर त्यांनीं मानवाच्या निर्णायक पराक्रमाला आवाहन करून व विश्वव्यापी जागृति नि शांततेची संघटित मोहीम उभारून या संहारक उपायांना व त्यांच्या योजकांना पायबंद घालण्याची सूचना केली. ते आग्रही स्वराने म्हणाले, 'साऱ्या जगाला शांतता पाहिजे आहे नि ती घडवून आणणे जगांतील चार बलिष्ठ राष्ट्रांच्या हातांत आहे. त्यांनीं जिनिवाच्या संकल्पित परिषदेंत शांततेचा संकल्प करावा व ती घडवून आणावी. यांत त्यांनीं कुचराई करता कामा नये. मानवतेचें त्यांना हें आव्हान आहे. पहिल्या दिवसाचें काम इथे संपलें. भाषणांचा श्रोत्यांवर उत्साहवर्धक परिणाम झाला होता. प्रतिनिधी उल्हसित झाले होते. परिषदेचें अर्धें यश यांत होतें.

दुसऱ्या दिवशी प्रथम संदेश वाचन झालें. यांत विश्वशांति परिषदेच्या चिटणीसांनीं गेल्या वर्षीं झालेल्या कामाचा आढावा दिला होता. भारत व चीन देशांच्या पंतप्रधानांच्या पंचशीला सूत्रांचा गौरव केला होता. पं. नेहरू यांच्या रूसी दौऱ्याने जगाच्या अपेक्षा किती वाढविल्या आहेत याचे बहारदार वर्णन करून त्यांच्या महत्कार्याची स्तुति केली तेव्हा सर्व सभागृह टाळ्यांच्या गजराने निनादून गेलें. त्यानंतर निमंत्रितांपैकी काहीं वजनदार व श्रेष्ठ व्यक्तींचीं निवेदनपर भाषणें झालीं. यानंतर अनेक राष्ट्रांतर्फे निवेदनें झाली. यांत भारतातर्फे प्रा. कोसंबी यांचें भाषण ठसठशीत व परिणामकारक वठलें. तिसऱ्या दिवशीहि ह्याच कार्यक्रम पुढे चालू झाला. नंतर परिषदेने ज्याच्या-संबंधी विचार करावा असे सात विषय निश्चित झाले व त्यांचा सांगोपांग विचार करून त्या विषयांवर मार्गदर्शन करणारी निवेदनें तयार करण्यासाठी सात कमिशनें नेमली गेलीं. या सर्वच कमिशन्सवर भारतीय प्रतिनिधींनीं उत्साहाने काम केलें. हीं सात कमिशने म्हणजे त्यांचे विषय असेः—
(१) निःशस्त्रीकरण व अण्वस्त्रें (२) लष्करी गट व सुरक्षितता (३) राष्ट्रांचें सार्वभौमत्व व शांतता (४) आर्थिक व सामाजिक समस्या (५) सांस्कृतिक

अनुक्रम 23028 वि: ..... १००-१०१
क्रमांक ... 230 ....... नों: दि: 27/3/58

दळणवळण (६) शैक्षणिक समस्या व तरुण (७) शांतता आघाडीचीं कार्यें व सहकार.

हीं कमिशनें म्हणजे विषयवारी समित्या हाच परिषदेचा मुख्य गाभा असतो. इथे त्या त्या विषयाचा सांगोपांग विचार होतो व त्यावरून त्या विषयावरील कमिशनचें मत विशद करणारे निवेदन तयार होतें. या सर्व निवेदनांची परिषदेच्या कार्यकारिणींत तपासणी व चर्चा होऊन तीं मूळ स्वरूपांत किंवा दुरुस्त करून मान्य केलीं जातात. अशा सर्व विषयांवरील मान्य झालेल्या निवेदनांतील मुद्दे व विचारसरणी यांवरून त्या अधिवेशनाचें मत प्रदर्शित करणारे एक निवेदन ( Appeal ) तयार केले जातें व ते खुल्या अधिवेशनापुढे संमतीसाठी सादर केले जातें. त्यास संमति मिळाली म्हणजे तोच परिषदेचा मार्गदर्शनपर ठराव मानला जाऊन पुढच्या वर्षांत त्याच्या अनुषंगाने काम होतें. असे असल्यामुळेच राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या विषयांत गोव्याला अनुलक्षून भारताच्या सार्वभौम स्वातंत्र्याचा प्रश्न आणावा असा आम्हा भारतीयांचा स्वाभाविकपणेच निर्धार होता. भारतांतून निघाल्यापासूनच आमच्या मनांत तो घोळत होता व त्याचा कशा रीतीने परिस्फोट करावा याचें आम्ही चिंतन करीत होतो. जगावरील राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचा विचार करावा असे जेव्हा परिषदेंत ठरलें तेव्हा भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर कोडगेपणाने दबा धरून बसलेल्या पोर्तुगीझ सत्तेचा परामर्ष घेण्याची हीच जागा असल्याचे आमच्या लक्षांत आलें, व आम्ही त्या दिशेने मुसंडी मारायला सुरुवात केली. प्रथम कार्यकारिणी या मुद्याचा उल्लेख करायला अनुकूल नव्हती. पण आमच्या एकोप्याच्या निग्रहीपणामुळे तिला तो मान्य करावा लागला. राष्ट्रीय स्वाभिमानाला डिवचणारा हा मुद्दा असल्याने सर्वच भारतीयांना त्या विषयाचा जिव्हाळा होता. अन् आम्हा महाराष्ट्रीय प्रतिनिधींना तर तो आपल्या काळजावरचा घाव वाटत होता. शेवटी गोव्याच्या प्रश्नावर एक साधार निवेदन तयार करण्यासाठी एक पंचमुखी समिती नेमण्यांत आली. तिच्यांत अत्रे व मी असा दोघांचा समावेश झाला. मी निवेदन तयार केलें. आम्हा भारतीयांना ते मान्य झालें व पुढे राष्ट्रीय स्वातंत्र्य व लष्करी गट या दोन विषयांवरील समित्यांच्या ठरावांतून त्याचा अंतर्भाव झाला. आम्ही

हा एक मोठा विजय मिळविला होता. महाराष्ट्राची व भारताची काहीं सेवा आमच्या हातून घडली होती.

आमच्या या निवेदनांत प्रथम गोव्याची भौगोलिक माहिती देऊन पुढे पोर्तुगीजांनीं ते कसे घेतलें; इन्क्विझिशनच्या नांवाने कसे क्रूर हत्याकांड केलें व १७५५ सालापासून १९१२ पर्यंत जनतेने आपल्या स्वातंत्र्यरक्षणासाठी कशी शर्थ केली याची माहिती दिली आहे. पुढे आजची स्थिति व भारतसरकारचे सामोपचाराचे प्रयत्न सांगून भारताचा एक भाग बळजबरीने एखाद्या परसत्तेने आपल्या ताब्यांत ठेवणे हे भारताच्या सार्वभौमत्वाला व अंतर्गत सुरक्षिततेला धोका निर्माण करणारे असून पोर्तुगाल नाटो करारांतलें राष्ट्र असल्याने भावी युद्धांत पूर्वेकडे धडक मारण्याचा तळ म्हणून गोव्याचा उपयोग होणे कसे संभवनीय आहे; गोव्यांत लष्कराची व लष्करीदृष्ट्या बंदराची वाढ, अद्ययावत् शस्त्रास्त्रांचा संभार, सुसज्ज विमानतळ, यासाठी सर्वांनाच अज्ञात असलेल्या बजेटाबाहेरच्या "दर्यापार निधी"तून (Overseas Fund) कसा खर्च झाला आहे, याचें वर्णन केले असून व तेथील सत्याग्रहाची माहिती देऊन पुढे म्हटले आहे—

"अशा शांततामय लढ्याचे यश जागतिक जनतेच्या जोरदार पाठिंब्यावरच अवलंबून असतें. म्हणून पोर्तुगीजांनीं गोव्यांतून तत्काळ पाय काढून घ्यावा व त्याला त्याच्या इच्छेनुसार भारतांत विलीन होण्याची मोकळीक द्यावी अशी या जागतिक परिषदेने मागणी करावी व भारतीयांच्या शांति-संग्रामाला पाठिंबा द्यावा अशी मागणी निवेदनांत शेवटी करण्यांत आली होती.

वर दिलेल्या दोन ठरावांत जागतिक शांतता-परिषदेने भारताची ही मागणी स्पष्टपणे घातली आहे. रशियन प्रवदा वगैरे वृत्तपत्रांनीं या मागणीचा पाठपुरावा केला. इंडोनेशिया, व्हिएतनाम, ब्रह्मदेश वगैरे देशांतील वृत्तपत्रांनीं भारताची भूमिका उचलून धरली. चीनने तिची जोरदार तरफदारी केली इतकेच नव्हे तर खुद्द लिस्बनमधे सालाझारच्या आसनाखालून गोव्याच्या मुक्तीच्या घोषणा घुमूं लागल्या. पोर्तुगीज प्रतिनिधींनीं भारतीयांना हेल्सिंकी येथे जे आश्वासन दिले त्याची पूर्ति ते तिकडे करीत आहेत.

राष्ट्रीय सार्वभौमत्व व शांतता या विषयाच्या कमिशनने खालील सूत्रें ग्रथित करणारा ठराव केला :—

“ खालील प्रकार हे राष्ट्रीय सार्वभौमत्व व शांतता यांस धोका निर्माण करणारे असल्याने हें कमिशन या व असल्या प्रकारांना गुन्हेगारीचीं कृत्यें ( offences ) ठरवीत आहे.

( १ ) कोणत्याहि देशाचा एखादा भाग त्या देशाच्या इच्छेविरुद्ध लष्करी दंडुकेशाहीच्या बळावर दुसऱ्या एखाद्या देशाने बळकाविणें.

( २ ) कोणत्याहि देशाच्या जनतेच्या इच्छेविरुद्ध त्या देशाचे तुकडे करणें.

( ३ ) कोणच्याहि देशाच्या सार्वभौमत्वाला विघातक असे लष्करी करार करणे वा संघटना उभारणे. ठरावांत एकूण सात कलमें आहेत. पैकी वरील तीन गोव्याला लागू पडतात. म्हणून तेवढीच येथे उद्धृत केलीं आहेत. शेवटचें कलम ‘ नाटो ’ कराराला अनुलक्षून आहे.

लष्करी गट व राष्ट्राचे स्थैर्य या संबंधीच्या तिसऱ्या कमिशनने केलेल्या ठरावांत म्हटले आहे :—

( १ ) शांततेचीं पांच तत्त्वें ( पंचशील ) व बांडुंग–परिषदेने निश्चित केलेली दहा सूत्रें ही शांततेची प्राणसूत्रें असल्याने जगांतील शांततावादी लोकांनीं व सरकारांनीं त्यांचा निःसंदिग्ध पुरस्कार केला पाहिजे. तसेंच

( २ ) आशिया खंडांतून सर्व परकीयांनीं आपापले तळ उठवून ती भूमि मुक्त केली पाहिजे अशी मागणी हे कमिशन करीत आहे. भारतीय व गोमंतकीय जनतेचें प्रखर मत हे आहे की, गोवा ही भारतभूमि आहे. हे मत मान्य करून कमिशन अशी मागणी करीत आहे की, गोव्यांतील पोर्तुगीझ लष्कर ताबडतोब काढून घेण्यांत यावें व हा प्रश्न शांततेच्या मार्गांनी सोडविण्यासाठी पोर्तुगालने भारताशी बोलणी सुरू करावीं.

पुढचे दोन दिवस अधिवेशन स्थगित राहाणार होतें. कारण त्या दिवशीं फिन्लंडच्या राष्ट्रीय उत्सव साजरा होतो. त्यानंतरचे तीन दिवस काम करून जूनच्या २९ ला परिषद समाप्त व्हायची होती व मग पुढच्या दिवशींच आम्ही रशियाला जायला निघणार होतों. घरून निघालो तेव्हा-

पासूनच उत्तर ध्रुवाच्या प्रदेशांत जाऊन येण्याचा छंद मनाला लागलेला होता. पुढे वेळच नव्हता. म्हणून या सुटीचा फायदा घेऊन मी निघून गेलो. यामुळे पुढच्या तीन दिवसांचें अधिवेशन बुडणार होतें. पण गोव्याच्या प्रश्नाच्या रूपाने आपण आपला वांटा उचलला आहे. आता आपल्यावाचून कांहीं अडत नाहीं असा निर्धार करून मी निघून गेलो. दि. २९ ला दुपारी परत आलो तो उपास पत्करून सामानासुद्धा अधिवेशनाला उपस्थित झालो. सातहि समित्यांच्या निवेदनांस मान्यता लाभली होती व मी अधिवेशनांत प्रविष्ट झालो तेव्हा या सातहि निवेदनांचें सारसर्वस्व ग्रथित करून तयार केलेल्या मार्गदर्शनपर निवेदनावर भाषणें होत होतीं. रशिया व इजिप्त यांचीं भाषणें उठावदार झालीं. आणि शेवटचें भाषण चीनचे झालें. श्री. क्यू मो जो यांचे हे भाषण उत्स्फूर्त वक्तृत्व, तळमळ, आर्जवीपणा व गोडवा यांचा दुर्मिळ नमुना होता. त्याने श्रोत्यांची अंत:करणें हेलकावत होतीं, मनें उंचावत होतीं. भावना तरल होत होत्या. कसलाहि आविर्भाव न करता ते संथपणाने बोलत होते. गोडवाणी, अनुरूप शब्द लालित्य, प्रसन्न अन् सोज्वळ उपमा-अलंकार, लीनता—हे भाषण म्हणजे परिषदेचा एक प्रसाद होता. भाषणानंतर निवेदन सर्वानुमते पास झाले. तेव्हाचा देखावा अविस्मरणीय होता. प्रतिनिधी बेहोश झाले होते. टाळ्या, घोषणा, रुमाल फडकावणे, एकमेकांना आलिंगने देणे, फेरधरून नाचणे; तासभर हा जल्लोष चालू होता. लहानमोठे, सायंटिस्ट्स्, प्रोफेसर्स, विद्वान्, सामान्य जन, या सर्वांचा या उन्मेषांत लय झाला होता.—बालवृद्धो समासम:

परिषद साडेसातला संपली. आम्ही बाहेर पडून जेवलो व मुक्कामावर परत आलो. खूप दमलो होतो तरी हर्षोन्माद डोक्यांत थैमान घालत होता. या खोलींतून त्या खोलींत जमत होतो. पुन: पुन्हा त्याच त्याच गोष्टींची उजळणी होत होती. हा नशा केव्हा ओसरला नि केव्हा झोपलो कुणास ठाऊक! किती तरी दिवसानंतर आठवण करून लिहितांना आज एवढेच सांगता येईल, की दुसऱ्या दिवशीं उठलो तेव्हा फार उशीर झालेला होता.

विश्वशांति परिषदेचे महत्त्वपूर्ण अधिवेशन काल संपले होतें. उत्तर ध्रुवाचा प्रवास करून मध्यरात्रीच्या सूर्याचें दुर्लभ दर्शन घेतले होतें. घर सोडून सात हजार मैलांचा प्रवास केला त्याचें संपूर्ण सार्थक झाले होतें.

आतां आजचा व उद्याचा दिवस मोकळा होता. उद्या जुलैच्या पहिल्या दिवशी संध्याकाळी आम्ही ही अतीव सुंदर भूमि व तिची प्यारी जनता यांचा निरोप घेऊन सोवियत् भूमींत प्रवेश करणार होतों. हे दोन दिवस फिन्लंडची राजधानी बघून घेण्याचे आम्ही ठरविलें. त्याप्रमाणे सकाळची न्याहारी उरकून ओतानेमींतून बाहेर पडलो व हेल्सिंकी शहराच्या बाहेरून कारखान्यांच्या भागातून प्रथम बंदरावर गेलो. बहुतेक मुख्य कारखाने सरकारी मालकीचे वा त्याच्या नियंत्रणाखाली आहेत. बंदर हा हेल्सिंकीचा कणा आहे; कारण, रशिया सोडून बाकीच्या सर्व जगाशी फिन्लंडचा व्यापार व्यवहार या एकुलत्या एक बंदरांतून होतो.

हेल्सिंकी हे चारशे वर्षांचें जुने शहर आहे. इ. स. १५५० त राजा गुस्तावस वासा याने तें वान्ता नदीच्या मुखावर वसविलें. डचांचा या वेळी दाक्षिणेकडील तालीन धक्क्यावरून रशियाशी मोठा व्यापार चाले. त्याला शह देण्यासाठी राजाने अखाताच्या सन्निध तें उभारलें. पण बोटी आत घेण्यास ते सोईस्कर नाहीं असा अनुभव आल्याने १६४० साली तें समुद्र किनाऱ्यावर हलविण्यांत आलें. या भागाला केप विरोनेमी म्हणतात. पुढे मोठी आग लागून बराच भाग जळून गेल्याने त्याची नव्याने मांडणी करणे अनिवार्य झालें. आणि जोहान आलबर्ट एहरेनस्ट्रोम याने पुनर्रचनेचा नकाशा इतका दीर्घ दृष्टीने केला, की आज शहराची वस्ती शंभर पटीने वाढली तरी त्याची वाढ योजनाबद्ध होऊं शकली. कार्ल लुडविग एंजेल या सुप्रसिद्ध स्थापत्य विशारदाने सुबक व आकर्षक इमारतींचे नमुने तयार केले. शहर मध्याचा विस्तीर्ण चौक व त्या सभोंवती इमारतींची सुबक रचना हा नगर रचनेचा सुंदर आदर्श म्हणून मोजला जातो. सन १८४० पर्यंत ही बांधणी चालली होती. बहुतेक मोठ्या इमारती राजशाही थाटाच्या (Empire style) असून त्यांचीं छप्परें निमुळती आहेत. रस्ते सरळ रुंद व फरसबंदी असून मधून मधून बागा किंवा हिरवळीच्या मोकळ्या जागा नि भव्य पुतळे आहेत. शहरांतल्या प्रत्येक माणसागणिक पंचवीस चौरस वार जमीन मोकळी राहिली पाहिजे असा सरकारचा कटाक्ष आहे. यामुळे वस्तीच्या मानाने शहराचा विस्तार फारच मोठा आहे. १८१२ साली तें राजधानीचें शहर बनल्यामुळे सर्व सरकारी कचेऱ्या व व्यापारी पेढ्या तिथे आल्या नि त्याची

वाढ झपाट्याने झाली. तेव्हा वस्ती चार हजार होती ती आता चार लाखांची झाली आहे.

बंदरावरून पुढे गेलो की चर्मरोग, क्षयरोग, स्त्रीरोग, वेडे यांची, तसेच शस्त्रक्रियेचीं इस्पितळें; प्रसूतिगृहें, अर्भकालयें हीं लागतात. मारिया हें प्रसूतिगृह फार मोठे व प्रसिद्ध आहे. बाळंतपणाची जागा तळघरांत असून मूल जन्मल्याबरोबर तपासले जातें व काहीं व्याधी वा रोगचिन्ह दिसल्यास भूमिगत मार्गानें त्याला अर्भकालयांत नेतात. हीं रुग्णालये १५० ते ५०० खाटा असलेलीं आहेत. याच मॅनरहॅम रस्त्यावर मॅनरहॅम सोसायटीतर्फे एक विशाल बालचिकित्सालय आहे. इमारत अति भव्य आहे. तिच्या दर्शनी भागावर एंजेल पद्धतीचीं दोन कोरीव चित्रें ( फ्रिस्को ) चित्ताकर्षक आहेत. या चिकित्सालयाला आपली ही श्रम–देणगी म्हणून दोन कामगारांनीं आपणहून तीं कोरलेलीं आहेत. गेल्या युद्धांत फार मनुष्यहानि होऊन मुलें उघडीं पडलीं व त्यांचे हाल झाले यासाठी समाजांतल्या सर्वच थरांत मुलांबद्दल आस्था आहे. या चित्रकार कामगारांच्या वृत्तीवरून ही समाज भावना दिसून येते. शहरभर निरनिराळ्या धाटणीची कितीतरी देऊळें विखुरलेली आहेत.

हेल्सिंकी शहराचा दुसरा चित्तवेधक विशेष म्हणजे रस्त्यारस्त्यांवर, चौकाचौकांत व बगीच्यांतून उभारलेले भव्य पुतळे नि बागबगीचे हा होय. बायबलचें फिनी भाषेंत भाषांतर करणारा सुधारक बिशप आग्रीकोला, संगीत विधाता सेबेलियस, पळण्यांत जागतिक विक्रम करणारा पावानूर्मि, हल्लीचें नाणें सुरू करणारा स्टेलमन, राष्ट्रीय लेखक व नाटककार ॲलेक्झी किव्ही, फिन्लंडला घटना देणारा झार अलेक्झांडर दुसरा, स्वीडीश भाषेंत कवित्व करणारा महाकवि मोर्ने, फिनी लोककथा व गीतांचा संग्राहक लॉनरोट अशा प्रसिद्ध व्यक्तींचे; तसेंच रानटी जनावरांचे, फिन्लंडमधे जंगलचा राजा मानला जात असलेल्या गव्याचें, सुंदर स्त्रियांचे, कुठे वत्सलता, करुणा आदि भावनांचे प्रतिकात्मक असे अनेक भव्य प्रेक्षणीय पुतळे आहेत. शहरांतल्या मुख्य चौकांत तीन लोहार तापवलेल्या लोखंडावर घणाचे घाव घालीत आहेत हा, युरोपभर अति प्रसिद्ध असलेला पुतळा, मला फिनी लोकांच्या दीर्घ व सतत उद्योग वृत्तीचा व कणखर आशावादित्वाचा

प्रतीक वाटला. अनेक सुंदर बगीच्यांत संगीत संयोजक सेबेलियसच्या नांवाचा बगीचा फार मोठा व प्रेक्षणीय आहे.

इथला तिसरा विशेष म्हणजे 'सावना' ऊर्फ सार्वजनिक स्नानगृहें. यांत मोठमोठे दगड बसविलेले असतात ते तापवितात नि त्यावर पाणी ओतून वाफ करतात. या वाफेचें स्नान अनेक पुरुष एकत्र बसून नग्नपणाने घेतात. स्त्रियांसाठीहि अशीं वेगळीं स्नानगृहें असतात. फिनी लोक सहसा आंघोळ केल्यावाचून रहात नाहीं. खाजगी घरांनाहि असे 'सावना' असतात.

इथल्या राहण्याच्या इमारती बहुतेक सहकारी तत्त्वावर उभारलेल्या आहेत. अनेक पैसेवाले एकत्र येऊन भांडवल उभारतात व घरें बांधतात. काहीं ठिकाणी आपल्याकडे ओनरशीप बेसीसवर ज्या इमारती बांधल्या गेल्या आहेत तशा पद्धतीच्या सहकारी इमारतीहि आहेत. सहकारी घर बांधणीच्या योजनेला 'आरावा' असे म्हणतात. इथे एक ओपन एअर थिएटर व एक राष्ट्रीय नाट्यमंदीर आहे. जुन्या इंग्रजी कविता कादंबऱ्यांतून आपल्याला परिचित झालेलें ट्यूलीप फूल इथे विपूल आहे. इथला सध्याचा ऑलेम्पिक स्टेडियम ७५ हजार लोक बसतील एवढा मोठा आहे. त्याला एक २४ मजली टॉवर असून त्याची उंची २४० फूट आहे. आंतून लिफ्ट आहे. त्याने वर जायला प्रत्येकी पन्नास मार्क (१११ आणे) द्यावे लागतात. ही एक चांगली उत्पन्नाची बाब आहे. २४ व्या मजल्यावर गॅलरी आहे. पूर्वीं ती उघडी होती. पण दोन लोकांनीं तिथून उड्या टाकून आत्महत्या केल्यामुळे आता लोखंडी गज घालून ती बंद केली आहे. तरीपण इथून भोंवतालचा विस्तीर्ण प्रदेश दिसतो. याच्यापुढे तुरुंग लागला. गुन्हे म्हणजे चोऱ्या व क्वचित् खून. हे खून दारूच्या नशेंत होतात. इथे एकहि राजकीय कैदी नाहीं. सामान्यपणे इथे तरुण पिढी पीत नाहीं. पण कांहीं माणसें फार पितात. इथला सामान्य आजार इन्फ्ल्यूएंझा. याला ते "कौला" म्हणतात. तुरुंगाच्या पलीकडे परिचारिका गृहें व त्याच्यापुढे लष्करी बराकी आहेत.

हेल्सिंकीत म्यूझियम्स पुष्कळच आहेत. मागल्या जागतिक युद्ध काळांतले फिन्लंडचे अध्यक्ष व सरसेनापती मार्शल मॅनरहॅमच्या राहत्या घराचें आता प्रदर्शनालय बनविले आहे. तिथे त्यांच्या वापरांतल्या सर्व वस्तू, हत्यारें,

रशियाच्या आशियाई प्रदेशांत गाजविलेल्या कामगिरीबद्दल मिळालेलीं पदकें, त्यांचे पोषाख, त्यांनीं केलेल्या शिकारी ही सर्व जतन करून ठेवलीं आहेत. मॅनर-हॅम यांची बरीच कारकीर्द रशियांत गेलेली. झारच्या सैन्यांतले ते एक नामवंत सेनापती होते. खालच्या आशियाई प्रदेशांत माजलेल्या बंडाळीचा बीमोड करण्याची कामगिरी त्यांच्याकडे सोंपविण्यांत आली होती. त्यांचें घोडदळ प्रसिद्ध होते. १९१७ सालच्या ऑक्टोबर क्रांतीत त्यांनीं रशिया सोडला व त्यानंतर ते आपल्या देशांत येऊन स्थिर झाले. म्युनिसिपल म्यूझियममधे चित्रकला, फर्निचरचे नमूने, वाङ्मय व ऐतिहासिक संशोधन विभाग आहे. हर्तोनेमी म्यूझियममधे नाट्य व कलाविषयक संग्रह आहे. कान्सालीस म्यूझियोंत प्रागेतिहास कालदर्शक संग्रह आहे. बोटॅनिकल गार्डन व म्यूझियो प्रेक्षणीय आहेत. लाहेतीस म्यूझियोंत आफ्रिकन नि चिनी वस्तूसंग्रह, तसेंच वांशिक संशोधन संग्रहाचा विभाग आहे. शिवाय आर्ट गॅलरीझ, स्पोर्ट्स, कामगार व यंत्रोत्पादन विषयक म्यूझियम्स आहेत.

चारशे वर्षांपूर्वीं वसलेल्या मूळ हेल्सिंकींतील काहीं रस्त्यांचीं नांवें आपले लक्ष वेधून घेतात. अरब, इंदे ( हिंदुस्थान ), जावा, सिलोन हीं त्यांचीं नांवें आजहि कायम आहेत. इतकेच नव्हे तर सरकारी काच कारखान्याला अरेबिया फॅक्टरी असेच नांव दिलेले आहे. नगर स्थापकाच्या वाड्याचा जळलेला चौथरा पुराण वस्तु म्हणून जतन केला जातो. इथली पार्लमेंटची इमारत, राऊत आसेमा ( रेल्वे स्टेशन ), पोस्ट ऑफिस, सिनेटगृह, राष्ट्रपति भवन व विद्यापीठाच्या इमारती फारच प्रेक्षणीय आहेत. तथापि दिल्लीच्या राष्ट्रपति भवनाची त्याला सर नाहीं. पोस्ट व रेल्वे खात्याचे नोकर आपल्याकडच्यासारखे बेपर्वा, उद्धट किंवा चिरचिरे नाहींत. इथे बहुतेक स्त्रियांचाच भरणा असून त्या आर्जवी, तत्पर व सुहास्यवदना आहेत. डिप्लोमेटिक स्ट्रीटवर इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका, झेक व रशिया या देशाच्या वकिलाती आहेत. यांतली रशियाची इमारत भव्य आहे. जर्मनीची वकिलात इथे असे. पण आता ती नाही व तिची इमारत सोवियत् रशियाच्या ताब्यांत आहे. भारताची स्वतंत्र अशी वकिलात नाहीं. नॉर्वे, स्वीडन व फिन्लंड मिळून एकच प्रतिनिधी आहे व ते स्वीडनमधे राहतात. आपल्या देशाला अपरिचित असलेली संस्था म्हणजे निराधार म्हाताऱ्यांचा परामर्ष

अनुक्रम 23028 दि: १०८-१०९
क्रमांक 230

घेणारी. सरकारी बजेटाने त्यांच्या निर्वाहाच्या पैशांची तरतूद होते. अपंगालयहि फार मोठे आहे. लढाईत कायमचे अपंग झालेल्यांचा तसेच कामगार अपंगाचा निर्वाह इथे होतो. यापुढे हारामाया म्हणजे दीपगृह लागतें. त्यावरून कोल फॅक्टरी पाहून आम्ही परत फिरलो. कुंटणखाने व वेश्यागृहें इथे नाहींत.

रेल्वेस्टेशन नि पोस्ट समोरासमोर आहेत. शांति परिषद संपल्यावर आम्हाला ओतानेमीचें विद्यार्थि भवन सोडावे लागलें व शहरांतल्या होतेलांत रिकाम्या जागा असतील तसे तसे विभागून रहावे लागलें. पोस्टासमोरच्या एका होतेलांत कांही मित्र गेले तर त्याच्या उजवीकडच्या आलेक्षांतरी कातू रस्त्यावर आंद्रिया होतेलांत काहीं बंगाली मित्रांसह मी गेलो. या रस्त्याच्या पलीकडच्या टोकाकडचा भाग म्हणजे शंभर वर्षांपूर्वी वसलेल्या जुन्या शहराचा भाग होय. इथेच राष्ट्रपती भवन, स्वीडनची वकीलात, रितारी हाऊने म्हणजे उमराव वाडा आणि मंत्र्यांचीं निवासस्थानें असून चौकाच्या मध्यभागीं सागरसिंहावर उभा असलेला 'हावीस आमांदा' ह्या युवतीचा अति मनोवेधक पुतळा आहे. सिंहाच्या तोंडातून कारंज्याचे फवारे उडताहेत. विले वालग्रीनने तो तयार केला असून विद्यार्थ्यांच्या गमतीजमतीचें ते स्थान आहे. समोर उत्तरेच्या बंदराची शोभा फार रमणीय आहे. किरकोळ व्यापार इथे चालतो. पण मुख्य म्हणजे छोट्या होड्या वा लॉंचमधून सागर सहल करण्याचे ते मोठे लोकप्रिय नि आकर्षक स्थान आहे. ग्रीक ऑर्थाडॉक्स चर्च हा जुन्या स्थापत्य वैभवाचा उत्तुंग नमुना असून त्याच्या मागे जुना राजवाडा आहे. लांसी रातेरीवर रोव्हींग क्लब व तिथून सौरीसारी बेटांचा संध्यारमण देखावा. यापुढे हेतोनेमी रस्त्यावर युद्धांतील मृतवीरांचीं स्मारकें व मॅनरहॅमचा पुतळा असलेलें सुंदर उद्यान लागतें. पुढे हेतरांताचा समुद्र किनारा लागतो. इथला बीच रुंद व प्रसन्न असून समुद्र स्नानासाठी स्त्री-पुरुषांनीं गजबजलेला असतो. पुढे पोस्टावरून कॉमर्स कॉलेज, शेअर बाजार व फिन्लंडच्या 'माऽमे' (माझी भूमि) या राष्ट्रगीताचा उद्गाता देशभक्त कवि जाहान लुडविग रुनेबर्ग याचा मनोरम पुतळा लागतो. त्यापुढे फिनी अभिमामाचें द्योतक 'विद्यार्थि भवन' लागतें.

फेरफटका संपला व झोप काढून आम्ही तो दिवसहि मागे लोटला. दुसऱ्या दिवशी म्हणजे दि. १ जुलैला आम्हा भारतीय प्रतिनिधींची बैठक

स्टेडियम समोरच्या डोंगरावर झाली. रुसी दौऱ्याचा कार्यक्रम इथे समजावून सांगण्यांत आला. आज संध्याकाळी सात वाजतां आम्ही या देशाचा निरोप घेणार होतो. त्यासाठी सहा वाजता स्टेशनवर उपस्थित व्हायचे होतें. आमच्या बरोबर व्हिएतनामी, चिनी, इंडोनेसियनी, व कॅनडी शिष्टमंडळेंहि निघायचीं होतीं.

दुपारी निर्हेतुक मनाने थोडा फेरफटका मारून आलो व ठरल्यावेळी स्टेशनवर दाखल झालो. इथले अन्नपाणी आज संपले होतें. आज सोळा दिवस आम्हीं या देशांत वावरलों. अनाहुतपणाने कितीतरी मित्र जोडले. हे सीधे भोळे अगत्यशील लोक—नरनारी—केवढ्या संख्येने निरोप द्यायला जमले होते! आपल्या सलील कोमल हातांनीं बायका हात धरून म्हणत, आमची आठवण ठेवाल का? विसरणार नाहीं नं आम्हाला? पुरुष खांद्यावर हात ठेवून सांगत, आमचा हा चिमुकला देश, उत्तरेच्या कोपऱ्यांत पडलेला; तुमचा देश केवढा मोठा पण किती दूर अंतरावर; पुन्हा या जन्मीं भेट व्हायला नको; अन् सद्‌गदित होत. खरेंच पुन्हा भेट होणे कठीण !

सात वाजले अन् गाडी फलाटाला लागली. सोविएत सरकारची ही स्पेशल गाडी आम्हाला नेण्यासाठी आली होती. पण सोविएत् सरहद्दीला पोहोंचेपर्यंत ती फिनी हद्दींतून जाणार होती. अर्थात् गाडीवर दोन्ही देशाचे ड्रायव्हर, गार्ड आदि अधिकारी होते. प्रथम देशानिहाय डबे निश्चित केल्यावर प्रत्येकाचा बर्थ ठरविण्यांत आला व त्याचे नंबर आम्हांला देण्यांत आले. सामान तर आधीच ज्याच्या त्याच्या जागेवर नेऊन ठेवले होते. हें सर्व होईपर्यंत तासभर गेला. नंतर आम्हाला डब्यांत जाण्याची सूचना झाली. डबे एअरकन्डीशन्ड असल्याने आंत गेलें की पेटीबंद व्हायचें. निरोपानिरोपीचे, जिव्हाळ्याचे अन् भावनाविवशतेचे शेवटले क्षण ओलांडून आम्ही डब्यांत गेलो. विश्वशांतीचे, हिन्दी—फिनी भाई भाईचे निनाद फलाटावर घुमतच होते. शिटी वाजली. गाडी रुळावरून सरपटायला लागली. आमचें शुभचिंतन करणाऱ्या उंचावलेल्या हजारो हातांत फुलांचे गुच्छ डोलत होते अन् रुमाल उडत होते. मन या रंगबेरंगी रुमालासारखे आहे. मायेच्या किंचित् स्पर्शानेहि तें असेच फडफडूं लागतें, तरंगूं लागतें.

◆ ◆ ◆

REFBK-0010205